*Progressive Education Society's*
**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous)**
**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra.**

**VOLUME 10, ISSUE 3** **MARCH 2025**

# *MODLIB : E-Bulletin of Library & Information Centre*



Arushi Pathak, XI Sci.



Dr. Vaijayanti Jadhav




Dr. A. N. Bhavale & students




Dr. Prerana Ubale




## *Achievers of March 2025*

**Published by: Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous), Shivajinagar, Pune-5.**
**Editor: Dr. Shantashree Sengupta, Librarian.**
**Editorial Assistant: Mrs. Sarika Sable**
**E-mail: librarian@moderncollegepune.edu.in**

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: March 2025

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

# *Table of Contents*


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | **Article on NAAC Accreditation by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, P.E.Society, Pune-5.** | 05 |
| 2 | **Article on चांगल्या आरोग्यासाठी रक्तदान by Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote, Chairman, P.E.Society, Pune-5.** | 06 |
| 3 | **Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers** | 07 - 15 |
| 4 | **MoU Signing Programme of P.E.Society, Pune-5 and Ruby Hall Clinic** | 16 - 23 |
| 5 | **Prize Distribution Ceremony at SPPU, Pune-7 on the occasion of International Women's Day 2025** | 24 |
| 6 | **Publication of Anthology of Marathi Poems 'हिंदोळा' written by Principal Dr. Rajendra S. Zunjarrao** | 25 |
| 7 | **Successful submission of SQAAF Report of Junior College** | 26 |
| 8 | **Events conducted by the Library during March 2025** | |
| | • *Yashwantrao Chavan Jayanti* | 27 - 29 |
| | • *Shaheed Din* | 30 - 33 |
| 9 | **Events conducted by the Departments during March 2025** | |
| | • *Swarmadhuri and Basics of Light Music Certificate Course: By Department of Performing Arts* | 35 - 41 |
| | • *Tropology: By Department of English* | 42 - 43 |
| | • *Department of Marathi* | 44 |
| 10 | **News related to Department of Fashion Technology** | 45 - 46 |
| 11 | **Webinar/Conference/Training Programme attended by Faculty Members in March 2025** | |
| | • *Dr. Shantashree Sengupta, Librarian* | 48 |
| | • *Dr. Vaijayanti Jadhav, Assistant Professor, Department of Marathi* | 49 - 50 |

# *Table of Contents*


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 12 | **Faculty Members invited as Resource Persons in March 2025** | |
| | • *Dr. Shantashree Sengupta, Librarian* | 52 - 53 |
| 13 | **Modern Achievements** | |
| | • *Department of Mathematics* | 55 |
| | • *Miss. Arushi Pathak, XIth Std. Student* | 56 |
| | • *Winners of 'पूजनीय स्व. अक्कासाहेब एकबोटे' Inter-school and Inter-collegiate Group Song Competition* | 57 |
| | • *Dr. Priyanka Joshi, Assistant Professor, Department of History* | 58 |
| | • *Dr. Amrita Priyam, Assistant Professor, Department of Economics* | 59 - 60 |
| | • *Dr. Prerana Ubale, Head, Department of Hindi* | 61 - 72 |
| | • *Miss. Vidya Giri, TYBA Student* | 73 |
| | • *Dr. Vaijayanti Jadhav, Assistant Professor, Department of Marathi* | 74 |
| | • *Prof. Sukanya Garg, Assistant Professor, Department of English* | 45 - 46 |
| | • *NCC Cadets: Modern Alumni Achievement* | 76 |
| | • *Shri. Shubham Gulab Satkar: Modern Alumni Achievement* | 77 |
| 14 | **Newly added books in the library and books received in Gratis** | 78 - 86 |
| 15 | **E-newspaper Clippings** | 87 - 187 |
| 16 | **Upcoming Events: April 2025** | 188 |

# Article on NAAC Accreditation by Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5

**प्रा. डॉ. गजानन एकबोटे**
Mtedit@timesofindia,com

# मूल्यांकन पद्धतीत हवा बदल

**राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषदेतील (नॅक) गैरप्रकार आणि उच्चपदस्थांवर झालेल्या कारवाईमुळे उच्चशिक्षण क्षेत्रात चिंतेचे वातावरण आहे. मूल्यांकन आणि मान्यता प्रणालीत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणले, तर गमावलेला विश्वास पुन्हा मिळवता येईल.**



लाचखोरी आणि गैरवर्तणुकीच्या आरोपाखाली राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेतील (नॅक) प्रमुख व्यक्तींना नुकत्याच झालेल्या अटकेमुळे उच्च शिक्षणक्षेत्राला प्रचंड धक्का बसला आहे. हे संकट केवळ सहभागी संस्थांसाठीच नव्हे, तर कठोर आणि निःपक्षपाती असलेल्या मान्यताप्रक्रियेच्या विश्वासार्हतेसाठीही चिंताजनक आहे.

शैक्षणिक मानके, प्राध्यापकांची संख्या, संशोधन परिणाम आणि पायाभूत सुविधांच्या आधारे संस्थेच्या गुणवत्तेचे झालेले मूल्यांकन हे नियामक अधिकार मंडळाच्या मंजुरीशी जोडलेले असते. उच्च मानांकन असलेल्या संस्था अधिक स्वायत्ततेसाठी आणि सरकारी अनुदानासाठी पात्र ठरतात. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठे आणि महाविद्यालये कशी ओळखली जातील, हे ठरवण्यातही 'नॅक' महत्त्वाची भूमिका बजावते. तथापि, अनेक वर्षांपासून, त्यांच्या मानांकनातील विसंगतींबद्दल शैक्षणिक वर्तुळात चर्चा सुरु आहे. कमी पायाभूत सुविधा आणि कमकुवत शैक्षणिक पात्रता असलेल्या काही संस्थांना सुस्थापित विद्यापीठांपेक्षा उच्च श्रेणी मिळाली; हे चिंताजनक आणि आश्चर्यकारक आहे. अलीकडील अटकांमुळे बऱ्याच काळापासून संशय असलेल्या गोष्टींचीच पुष्टी होते, त्यामुळे मान्यता देण्यावरील विश्वास कमी होत आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी, प्राध्यापक आणि धोरणकर्ते अडचणीत येतात. देश या आव्हानांचा सामना करीत असताना, भ्रष्टाचार कमी करण्यासाठी आणि पारदर्शकता राखण्यासाठी इतर देशातील मान्यता प्रक्रियेची रचना कशी आहे हे अभ्यासले पाहिजे. जागतिक सर्वोत्तम पद्धती लक्षात घेऊन देशात या प्रक्रियेत कोणत्या सुधारणा कराव्यात, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. खालील उपाययोजना सुचवाव्याशा वाटतात :

**प्रशासन आणि पारदर्शकता बळकट करणे**

मूल्यांकनाची प्रतिष्ठा राखण्यासाठी मानांकन करणाऱ्या संस्थांची प्रशासन यंत्रणा सक्षम असणे आवश्यक आहे. गैरव्यवहारासाठी कठोर दंड लागू करणे आवश्यक आहे. कोणतीही संस्था मानकांचे उल्लंघन करताना किंवा भ्रष्टाचारात गुंतलेली आढळल्यास त्यांना अपात्रतेसह कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी तरतूद करावी लागेल. पारदर्शकतेबाबत तडजोड होऊ शकत नाही. केवळ मानांकनाचे निकाल प्रकाशित करण्याऐवजी, तपशीलवार मान्यता अहवाल सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि इतर भागधारकांना संस्थेचे सामर्थ्य आणि कमकुवतपणाचे वास्तविक चित्र कळेल. कमी कामगिरी किंवा गैरवर्तनाची चिन्हे दर्शविणाऱ्या संस्थांवर लक्ष केंद्रित करावे. उच्च कामगिरी करणाऱ्या विद्यापीठांना अधिक स्वायत्तता आणि कमीत कमी वारंवार पुनरावलोकनासाठी पुरस्कृत केले पाहिजे. अनावश्यक नियामक ओझे कमी केले पाहिजे. मूल्यांकन करणाऱ्या संस्थांनी सर्वांत जास्त गरज असलेल्या ठिकाणी, म्हणजेच कमकुवत महाविद्यालयांवर आणि विद्यापीठांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. सध्याच्या संकटावर उपाय म्हणून, 'नॅक'ने ऑनलाइन आणि संकरित (हायब्रिड) मूल्यांकनासह नवीन पद्धती सादर केली आहे. सखोल संरचनात्मक सुधारणांशिवाय त्यातील सर्व त्रुटी दूर होणार नाहीत. त्यासाठी अधिक पारदर्शक आणि न्याय्य प्रक्रिया तयार करणे आवश्यक आहे.

**विकेंद्रीकरण**

'नॅक'च्या केंद्रीकृत नियंत्रणाच्या पलीकडे जाऊन ऑस्ट्रेलिया, अमेरिका, जर्मनीप्रमाणे अनेक स्वतंत्र मान्यता देणाऱ्या संस्था स्थापन करण्याची आवश्यकता आहे. यामुळे एकाधिकारशाहीला आळा बसू शकेल. संस्थांना त्यांच्या शैक्षणिक लक्ष्याशी सुसंगत असलेल्या मान्यता देणाऱ्या संस्था निवडण्याची परवानगी मिळू शकेल. अमेरिकेतील संस्था बाह्य पुनरावलोकन करण्यापूर्वी कठोर स्वयं-मूल्यमापन करतात; त्यामुळे सतत सुधारणा होते. अशा पद्धतीने मूल्यांकन करणाऱ्या संस्था केंद्र सरकारलाही अधिसूचनेद्वारे स्थापन करता येतील. प्रतिष्ठित आणि वचनबद्ध शैक्षणिक शास्त्रज्ञांचा या प्रक्रियेत समावेश असल्याने भ्रष्टाचार रोखण्याची खात्री देता येईल. मान्यता देण्याचे निर्णय आणि तपशीलवार अहवाल सार्वजनिक केले, तर या प्रक्रियेची पारदर्शकता वाढेल. याउलट, सध्या 'नॅक' तपशीलवार अहवाल प्रकाशित न करता केवळ अंतिम मानांकन प्रकाशित करते, हे चुकीचे आहे. देशातील काही नामांकित संस्था आणि सर्वोच्च विद्यापीठांनी एकत्रितपणे चांगल्या परिभाषित कार्यपद्धतींसह मान्यता देणाऱ्या अशा संस्था तयार केल्या पाहिजेत. विश्वासार्हता, काटेकोरपणा आणि पारदर्शकता यांवर आधारित स्पर्धेला चालना देण्यासाठी या संस्थांना 'नॅक'सारखेच अधिकार असावेत. न्याय्य आणि माहितीपूर्ण मूल्यमापन सुनिश्चित करण्यासाठी मूल्यांकन हे प्रतिष्ठित शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योगतज्ज्ञांच्या सखोल पुनरावलोकनांवर अवलंबून असले पाहिजे. यामुळे एक अशी प्रणाली तयार होईल, जिथे संस्थांचा निर्णय केवळ शैक्षणिक गुणवत्तेवरच केला जाईल. 'नॅक' वा तत्सम संस्थांनी परिणामांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. मान्यता देताना केवळ पायाभूत सोयीसुविधा आणि प्राध्यापकांची संख्या यावर लक्ष न देता परिणाम आधारित निकषांवर लक्ष द्यावे. काही देशांमध्ये संशोधनाचा प्रभाव, पदवीधर रोजगारक्षमता, नावीन्य आणि सामाजिक योगदान यांवर भर दिला जातो. या बदलामुळे मूल्यांकन व मान्यता देणे हे केवळ अडथळा आणि भीतीदायक बनण्याऐवजी उत्कृष्टतेला चालना मिळेल. कठोर श्रेणीकरणापेक्षा गुणात्मक, सुधारणा-चालक दृष्टीकोन ठेवल्यामुळे संस्थांना अल्पकालीन मानंकनाऐवजी दीर्घकालीन उत्कृष्टतेचे लक्ष्य ठेवण्यास प्रवृत्त करेल. मूल्यांकन आणि मानांकनामध्ये संबंधित विद्यापीठांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. त्यांचा अधिकारी उपस्थित असल्यास जास्त पारदर्शकता येईल.

ज्या संस्थांनी उच्च कामगिरी केली आहे, त्यांचे मूल्यांकन आणि मानांकन सात वर्षांनी करावे. ज्या संस्थांनी चांगली कामगिरी केली नसेल, त्यांचे मूल्यांकन तीन वर्षांनी करावे. चांगल्या संस्थांचे वारंवार मूल्यांकन करू नये. मूल्यांकन व मानांकनाचा अहवाल तयार करताना संबंधित विद्यापीठांचे अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे. मूल्यांकन समितीत संबंधित विद्यापीठाचे अधिकारी सदस्य म्हणून उपस्थित राहिल्यास या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येईल. त्याचप्रमाणे हा पूर्ण अहवाल सार्वजनिक करावा. अहवाल तयार करताना विद्यार्थी आणि पालक यांचा सहभाग असणे आवश्यक आहे. ज्या व्यक्तींबद्दल / संस्थेबद्दल तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यांची सखोल चौकशी करावी. चौकशीमध्ये व्यक्ती / संस्था दोषी आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. अशा संस्थांच्या मान्यता / संलग्नता रद्द करण्यासाठी संबंधित विद्यापीठांना / राज्यांना निर्देशित करणे आवश्यक आहे. त्यामुळे गैरप्रकारांना आळा बसेल.

मूल्यांकन आणि मानांकन अहवाल विद्यार्थी, पालक प्रतिनिधी यांना दाखविणे आवश्यक आहे. यामुळे गैरप्रकारांना आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल. सन १९९४ मध्ये स्थापन झालेल्या 'नॅक'च्या कामकाजात तीस वर्षांनंतर सुधारणा केल्या, तरच मानांकन आणि मूल्यांकन प्रक्रियेची विश्वासार्हता वाढेल, हे निश्चित.

**(लेखक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष आहेत.)**

Maharashtra Times 23.3.2025

# Article on चांगल्या आरोग्यासाठी रक्तदान by

## Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 28 Mar 2025_004
28 Mar 2025

# चांगल्या आरोग्यासाठी : रक्तदान

विशेष

- प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे

लंडनमधील फ्रान्सिस क्रिक इन्स्टिट्युटच्या नवीन संशोधनानुसार, वारंवार रक्तदान करणाऱ्यांना सूक्ष्म अनुवांशिक बदलांचा अनुभव येऊ शकतो. त्यामुळे त्यांना रक्ताचा कर्करोग होण्याचा धोका कमी होऊ शकतो. यासह, वाढत्या प्रमाणातील पुराव्यांवरून नियमित रक्तदानामुळे अनेक आरोग्यविषयक फायदे मिळू शकतात.

जसजसे आपले वय वाढते तसतसे आपल्या रक्त तयार करणाऱ्या स्टेम पेशी नैसर्गिकरित्या उत्परिवर्तन (Mutation) करतात, ही प्रक्रिया Clonal Heamatopoiesis म्हणून ओळखली जाते. यापैकी काही उत्परिवर्तनांमुळे रक्ताच्या कर्करोगासारख्या रोगांचा धोका वाढतो.

फ्रान्सिस क्रिक इन्स्टिट्युटच्या नवीन अभ्यासानुसार, वारंवार रक्तदान करणाऱ्या व्यक्तींमध्ये एक विलक्षण फरक ओळखला गेला आहे. या अभ्यासानुसार, ६० वर्षे वयाच्या निरोगी पुरुष रक्तदात्यांच्या दोन गटांची तुलना केली गेली. एका गटाने ४० वर्षे वर्षातून तीन वेळा रक्तदान केले होते, तर दुसऱ्या गटाने ४० वर्षांत एकूण पाच वेळाच रक्तदान केले होते. दोन्ही गटांमध्ये अनुवांशिक उत्परिवर्तनांची संख्या समान होती, परंतु त्यांचे स्वरूप भिन्न होते. वारंवार रक्तदान करणाऱ्यांपैकी जवळजवळ ५० टक्के लोकांमध्ये कर्करोगाशी संबंधित नसलेल्या विशिष्ट प्रकारच्या उत्परिवर्तनाचे प्रमाण होते, तर केवळ ५ वेळा रक्तदान करणाऱ्यांपैकी फक्त ३० टक्के लोकांमध्ये हे प्रमाण आढळून आले.

**तुमच्या रक्तदानामुळे कुणाचा तरी जीव वाचू शकतो, ही भावनाच मनाला आनंदीत करून जाते. रक्तदानाबाबत असलेले काही गैरसमज दूर करून रक्तदात्यांची संख्या वाढली पाहिजे.**

असे मानले जाते की नियमित रक्तदान शरीराला फ्रेश रक्त पेशी तयार करण्यास प्रोत्साहित करते, ज्यामुळे स्टेम पेशींचे अनुवांशिक परिदृश्य (Genetic Landscape) फायदेशीर मार्गाने बदलते. प्रयोगशाळेतील प्रयोगांमध्ये, हे उत्परिवर्तन सामान्यत: रक्ताच्या कर्करोगाशी संबंधित उत्परिवर्तनांपेक्षा वेगळे होते. जेव्हा उंदरांमध्ये इंजेक्शन दिले गेले तेव्हा वारंवार रक्तदात्यांच्या स्टेम पेशी लाल रक्तपेशी तयार करण्यात अधिक कार्यक्षम होत्या. हे निष्कर्ष आशादायक आहेत. रक्तदान केल्याने रक्तातील कर्करोगाचा धोका कमी होतो की नाही हे निर्धारित करण्यासाठी पुढील संशोधनाची आवश्यकता आहे.

प्रत्येक वेळी जेव्हा एखादी व्यक्ती रक्तदान करते, तेव्हा त्या व्यक्तीचे शरीर गमावलेल्या रक्त पेशींची जागा घेण्याची प्रक्रिया त्वरित सुरू करते. त्यामुळे अस्थिमज्जाला नवीन पेशी तयार करण्यासाठी चालना मिळते. ही नैसर्गिक नूतनीकरण प्रक्रिया कालांतराने निरोगी, अधिक लवचिक (Resilient) रक्त पेशी निर्माण करण्यास मदत करते. काही पुरावे असेही सुचवतात की वारंवार रक्तदानामुळे इन्सुलिनची संवेदनशीलता (Insulin Sensitivity) सुधारू शकते, त्याचप्रमाणे टाइप २ मधुमेहाचा धोका कमी करण्यात भूमिका बजावते. याबाबतीतसुद्धा संशोधन चालू आहे.




काही शास्त्रज्ञांनी रक्तदान आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य यांच्यातील संभाव्य संबंधाबद्दल अनुमान केले आहे. हृदयरोगाच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण म्हणजे रक्ताचा चिकटपणा- रक्त किती जाड किंवा पातळ आहे. जेव्हा रक्त खूप जाड असते, तेव्हा ते कमी कार्यक्षमतेने वाहते, ज्यामुळे रक्तात गुठळ्या, उच्च रक्तदाब आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. नियमित रक्तदानामुळे रक्ताचा चिकटपणा कमी होण्यास मदत होते आणि रक्त पातळ होते. ज्यामुळे हृदयाला पंप करणे सोपे होते आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी गुंतागुंत होण्याचा धोका कमी होतो. हृदयाचे कार्य सुधारते.

रक्तदानामुळे शरीरातील लोहाची (Iron) पातळी नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते. लोह हा हृदयरोगाशी संबंधित आणखी एक घटक आहे. रक्तातील ऑक्सिजनच्या वहनासाठी लोह आवश्यक असले तरी, जास्त प्रमाणात लोह साठणे हानीकारक आहे. ते हृदयरोगास कारणीभूत ठरते. रक्तदानाद्वारे लोह कमी केल्याने, दात्यांना लोहाशी संबंधित गुंतागुंतींचा धोका कमी होऊ शकतो.

काही तज्ज्ञांनी, विशेषत: उच्च रक्तदाब असलेल्या लोकांमध्ये, रक्तदान आणि कमी रक्तदाब यांच्यातील संबंध देखील सुचवला आहे. औषधोपचार किंवा जीवनशैलीतील बदलांना पर्याय नसला तरी, रक्तदान हा संपूर्ण हृदय व रक्तवाहिन्यांच्या आरोग्यास मदत करण्याचा एक चांगला मार्ग आहे.

रक्तदात्यांना कदाचित हे लक्षात येणार नाही, परंतु प्रत्येक वेळी ते रक्त देतात तेव्हा त्यांची एक छोटी आरोग्य तपासणी केली जाते. रक्तदान करण्यापूर्वी रक्तदाब, हिमोग्लोबिनची पातळी आणि नाडी तपासली जाते. काही प्रकरणांमध्ये संसर्गजन्य रोगांची तपासणी केली जाते. त्याचप्रमाणे ब्लड शुगर, किडनीसंबंधी तपासण्या केल्या जातात. नियमित तपासणीचा पर्याय नसला तरी, संभाव्य आरोग्याच्या समस्यांसाठी व धोक्यासाठी ती पूर्वसूचना प्रणाली म्हणून काम करू शकते.

अर्थात, एक महत्त्वाचा प्रश्न उरतो: हे आरोग्यविषयक फायदे रक्तदानामुळेच होतात का, की ते केवळ निरोगी दात्याच्या चांगल्या आरोग्याचे प्रतिबिंब आहे.

रक्तदात्यांनी कठोर पात्रतेचे निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. दीर्घकालीन आजार, विशिष्ट संसर्ग किंवा कर्करोगाचा इतिहास असलेल्या लोकांना सहसा रक्तदान करण्याची परवानगी नसते. (उदाहरणार्थ, मधुमेह, हृदयरोग, थॉयराइड संबंधित रोग इत्यादी) याचा अर्थ असा की जे नियमितपणे रक्तदान करतात ते सर्वसामान्यांपेक्षा आधीपासूनच अधिक आरोग्यसंपन्न असतात.

रक्तदानामुळे थेट आरोग्य लाभ मिळतात की नाही याची पर्वा न करता, त्याचा इतरांवर होणारा जीवनरक्षक परिणाम निर्विवाद आहे. ब्रिटनमध्ये, अमेरिकेमध्ये रुग्णालयांनी असा इशारा दिला आहे की, रक्ताचा साठा गंभीरपणे कमी आहे आणि अधिक लोकांना रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे रक्तदान करणे हे व्यक्तींना फायदेशीर आहे. त्यामुळे रक्तदान हे जीवनरक्षक असल्यामुळे रक्तदानासाठी लोकांना प्रोत्साहित करणे अतिशय आवश्यक आहे.

# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*

//श्री//

// ज्ञानमयो भव//

**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी**

शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

मा. प्रा. डॉ. मनीष जोशी, सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचा
विद्यार्थ्यांशी संवाद कार्यक्रम

दिनांक : सोमवार, ३ मार्च, २०२५

दुपारी – ३:३० वाजता
स्थळ : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सभागृह, शिवाजीनगर, पुणे ५

❊ कार्यक्रमपत्रिका ❊

- ❖ स्वागत : मा. प्रा. डॉ. सौ. ज्योत्स्ना ग. एकबोटे, सहकार्यवाह, प्रो.ए.सोसायटी
- ❖ प्रमुख पाहुण्यांचा परिचय : मा. प्रा. डॉ. सौ. कल्याणी जोशी, प्राचार्या, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे ५
- ❖ प्रमुख पाहुण्यांचा सत्कार मा. प्रा. डॉ. मनीष जोशी, सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली : शुभहस्ते – मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रो.ए.सोसायटी
- ❖ मा. कार्याध्यक्षांचे मनोगत : मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रो.ए.सोसायटी
- ❖ प्रमुख पाहुण्यांचे मनोगत : मा. प्रा. डॉ. मनीष जोशी, सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली
- ❖ आभार प्रदर्शन : मा. प्रा. डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज, पुणे ५

********************************************

सूत्रसंचालन : मा. प्रा. डॉ. सौ. सुहासिनी इटकर, उपप्राचार्या, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे ५

# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*



# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City_04Mar_2025_005
04 Mar 2025

## महाविद्यालयांतील उपस्थितीची ७५ टक्क्यांची अट शिथिल?

### यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांचे संकेत; बदलत्या शिक्षण पद्धतीनुसार निर्णय होणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** देशातील विद्यापीठ व महाविद्यालयांत विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. आता मात्र शिक्षणपद्धतीचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. त्याचा विचार करून आता उपस्थितीची अट शिथिल करण्याचे संकेत विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सचिव प्रा. मनीष जोशी यांनी पुण्यात दिले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे अभियांत्रिकीचे भविष्य : अभियंता विद्यार्थ्यांसाठीचे करिअर मार्ग आणि संधी या विषयावर आयोजित व्याख्यानावेळी डॉ. जोशी बोलत होते. या वेळी पीईएस संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्या कल्याणी जोशी, उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे व मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव उपस्थित होते.



प्रा. जोशी यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणात काही बदल अपेक्षित असल्यास सुचविण्याचे आवाहन केले. त्यानंतर एका विद्यार्थ्याने महाविद्यालयात ७५ टक्के उपस्थितीची अट कमी करावी, अशी मागणी करताच सर्व सभागृहात हास्य फुलले. मात्र, याच प्रश्नांवर प्रा. जोशी सकारात्मक प्रतिसाद देत म्हणाले, पूर्वीची शिक्षण पद्धती ही शिक्षक व विद्यार्थी अशी होती. त्यामुळे उपस्थितीची अट आवश्यक होती, तसेच काही महाविद्यालये वर्गातील उपस्थितीविषयी विद्यार्थ्यांबाबत नरमाईची भूमिका घेतात, तर काही महाविद्यालये आठमुठेपणा करतात, हे चुकीचे आहे. सध्या शिक्षण पद्धतीत बदल झाले आहेत. त्यामुळे उपस्थितीची अटही शिथिल करावी लागणार आहे. त्यादृष्टीने यूजीसी पाऊल उचलणार आहे. सध्या देशात सव्वा लाख स्टार्टअप सुरू आहेत. ही भारताच्या दृष्टीने जमेची बाजू आहे. यूजीसीने स्वयं पोर्टलवर दिलेल्या १५५५ अभ्यासक्रमांचा उपयोग विद्यार्थ्यांनी करून घ्यावा, असे आवाहन जोशी यांनी केले.

### सकारात्मक राहिल्यास योग्य दिशा मिळेल

जीवनात सकारात्मक राहिल्यास आयुष्याला योग्य दिशा मिळते. विद्यार्थ्यांना करिअरसाठी आज अनेक क्षेत्रे खुली आहेत. स्वतःशी प्रामाणिक राहून खडतर कष्ट केल्यास यश मिळते, असा सल्ला डॉ. गजाननन एकबोटे यांनी या वेळी विद्यार्थ्यांना दिला.

# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

## विद्यार्थ्यांच्या ७५ टक्के उपस्थिती अनिवार्यतेमध्ये शिथिलता

### यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांचे संकेत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाविद्यालय, उच्च शिक्षण संस्थेत ७५ टक्के उपस्थिती अनिवार्यतेचा नियम आहे. मात्र, आता या नियमात शिथिलता देण्याचे संकेत विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सचिव प्रा. मनीष जोशी यांनी दिले. एका विद्यार्थ्याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हे संकेत दिले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे 'अभियांत्रिकीचे भविष्य : अभियंता विद्यार्थ्यांसाठीचे करिअर मार्ग आणि संधी' या विषयावर आयोजित व्याख्यानावेळी डॉ. जोशी बोलत होते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह निवेदिता एकबोटे, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कल्याण जोशी, मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगरचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव या वेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधत जोशी यांनी विद्यार्थ्यांचे अभ्यासेतर वाचन, ताणतणाव (पान २ वर)

04/03/2025 | Pune | Page : 01
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

## विद्यार्थ्यांच्या ७५ टक्के उपस्थिती अनिवार्यतेमध्ये शिथिलता

(पान १ वरून)

व्यवस्थापन या विषयी जाणून घेतले.

प्रा. जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिक्षणात काही बदल अपेक्षित असल्यास सुचवण्याचे आवाहन केले. त्या वेळी एका विद्यार्थ्याने शिक्षणेतर उपक्रमांत सहभागी होताना ७५ टक्के उपस्थितीच्या नियमामुळे अडचण होत असल्याचे नमूद केल्यावर सभागृहात हशा पिकला. मात्र, या प्रश्नाचे सकारात्मक पद्धतीने उत्तर देत प्रा. जोशी म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या ७५ टक्के उपस्थितीबाबत नियम केलेला काळ आणि आताचा काळ यात फरक आहे. काही महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या वर्गातील उपस्थितीबाबत नरमाईची भूमिका घेतात. तर, काही महाविद्यालये आठमुठेपणा करतात. मात्र, आता शिक्षणाची अनेक माध्यमे आहेत. शिक्षण पद्धतीत बदल झाले आहेत. त्यामुळे ७५ टक्के उपस्थितीच्या नियमात शिथिलता आणण्याचा विचार करता येऊ शकतो.'

प्रा. जोशी म्हणाले, भारतात काही वर्षांपूर्वी मोजके नवउद्यमी होते. मात्र, आता १ लाख २५ हजारांहून अधिक नवउद्यमी देशभरात आहेत. देशभरात नवउद्यमींची परिसंस्था निर्माण झाली आहे. तरुणांमध्ये विजिगिषू वृत्ती निर्माण झाली आहे. तरुण आता रोजगार देणारे होत आहेत. ज्ञानाचा नेमका वापर हे सर्वांत आव्हानात्मक आहे. समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी ज्ञानाचा वापर करणे महत्त्वाचे आहे. समाजाच्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर, परस्पर सहकार्य गरजेचे आहे.

'अभ्यासक्रम अद्ययावत असल्यास विद्यार्थी आकर्षित होतील. त्यामुळे अभ्यासक्रम अद्ययावत केले पाहिजेत. १५५५ अभ्यासक्रम 'स्वयम'वर आहेत. उद्योगांना अपेक्षित कौशल्य प्राप्त करण्यासाठी अॅप्रेंटिस समाविष्ट पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे,' अशी माहिती प्रा. जोशी यांनी दिली. 'आयुष्यात अशक्य काहीही नाही. सकारात्मक राहून प्रयत्न केले पाहिजेत. अभियांत्रिकीच्या क्षेत्रात आता अनेक संधी निर्माण होत आहेत,' असे डॉ. एकबोटे यांनी सांगितले.

### 'अध्यापनात अभिनवतेची गरज'

'प्राध्यापकांनी चौकटीबाहेरचा विचार करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचा शिक्षणातील रस टिकून राहण्यासाठी अभिनव पद्धती अध्यापनात आणण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेने स्वतःच्या 'यूएसपी'चा विचार केला पाहिजे,' असेही प्रा. जोशी यांनी प्राध्यापकांशी संवाद साधताना नमूद केले.

04/03/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

## महाविद्यालयांमधील ७५ टक्के उपस्थितीबाबत शिथिलतेचा विचार

- यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांचे संकेत
- मॉडर्न महाविद्यालयात विद्यार्थ्यांशी संवाद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालय, उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना ७५ टक्के उपस्थिती अनिवार्यतेचा नियम आहे. मात्र, आता या नियमात शिथिलता देण्याचे संकेत विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी दिले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे 'अभियांत्रिकीचे भविष्य : अभियंता विद्यार्थ्यांसाठीचे करिअर मार्ग आणि संधी' या विषयावर आयोजित व्याख्यानावेळी डॉ. जोशी बोलत होते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह निवेदिता एकबोटे, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कल्याण जोशी, मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगरचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव आदी यावेळी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधत जोशी यांनी विद्यार्थ्यांचे अभ्यासेतर वाचन, ताणतणाव व्यवस्थापन या विषयी जाणून घेतले. प्रा. जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिक्षणात काही बदल अपेक्षित असल्यास सूचवण्याचे आवाहन केले. त्यावेळी एका विद्यार्थ्याने महाविद्यालयात ७५ टक्के उपस्थितीमुळे अडचण होत असल्याचे नमूद केल्यावर सभागृहात हशा पिकला. मात्र, या प्रश्नाचे सकारात्मक पद्धतीने उत्तर देत प्रा. जोशी म्हणाले, ७५ टक्के उपस्थिती अनिवार्यतेचा नियम केलेला काळ आणि आताचा काळ यात फरक आहे. पूर्वीची शिक्षण पद्धती ही शिक्षक व विद्यार्थी अशी होती. त्यामुळे उपस्थितीची अट आवश्यक होती. तसेच, काही महाविद्यालये वर्गातील उपस्थितीविषयी विद्यार्थ्यांना नरमाईची भूमिका घेतात. तर काही महाविद्यालये आठमुठेपणा करतात. आता शिक्षणाची अनेक माध्यमे आहेत. शिक्षण पद्धतीत बदल झाले आहेत. त्यामुळे ७५ टक्के उपस्थितीच्या नियमात शिथिलता आणण्याचा विचार करता येऊ शकतो. अभ्यासक्रम अद्ययावत असल्यास विद्यार्थी आकर्षित होतील. त्यामुळे अभ्यासक्रम अद्ययावत केले पाहिजेत. एक हजार ५५५ अभ्यासक्रम स्वयं पोर्टलवर आहेत. उद्योगांना अपेक्षित कौशल्य प्राप्त करण्यासाठी अ‍ॅप्रेंटिस समाविष्ट पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे, अशी माहिती प्रा. जोशी यांनी दिली. आयुष्यात अशक्य काहीही नाही. सकारात्मक राहून प्रयत्न केले पाहिजेत. अभियांत्रिकीच्या क्षेत्रात आता अनेक संधी निर्माण होत आहेत, असे डॉ. एकबोटे यांनी सांगितले.

### देशभरात नवउद्यमींची परिसंस्था

भारतात काही वर्षांपूर्वी मोजके नवउद्यमी होते. मात्र, आता एक लाख २५ हजारांहून अधिक नवउद्यमी देशभरात आहेत. देशभरात नवउद्यमींची परिसंस्था निर्माण झाली आहे. तरुणांमध्ये विजिगिषू वृत्ती निर्माण झाली आहे. तरुण आता रोजगार देणारे होत आहेत. ज्ञानाचा नेमका वापर हे सर्वात आव्हानात्मक आहे. समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी ज्ञानाचा वापर करणे महत्त्वाचे आहे. समाजाच्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर, परस्पर सहकार्य गरजेचे असल्याचे देखील प्रा. जोशी यांनी स्पष्ट केले.

### अध्यापनात अभिनवतेची गरज

प्राध्यापकांनी चौकटीबाहेरचा विचार करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचा शिक्षणातील रस टिकून राहण्यासाठी अभिनव पद्धती अध्यापनात आणण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेने स्वत:च्या 'यूएसपी'चा विचार केला पाहिजे, असेही प्रा. जोशी यांनी प्राध्यापकांशी संवाद साधताना नमूद केले.

Pune Edition
Mar 04, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*

# ७५ टक्के उपस्थिती शिथिल?

## 'यूजीसी'चे सचिव प्रा. मनीष जोशी यांचे नियम बदलाचे संकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

महाविद्यालय, उच्च शिक्षण संस्थेत ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक आहे. याबाबत शैक्षणिक संस्थादेखील आग्रही असतात. मात्र, स्वयं संकेतस्थळाप्रमाणे शिक्षणाचे आता विविध मार्ग उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे महाविद्यालय, उच्च शिक्षण संस्थांमधील ७५ टक्के बंधनकारक उपस्थितीबाबतच्या नियमात शिथिलता देण्याचे संकेत विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सचिव प्रा. डॉ. मनीष जोशी यांनी दिले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय आयोजित 'अभियांत्रिकीचे भविष्य : अभियंता विद्यार्थ्यांसाठीचे करिअर मार्ग आणि संधी' या विषयावरील संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह निवेदिता एकबोटे, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी, मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगरचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव या वेळी उपस्थित होते. प्रा. जोशी यांनी या वेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

शिक्षणात काही बदल अपेक्षित असल्यास सूचविण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना या वेळी केले. एका विद्यार्थ्याने महाविद्यालयात ७५ टक्के उपस्थितीमुळे अडचण होत असल्याचे नमूद केले. त्यावर उत्तर देताना प्रा. डॉ. जोशी म्हणाले, '७५ टक्के उपस्थिती बंधनकारक हा नियम सुरू केला तेव्हाचा आणि आताचा काळ यात फरक आहे. पूर्वीची शिक्षण पद्धती ही शिक्षक आणि विद्यार्थी अशी होती. त्यामुळे उपस्थितीची अट गरजेची होती. आता स्वयं संकेतस्थळासारखी शिक्षणाची विविध माध्यमे उपलब्ध आहेत, शिक्षण पद्धतीत बदल झाले आहेत. त्यामुळे ७५ टक्के उपस्थितीच्या नियमात शिथिलता आणण्याचा विचार करता येऊ शकतो.'

'अभियांत्रिकीच्या क्षेत्रात आता अनेक संधी निर्माण होत आहेत,' असे डॉ. एकबोटे यांनी सांगितले.



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजित व्याख्यानावेळी 'यूजीसी'चे सचिव प्रा. डॉ. मनीष जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. गजानन एकबोटे, डॉ. श्यामकांत देशमुख या वेळी उपस्थित होते.

### जोशी यांनी घेतली प्राध्यापकांची 'शाळा'

विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर डॉ. जोशी यांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्राध्यापकांशी संवाद साधला. सुरुवातीला डॉ. जोशी यांनी कोणताही एक आकडा, चित्रपट, खेळ आणि पर्यटन ठिकाण या चार गोष्टी कागद किंवा मोबाइलवर लिहिण्यास सांगितले. एक मिनिटानंतर विविध प्राध्यापकांना त्यांनी याबाबत विचारणा केली. त्यावर डॉ. जोशी यांनी, 'एकाच प्राध्यापिकेने लाखांतील आकडा लिहिला, एका प्राध्यापिकेने पर्यटनाचे परदेशी ठिकाणी लिहिले, तर एका प्राध्यापकाने चक्क कँडीक्रश हा खेळ लिहिला आणि बहुतांशी सर्वच प्राध्यापकांनी हिंदी चित्रपट लिहले. आकडा खूप मोठा किंवा उणे यामधील आकडा लिहिण्यास हरकत काय होती, असे प्रश्न उपस्थित प्राध्यापकांना विचारले.

Maharashtra Times 4.3.2025

# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*

## आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर आव्हानात्मक

### प्रा. मनीष जोशी यांचे मत



**पुणे** : सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर योग्य रीतीने करणे हे आव्हानात्मक असल्याचे विद्यापीठ अनुदान मंडळाचे सचिव डॉ. मनीष जोशी यांनी सांगितले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'इंजिनिअरिंग द फ्युचर : ऑपर्चुनीटीजे अँड करिअर पाथवेज फॉर बडिंग इंजिनिअर्स' या कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे होते.

प्रा. जोशी म्हणाले, जीवनात सकारात्मक राहिल्यास आयुष्याला योग्य दिशा मिळते. विद्यार्थ्यांना करिअर साठी आज अनेक क्षेत्रे खुली आहेत. स्वतःशी प्रामाणिक राहून खडतर कष्ट केल्यास यश मिळते.

प्रा.मनीष जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ज्याठिकाणी अभ्यासक्रम असतील त्याठिकाणी विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी नक्कीच जातील. विद्यार्थ्यांनी स्वयम वरील अभ्यासक्रम पूर्ण करून आपल्या ज्ञानात भर घालावी, असे ते म्हणाले. युजीसीने सुरू केलेल्या एप्रेनस्टिसशिप एम्बेड प्रोग्रामची संकल्पना त्यांनी स्पष्ट केली. यामध्ये थेट विद्यार्थ्यांना इंडस्ट्री मध्ये काम करता येईल तिथे परीक्षा सुद्धा देता येईल, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहसचिव प्रा.डॉ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. यावेळी उच्च शिक्षणासंदर्भात विद्यार्थ्यांच्या सूचना असतील तर त्याही त्यांनी नोंदवाव्यात असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. सूत्रसंचालन डॉ.सुहासिनी इटकर यांनी केले.

Kesari 4.3.2025

**सामना**

## महाविद्यालय उपस्थितीची अट शिथिल करणार – प्रा. मनीष जोशी

पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) – सध्या देशातील विद्यापीठ व महाविद्यालयांत विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. आता मात्र शिक्षणपद्धतीचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. त्याचा विचार करून आता ७५ टक्के उपस्थितीची अट शिथिल करण्याचे संकेत विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सचिव प्रा. मनीष जोशी यांनी पुण्यात दिले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी 'पीईएस' संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्या कल्याणी जोशी, उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे व प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव उपस्थित होते.

प्रा. जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी आताच्या शिक्षणात काही बदल अपेक्षित असल्यास सूचवा, असे आवाहन केले. त्यानंतर एका विद्यार्थ्याने महाविद्यालयात ७५ टक्के उपस्थितीची अट कमी करावी, अशी मागणी केली. त्यावर जोशी म्हणाले, पूर्वीची शिक्षण पद्धती ही शिक्षक व विद्यार्थी अशी होती. त्यामुळे उपस्थितीची अट आवश्यक होती. तसेच काही महाविद्यालये वर्गातील उपस्थितीविषयी विद्यार्थ्यांना नरमाईची भूमिका घेतात, तर काही महाविद्यालये आठमुठेपणा करतात, हे चुकीचे आहे. हे सर्व असले तरी आता शिक्षणाची अनेक माध्यम आहेत. शिक्षण पद्धतीत बदल झाले आहेत. त्यामुळे उपस्थितीची अटही शिथिल करावे लागणार आहे. त्यादृष्टीने यूजीसी पाऊल उचलणार आहे, असेही ते म्हणाले.

Pune Edition
Mar 04, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*

## UGC may relax attendance mandate from 75% to 65%

TIMES NEWS NETWORK

**Pune:** UGC secretary Manish Joshi on Monday suggested that the 75% attendance requirement could be eased with evolving education methods.

Speaking at Modern Engineering College, Joshi discussed education reforms with students.

At a lecture on 'The Future of Engineering: Career Paths and Opportunities', Joshi welcomed student suggestions. When a student raised concerns about the attendance rule, he acknowledged that times have changed. "Earlier, education was teacher-centred, making attendance crucial. Now, with multiple learning mediums, a reduction to 65% can be considered," he said.

Joshi encouraged students to take SWAYAM courses and embrace the UGC's Apprenticeship Embedded Programme, which integrates industry training with academics. He also highlighted India's growing entrepreneurial landscape, stressing the need for innovation and problem-solving through technology.

Addressing teachers, he urged them to adopt creative teaching methods and define their institution's unique strengths. The event was attended by Progressive Education Society leaders, including Gajanan Ekbote and Shamakant Deshmukh.

The Times of India 4.3.2025

## Can look into relaxation of 75% attendance rule: UGC secretary

SOHAM SHAH
PUNE, MARCH 3

THE UNIVERSITY Grants Commission (UGC) could look into relaxing its guidelines that mandate 75% attendance in Higher Education Institutions (HEIs), said UGC Secretary Manish Joshi. He was speaking at a talk titled 'Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers' at the Progressive Education Society auditorium.

Responding to a student's question about the mandatory attendance policy hindering student's extracurricular activities, Joshi said that the commission would look into the suggestion of relaxing the mandate.

"There is a difference between the time when 75% attendance was mandatory and the current era. The previous education system was just between a teacher and a student. Therefore, attendance was a necessary condition. Anyway some colleges take a soft stance on students regarding class attendance. Now there are many mediums of education and there have been changes in the education system. Due to this, relaxation of the 75% attendance rule can be considered," he said.

Joshi also talked about the enthusiasm of Indian students and their change in attitude. He said, "How many of you feel that you will have your own Unicorn in the future? Wow! So many of you. If I had asked you all this 10-15 years ago, no one would even know what a Unicorn is. Everyone would have thought of a horse…The mentality that you all have, of providing employment rather than seeking employment is extremely good. And all of you have this calibre."

The Indian Express 4.3.2025

# *Guidance on Engineering the Future: Opportunities and Career Pathways for Budding Engineers on 03.03.2025*

सामान्य जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे साप्ताहिक

पुरोगामी विचारांची

झुंज







दिं. ०४/०३/२०२५ RNI MAHMAR 2007/ 29689 संपादक : अनिल वडघुले पोष्ट परवाना : PCE/051/2018 - 21

## आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर ही सर्वात आव्हानात्मक गोष्ट - प्रा. मनीष जोशी

### प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीत 'इंजिनिअरिंग द फ्युचर' कार्यक्रम



झुंज न्यूज नेटवर्क
प्रसाद वडघुले

सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर योग्य रीतीने करणे ही आव्हानात्मक गोष्ट असल्याचे प्रतिपादन डॉ. मनीष जोशी यांनी केले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'इंजिनिअरिंग द फ्युचर : ऑपर्चुनीटीजे अँड करिअर पाथवीज फॉर बडिंजी इंजिनिअरस' या कार्यक्रमात ते बोलत होते.

**पुणे** : कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे होते. जीवनात सकारात्मक राहिल्यास आयुष्याला योग्य दिशा मिळते. विद्यार्थ्यांना करिअर साठी आज अनेक क्षेत्रे खुली आहेत. स्वतःशी प्रामाणिक राहून खडतर कष्ट केल्यास यश मिळते असे ते म्हणाले.

प्रा. मनीष जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पयधे म्हणाल्या कि, ज्याठिकाणी अभ्यासक्रम असतील त्याठिकाणी विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी नक्कीच जातील. विद्यार्थ्यांनी स्वयम वरील अभ्यासक्रम पूर्ण करून आपल्या ज्ञानात भर घालावी असे सांगितले. युजीसी ने सुरू केलेल्या एप्रेनस्टिसशिप एम्बेड प्रोग्राम ची संकल्पना त्यांनी स्पष्ट केली. यामध्ये थेट विद्यार्थ्यांना इंडस्ट्री मध्ये काम करता येईल तिथे परीक्षा सुद्धा देता येईल असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे स्वागतपर प्रास्ताविक प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहसचिव प्रा.डॉ . ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. यावेळी उच्च शिक्षणासंदर्भात विद्यार्थ्यांच्या सूचना असतील तर त्याही त्यांनी नोंदवाव्यात असे आव्हान त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे अनेक प्रश्न आणि सूचना नोंदवल्या. यावेळी त्यांनी महाविद्यालयीन प्राध्यापक वर्गाशी संवाद साधला. त्यांच्या अनेक प्रश्नांची समाधानकारका पद्धतीने दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुहासिनी इटकर यांनी केले.

zunjnews.in बातमी व जाहिरातीसाठी : ९६७३३००००५ / ९८२२०८३०६४

# *MOU Signing Program: 24th March 2025*



# *MOU Signing Program: 24th March 2025*







# *MOU Signing Program: 24th March 2025*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 26 March 2025_015
26 Mar 2025

## ‘प्रोग्रेसिव्ह’ आणि ‘रुबी’चा सामंजस्य करार

### विद्यार्थी, शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही मिळणार सवलतीत उपचार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २५ -** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व ग्रांट मेडिकल फाउंडेशनचे रुबी हॉल क्लिनिक यांच्याध्ये एक सामंजस्य करार करण्यात आला असून, त्याद्वारे संस्थेतील अंतर्गत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रुबी हॉल क्लिनिक हॉलमध्ये सवलतीत उपचार मिळणार आहेत.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, रुबी हॉल क्लिनिकचे सीईओ बेहेराम खोडाइजी, क्लिनिकचे विश्वस्त डॉ. सायमन ग्रांट, संस्थेचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. जोत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे व्यासपीठावर उपस्थित होत्या.



सामजंस्य करार करण्यामागची भूमिका डॉ. गजानन एकबोटे यांनी स्पष्ट केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ सगळ्यांना व्हायला हवा. चांगल्या आरोग्यापासून कुणीही वंचित राहू नये. हा करार दीर्घ काळासाठी होईल, असे मला वाटते.

रुबी हॉल क्लिनिकचे सादरीकरण डॉ. सायमन ग्रांट यांनी केले. डॉ. बेहेराम खोडाईजी यांनी सर्वांना चांगली सेवा मिळेल, अशी त्यांनी ग्वाही दिली. याप्रसंगी रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. समीर सोनार, डॉ. अंजली केळकर, डॉ. प्रणव महादेवकर, डॉ. सुशील यादव, बॉबी जॉन यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. गायत्री एकबोटे, डॉ. दिग्विजय एकबोटे यांचा या करारात महत्वाचा सहभाग आहे.

**नातेवाईकांनाही लाभ**

या करारानुसार डायग्नोस्टिक, पॅथॉलॉजी व न्यूक्लिअर मेडिसीनमध्ये ४० टक्के सवलत राहणार आहे. संस्थेतील ५३ हजार विद्यार्थी, साडेचार हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि त्यांच्या नातेवाईकांना ही सवलत मिळणार आहे.

## ‘प्रोग्रेसिव्ह’चा रुबी हॉल क्लिनिकशी करार

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

‘आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त वैद्यकीय सुविधांचा सर्वांना मिळायला हवा. चांगल्या वैद्यकीय सुविधांपासून कुणीही वंचित राहू नये, या उद्देशाने प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने रुबी हॉल क्लिनिकशी करार केला आहे. याचा फायदा सोसायटीमधील कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय; तसेच विद्यार्थ्यांना होणार आहे,’ अशी माहिती प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजान एकबोटे यांनी सोमवारी दिली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व ग्रँट मेडिकल फाउंडेशनचे रुबी हॉल क्लिनिक यांच्यात करार करण्यात आला; या वेळी डॉ. एकबोटे बोलत होते. क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बेहराम खोडाईजी, विश्वस्त डॉ. सायमन ग्रांट, सोसायटीचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. जोत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे उपस्थित होते. डॉ. ग्रांट यांनी रुग्णालयाच्या वैद्यकीय सोयीसुविधांची, तर डॉ. खोडाईजी यांनी रुबी हॉल क्लिनिकची माहिती दिली. या करारानुसार सोसायटीमधील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना वैद्यकीय सुविधांमध्ये ४० टक्के सूट देण्यात येईल.

Maharashtra Times 26.3.2025

# *MOU Signing Program: 24th March 2025*

सामान्य जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध आवाज उठवणारे साप्ताहिक

पुरोगामी विचारांची

झुंज







दिं. २५/०३/२०२५ RNI MAHMAR 2007/ 29689 संपादक : अनिल वडघुले पोष्ट परवाना : PCE/051/2018-21

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आणि ग्रँट मेडिकल फाउंडेशनचे रुबी हॉल क्लिनिक यांच्यात सामंजस्य करार

## आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ सगळ्यांना मिळावा - डॉ. गजानन एकबोटे

झुंज न्यूज नेटवर्क
प्रसाद वडघुले

**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व ग्रँट मेडिकल फाउंडेशनचे रुबी हॉल क्लिनिक यांच्या मधे एक सामंजस्य करार करण्यात आला.**

**पुणे** : याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, ग्रुप सी ई ओ रुबी हॉल क्लिनिक बेहेराम खोडाईजी, विश्वस्त रुबी हॉल क्लिनिकडॉ सायमन ग्रांट, कार्यवाह पी ई सोसायटी प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह पी ई सोसायटी डॉ. जोत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह पी ई सोसायटी डॉ. निवेदिता एकबोटे हे उपस्थित होते.

सामजंस्य करार करण्यामागची भुमिका स्पष्ट करताना डॉ गजानन एकबोटे म्हणाले, आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ सगळ्यांना व्हायला हवा. चांगल्या अरोग्यापासुन कुणीही वंचित राहू नये. हा करार जरी दोन वर्षाचा असला तरी हा दिर्घ काळासाठी होईल असे मला वाटते. हा करार नावजलेल्या हेल्थ केअर संस्थेचा एका नावाजलेल्या शैक्षणिक संस्थेशी झालेला आहे. ही संस्थेच्या ९१ वर्षाच्या कालावधीतील एक सुवर्णक्षण आहे असे डॉ एकबोटे म्हणाले.

रुबी हॉल क्लिनिकचे प्रेझेंटेशन देताना डॉ. सायमन ग्रांट म्हणाले, रुबी हॉलमधे नेहमीच आधुनिक तंत्रज्ञान वापरून रूग्णांना सेवा दिली जाते. तसेच मनोगत व्यक्त करताना डॉ. बेहेराम खोडाईजी यांनी रुबी हॉल क्लिनीकची संपुर्ण माहिती दिली. फाउंडेशनच्या चारही युनीटमधे सर्वांना चांगली सेवा मिळेल अशी ग्वाही दिली.



या प्रसंगी डॉ समीर सोनार, डायरेक्टर, न्युक्लिअर मेडिसीन, डॉ अंजली केळकर, एच ओ डी, लॅब डॉ. प्रणव महादेवकर, डायरेक्टर, रेडिओलॉजी डॉ. सुशील यादव, बॉबी जॉन यांचा सत्कार करण्यात आला.

या कराराचा लाभ संस्थेचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच नियामक मंडळाचे सर्व सदस्य, आजिवन मंडळाचे सदस्य, कर्मचाऱ्यांवर अवलंबुन कुटुंबीय व सर्व विद्यार्थी यांना सगळ्या लॅब सुविधा (पॅथॉलॉजी), सर्व लॅब चाचण्या तसेच सी टी स्कॅन, एम आर आय अशा डायग्नोस्टीक सुविधा व न्युक्लिअर मेडिसीन हे सवलतीच्या दरात करता येईल.

पी ई सोसायटीचे विद्यार्थी, कर्मचारी, त्यांचे कुटुंबिय, पी ई सोसाटीचे मेंबर्स या सगळ्यांना त्याचा लाभ घेता येईल. डॉ पी के ग्रांट यांनी या प्रसंगी आपल्या शुभेच्छा दिल्या. डॉ गायत्री एकबोटे, डॉ दिग्विजय एकबोटे यांचा या करारात महत्वाचा सहभाग आहे. या कार्यक्रमाला संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

हा करार करणारी हि एकमेव संस्था आहे असे मत सर्वांनी व्यक्त केले. सुत्रसंचलन डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले. प्रस्तावना डॉ. जोत्स्ना एकबोटे यांनी केली. गणेशवंदना व पसायदान स्वाती पटवर्धन यांनी केले तर आभार प्रा. शामकांत देशमुख यांनी मानले.

zunjnews.in बातमी व जाहिरातीसाठी : ९६७३३००००५ / ९८२२०८३०६४

# *MOU Signing Program: 24th March 2025*

## *पुणे प्रवाह न्यूज अधिकृत ब्लॉग पेज*दि २४ मार्च २०२५ रोजी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व ग्रँट मेडिकल फाउंडेशन चे रुबी हॉल क्लिनिक यांच्या मधे एक सामंजस्य करार करण्यात आला.

March 24, 2025

*पुणे प्रवाह न्यूज अधिकृत ब्लॉग पेज*



दि २४ मार्च २०२५ रोजी



# *MOU Signing Program: 24th March 2025*

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व ग्रँट मेडिकल फाउंडेशन चे रुबी हॉल



क्लिनिक यांच्या मधे एक सामंजस्य करार करण्यात आला.



# *MOU Signing Program: 24th March 2025*

*पुणे*



या प्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष मा प्रा डॉ गजानन एकबोटे,मा श्री बेहेराम खोडाईजी, ग्रुप सी ई ओ रुबी हॉल क्लिनिक, मा डॉ सायमन ग्रांट, विश्वस्त, रुबी हॉल क्लिनिक,मा प्रा शामकांत देशमुख, कार्यवाह, पी ई सोसायटी,
मा डॉ जोत्स्ना एकबोटे, सहकार्यवाह पी ई सोसायटी, डॉ निवेदिता एकबोटे, उपकार्यवाह, पी ई सोसायटी हे उपस्थित होते.
सामजंस्य करार करण्यामागची भुमिका स्पष्ट करताना डॉ गजानन एकबोटे म्हणाले आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ सगळ्यांना व्हायला हवा. चांगल्या अरोग्यापासुन कुणीही वंचित राहू नये. हा करार जरी दोन वर्षाचा असला तरी हा दिर्घ काळासाठी होईल असे मला वाटते.
हा करार नावजलेल्या हेल्थ केअर संस्थेचा एका नावाजलेल्या शैक्षणिक संस्थेशी झालेला आहे. ही संस्थेच्या ९१ वर्षाच्या कालावधीतील एक सुवर्णक्षण आहे असे डॉ एकबोटे म्हणाले.
रुबी हॉल क्लिनिकचे प्रेझेंटेशन देताना डॉ सायमन ग्रांट म्हणाले रुबी हॉलमधे नेहमीच आधुनिक तंत्रज्ञान वापरून रूग्णांना सेवा दिली जाते.
मनोगत व्यक्त करताना डॉ बेहेराम खोडाईजी यांनी रुबी हॉल क्लिनीकची संपुर्ण माहिती दिली. फाउंडेशनच्या चारही युनीटमधे सर्वांना चांगली सेवा मिळेल अशी ग्वाही दिली.
या प्रसंगी डॉ समीर सोनार, डायरेक्टर, न्युक्लिअर मेडिसीन,
डॉ अंजली केळकर. एच ओ डी.लॅब
डॉ प्रणव महादेवकर, डायरेक्टर, रेडिओलॉजी
डॉ सुशील याद्व, मा बॉबी जॉन, यांचा सत्कार करण्यात आला.
या करारानुसार डायग्नोस्टिक, पॅथॉलॉजीवर व न्युक्लिअर मेडिसीन मधे ४०%सुट देण्यात येईल.
पी ई सोसायटीचे विद्यार्थी, कर्मचारी, त्यांचे कुटुंबिय, पी ई सोसाटीचे मेंबर्स या सगळ्यांना त्याचा लाभ घेता येईल.
डॉ पी के ग्रांट यांनी या प्रसंगी आपल्या शुभेच्छा दिल्या. डॉ गायत्री एकबोटे, डॉ दिग्विजय एकबोटे यांचा या करारात महत्वाचा सहभाग आहे. या कार्यक्रमाला संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.
हा करार करणारी हि एकमेव संस्था आहे असे मत सर्वांनी व्यक्त केले.
या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ निवेदिता एकबोटे यांनी केले. प्रस्तावना डॉ जोत्स्ना एकबोटे यांनी केली. गणेशवंदना व पसायदान सौ स्वाती पटवर्धन यांनी केले.
आभार प्रदर्शन प्रा शामकांत देशमुख यांनी केले.

# *MOU Signing Program: 24th March 2025*

लोकमत

## प्रोग्रेसिव्हचा ग्रँटशी सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**औंध :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व ग्रँट मेडिकल फाउंडेशनचे रुबी हॉल क्लिनिक यांच्यामध्ये शिवाजीनगर येथे सोसायटी सभागृहात आयोजित कार्यक्रमात सामंजस्य करार करण्यात आला. प्रास्ताविक ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. स्वाती पटवर्धन यांच्या गणेश वंदनेने कार्यक्रमास सुरुवात झाली.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, डॉ. बेहेराम खोडाईजी, डॉ. सायमन ग्रांट, प्रा. शामकांत देशमुख, डॉ. निवेदिता एकबोटे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संस्थेचे डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ सगळ्यांना व्हायला हवा. चांगल्या आरोग्यापासून कुणीही वंचित राहू नये.

रुबी हॉल क्लिनिकचे प्रेझेंटेशन देताना डॉ. सायमन ग्रांट म्हणाले, रुबी हॉलमध्ये नेहमीच आधुनिक तंत्रज्ञान वापरून रुग्णांना सेवा दिली जाते. डॉ. खोडाईजी यांनी रुबी हॉल क्लिनिकची संपूर्ण माहिती दिली. फाउंडेशनच्या चारही युनिटमध्ये सर्वांना चांगली सेवा मिळेल, अशी ग्वाही दिली आहे.

या प्रसंगी डॉ. समीर सोनार, डॉ. अंजली केळकर, डॉ. प्रणव महादेवकर, डॉ. सुशील यादव, बॉबी जॉन यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. गायत्री एकबोटे, डॉ. दिग्विजय एकबोटे यांचा या करारात महत्त्वाचा सहभाग आहे. या कार्यक्रमाला प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षकांसह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Hello Pune
Page No. 2 Mar 27, 2025
Powered by: erelego.com

# *Prize Distribution Ceremony at Savitribai Phule Pune University, Pune-7 on the occasion of International Women's Day, 08.03.2025*

आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सावित्रीबाई फुले सन्मान पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला. त्याची काही क्षणचित्रे.




**- प्रा. डॉ.सौ.ज्योत्स्ना गजानन एकबोटे**
**व्यवस्थापन परिषद सदस्य,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**मा. नगरसेविका, पुणे महानगरपालिका**










# *Publication of Anthology of Marathi Poems 'हिंदोळा' written by Principal Dr. Rajendra S. Zunjarrao*

## राजेंद्र झुंजारराव यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**पुणे** : मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या 'हिंदोळा' या सतराव्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक महावीर जोंधळे यांच्या हस्ते नुकतेच झाले. गावगाडा पुरस्कार वितरण सोहळ्यात या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाला सोमनाथ टकले, मराठी विभागप्रमुख डॉ. निशा भंडारे, अभिरुची पब्लिकेशन्सच्या डॉ. वैजयंतीमाला जाधव उपस्थित होत्या.

Maharashtra Times 15.3.2025



# *Successful submission of SQAAF Report of Junior College*

"शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि हमी फ्रेमवर्क" (School Quality Assessment and Assurance Framework). बाबतची स्वयंमुल्यांकन अहवाल विहीत मुदतीत मा. प्राचार्य डॉ. आर. एस. झुंजारराव, पर्यवेक्षक श्री. दिलीपदादा खंडाळे , प्रबंधक गणेश साठे व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक सहकारी यांच्या उपस्थितीत ऑनलाईन पद्धतीने सादर केला. त्यामध्ये महाविद्यालयास ४६४ पैक ४४४ गुण मिळालेले आहेत. ही ऐक अतिशय अभिमानाची बाब आहे आपले सर्वांचे हार्दिक अभिनंदन.



हार्दिक अभिनंदन



# *Events Conducted by the Library during March 2025*

## *1. Yashwantrao Chavan Jayanti: 12th March 2025*

On 12th March 2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Yashwantrao Chavan Jayanti' as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, Vice-Principal Prof. Dr. Vilas Kamble Sir ; Librarian Dr. Shantashree Sengupta; Library Staff Members paid their respect to Late Yashwantrao Chavan.

Prof. Dr-Vilas Kamble Sir mentioned that Yashwantrao Balwantrao Chavan was a great Indian politician who served as the last Chief Minister of Bombay State and the first of Maharashtra after latter was created by the division of Bombay state. He was a strong leader, co-operative leader, social activist and writer. He was popularly known as Leader of Common People. He advocated social democracy in his speeches and articles and was instrumental in establishing co-operatives in Maharashtra for the betterment of the farmers. Principal Sir also mentioned the various Posts held by Late Yashwantrao Chavan like Minister of Home Affairs, Minister of External Affairs, Minister of Finance and Minister of Defence.

I am thankful to the library staff members and students who were present during the programme.

**Regards,**
**Dr.Shantashree Sengupta,**
**Librarian.**






# *Events Conducted by the Library during March 2025*

### यशवंतराव चव्हाण

(दि.१२ मार्च, १९१४ – २५ नोव्हेंबर, १९८४)

(अल्प परिचय)

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, थोर राष्ट्रीय नेते आणि भारताचे माजी उपपंतप्रधान. देवराष्ट्रे (जि. सांगली) येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म. प्राथमिक शिक्षण कराड येथे घेऊन उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे घेतले आणि बी. ए.एल.एल.बी. झाले. सन १९३० साली महात्मा गांधींनी सुरु केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत त्यांनी भाग घेतला, तेव्हा सन १९३२ साली त्यांना पहिला तुरुंगवास घडला.

सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. सन १९४६ साली तेव्हाच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळाची निवडणूक होऊन यशवंतराव दक्षिण सातारा मतदारसंघातून निवडून गेले आणि संसदीय चिटणीस झाले. सन १९४८ साली त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या चिटणीस पदावर नियुक्ती झाली व सन १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री झाले. द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ रोजी सूत्रे हाती घेतली. सन १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व राज्याचे ते पहिले मुख्यमंत्री झाले. पुढे सन १९६२-६६ या काळात ते भारताचे संरक्षणमंत्री, सन १९६६-७० गृहमंत्री, सन १९७०-७४ पर्यंत अर्थमंत्री आणि सन १९७४ पासून परराष्ट्रमंत्री बनले.

'अटल' उपक्रमाअंतर्गत मॉक टेस्ट्स आणि सायकोमेट्रिक टेस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांचा शोध घेता येतो. या सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर त्या विषयातील शैक्षणिक संधी आणि प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाताना येणारा ताण कमी कमी होण्याबरोबरच शैक्षणिक आयुष्यात पुढे जाण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. १६ जानेवारी २०२५ रोजी या उपक्रमाची सुरुवात झाली आहे. 'अटल' उपक्रमात राज्यातील विविध महाविद्यालयांचा सहभाग असून कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन या विद्याशाखांचा समावेश आहे. या उपक्रमाची विविध माध्यमातून प्रचार आणि प्रसिद्धी करण्यात येत आहे.

01/03/2025 | Pune | Page : 04
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

पुणे दिनांक

# अकरावी प्रवेश प्रक्रिया राज्यभरात ऑनलाइन

### येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : राज्यातील अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. आहे. त्यानुसार गेली काही वर्षे पाच ठिकाणी राबवण्यात येणारी अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६पासून राज्यभरात केंद्रीय ऑनलाइन पद्धतीनेच राबवण्यात येणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. गेली काही वर्षे मुंबई महानगर क्षेत्र (एमएमआरडीए), पुणे-पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक या महानगरपालिका क्षेत्रांत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. या प्रवेश प्रक्रियेची उपयोगिता लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती उद्दिष्टांमध्ये समाविष्ट असलेल्या 'इज ऑफ लिव्हिंग' उद्दिष्टानुसार विद्यार्थी, पालकांचा वेळ, पैसा आणि श्रम याचा अपव्यय टाळण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अकरावीची केंद्रीय ऑनलाइन प्रवेश पद्धती राज्यभर राबवण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक स्तरावरून करण्यात येईल, तर शिक्षण आयुक्तांचे प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण राहणार आहे.

मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडून उच्च माध्यमिक शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांकडून नोंदणी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती (उदाहरणार्थ - शाखानिहाय तुकड्या, अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित, वर्गनिहाय व शाखानिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता, कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असलेले विषय) तपासून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक यांनी निश्चित केलेल्या ऑनलाइन सेवा पुरवठादारास ठरलेल्या कालावधीत उपलब्ध करून देतील. प्रवेश प्रक्रिया राज्य स्तरावर राबवण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आणि अन्य पूर्वतयारी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांच्या स्तरावर करावी. तसेच प्रवेश प्रक्रिया राज्य स्तरावर राबविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध कराव्यात. ऑनलाइन प्रवेश पद्धतीविषयी विद्यार्थी आणि पालकांचा माहिती उपलब्ध करून द्यावी, आवश्यकता असल्यास प्रशिक्षणासाठी दृक्श्राव्य चित्रफीत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### चार फेऱ्यांनंतर वर्ग सुरू

प्रवेश प्रक्रियेत नियमित चार फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर अकरावीचे वर्ग सुरू करावेत. त्यानंतर उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर सर्वांसाठी खुले प्रवेश ठेवावेत. हे प्रवेश गुणवत्तेच्या आधारावर करावेत. याबाबतचे आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना द्यावेत. अकरावीत प्रवेशित होणाऱ्या शेवटच्या विद्यार्थ्यापर्यंत प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच होईल, असे नमूद करण्यात आले आहे.

01/03/2025 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
CITY_01MARCH_2025_005
01 Mar 2025

# विद्यापीठाकडून महाविद्यालयांची शैक्षणिक तपासणी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २८** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांची शैक्षणिक व विद्याविषयक तपासणी करण्यात येणार आहे. याबाबतची सर्व माहिती महाविद्यालयाने सादर केल्यानंतर त्याची विद्यापीठाकडून पडताळणी होणार आहे. त्यामुळे महाविद्यालयांचे धाबे दणाणले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११७ नुसार संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांची शैक्षणिक व विद्याविषयक तपासणी करण्याचा निर्णय पुणे विद्यापीठाने घेतला आहे. त्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संलग्नता कक्षाचे उपकुलसचिव गिरीश बेत यांनी काढले आहे. त्यामुळे सर्व महाविद्यालय व संस्थांना याबाबत स्वयंमूल्यापन अहवाल ऑनलाइन पद्धतीने भरण्यासाठी आठवडाभराचा कालावधी देण्यात आला आहे. महाविद्यालयांना बीओडी लॉग इनमधून माहती भरण्यासाठी लिंक उपलब्ध करून दिली जाणार आहे. सर्वांनी आपल्या बीओडी लॉग इनमधील सर्व माहिती तपासून अद्ययावत करावी, असेही विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### सर्व माहिती भरणे बंधनकारक

महाविद्यालयाने सर्व माहिती योग्य पद्धतीने भरणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वयंमूल्यमापन अहवाल सादर करावा लागणार आहे. त्यात महाविद्यालय व संस्थेस मिळालेले नॅक किंवा एनबीए मूल्यांकन, प्राचार्य अथवा संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, भौतिक सुविधांसह सर्व माहिती सादर करणे अनिवार्य राहणार आहे.

**विद्यापीठाची समिती करणार पडताळणी**

महाविद्यालय व संस्थांनी सादर केलेल्या माहितीची पडताळणी विद्यापीठाने स्थापन केलेल्या समितीमार्फत करण्यात येणार आहे. या माहितीच्या आधारे समितीने दिलेला शैक्षणिक व विद्याविषयक तपासणीचा अहवाल संबंधित महाविद्यालयाच्या बीओडी लॉग इनमध्ये उपलब्ध करून दिला जाणार आहे. याबाबतचे रीसतर वेळापत्रक व सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रीत्या कळविण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने म्हटले आहे.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
CITY_02MAR_2025_011
02 Mar 2025

# प्रवेश प्रक्रिया ऑनलाइनच

**११वीच्या परीक्षेसाठी शिक्षण विभागाचा निर्णय**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १** - राज्यात इयत्ता अकरावीसाठी सहा महापालिका क्षेत्रांमध्ये केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली जात होती. आता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून संपूर्ण राज्यभरातील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांसाठी या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. विद्यार्थी व पालकांचा वेळ, पैसा व श्रम यांचा अपव्यय टाळण्यासाठीच हा निर्णय राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून घेण्यात आला आहे.

मुंबई महानगर क्षेत्र (एमएमआरडीए), पुणे, पिंपरी चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक या महापालिका क्षेत्रात गेली काही वर्षे ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. अन्य ठिकाणी प्रवेशासाठी ऑफलाइन या प्रवेश प्रक्रियेची उपयोगिता लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती उद्दिष्टांमध्ये समाविष्ट काही बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक स्तरावरून करण्यात येईल तर शिक्षण आयुक्तांचे प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण राहणार आहे.

मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद, लातूर व कोल्हापूर विभागीय शिक्षण उपसंचालक उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून नोंदणी अर्जामध्ये नमूद केलेली शाखानिहाय तुकड्या, अनुदानित, विना अनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित, वर्गनिहाय व शाखानिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता, कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असलेले विषय ही माहीती तपासून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक यांनी निश्चित केलेल्या ऑनलाइन सेवा पुरवठादारास ठरलेल्या कालावधीत उपलब्ध करून देतील. प्रवेश प्रक्रिया राज्यस्तरावर राबवण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आणि अन्य पूर्वतयारी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांच्या स्तरावर करावी. प्रवेश प्रक्रिया राज्यस्तरावर राबविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध कराव्यात. ऑनलाइन प्रवेश पद्धतीविषयी विद्यार्थी आणि पालकांचा माहिती उपलब्ध करून द्यावी, आवश्यकता असल्यास प्रशिक्षणासाठी दृकश्राव्य चित्रफित उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# देशाचा पहिला क्वांटम संगणक लवकरच सेवेत

### 'टीआयएफआर'मध्ये काम अंतिम टप्प्यात

रोहन टिल्लू
rohan.tillu@timesofindia.com

मुंबई : सामान्य वापरातील संगणकाच्या तुलनेत कैक पटींनी अद्ययावत असलेल्या क्वांटम संगणकाच्या निर्मितीत आता भारतानेही प्रवेश केला आहे. देशातील पहिलावहिला ६ क्युबिटचा क्वांटम संगणक निर्मितीच्या अंतिम टप्प्यात असून, टाटा मूलभूत संशोधन संस्था म्हणजेच टीआयएफआरचे शास्त्रज्ञ हा संगणक तयार करीत आहेत.

चित्र : एआय



### क्वांटम संगणक म्हणजे काय?

सर्वसामान्य कम्प्युटर बिट्सचा वापर करतात. बिट्समध्ये ० किंवा १ या भाषेत प्रोग्राम लिहिले जातात किंवा माहिती साठवली जाते. क्वांटम संगणक हे क्युबिट्सचा वापर करतात. क्युबिट एकाच वेळी ० किंवा १ किंवा दोन्ही असू शकते. क्वांटम संगणक हे जटिल सिम्युलेशन चालवू शकतात. गणितातील एखादे अत्यंत क्लिष्ट वाटणारे समीकरण किंवा इतर क्लिष्ट प्रणाली क्वांटम संगणकाद्वारे अगदी झटक्यात सोडवली जाऊ शकते. सामान्य संगणकाला किंवा अगदी शास्त्रीय संगणकालाही ती सोडवण्यासाठी कैक वर्षे लागू शकतात.

जागतिक पातळीवर क्वांटम कम्प्युटिंग क्षेत्रात प्रचंड प्रगती झाली असली, तरी भारताचे हे पहिले पाऊल पुढील 'क्वांटम' झेपेच्या दिशेने महत्त्वाचे मानले जाते.

मटा विशेष

■ **'क्वांटम' आणि भारत**

क्वांटम संगणक तयार करण्यासाठी टीआयएफआरसह भारतातील इतर वैज्ञानिक संस्था काही वर्षांपासून प्रयत्न करीत असून गेली १२ वर्षे टीआयएफआरमध्ये हा संगणक बनवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे शास्त्रज्ञ प्रा. डॉ. आर. विजयराघवन यांनी सांगितले. आता ६ क्युबिटचा क्वांटम संगणक अंतिम टप्प्यात असल्याची माहितीही त्यांनी दिली. केंद्राने आता क्वांटम मिशन हाती घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अमेरिका, चीनने क्वांटम विज्ञानात आघाडी घेतली आहे. त्यांच्याकडे ११०० क्युबिट्स क्षमतेचे संगणक आहेत. आपण तीन वर्षांत २४ आणि पाच वर्षांत १०० क्युबिट्स क्षमतेचे संगणक तयार करण्याच्या उद्देशाने काम करीत आहोत. त्यासाठी १५० कोटींचा निधी मंजूर झाल्याचेही डॉ. विजयराघवन यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times 3.3.2025

# मातृभाषेतील शिक्षणापासून ४० टक्के वंचित

### 'युनेस्को'च्या अहवालातील निष्कर्ष

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेच्या (युनेस्को) 'ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरिंग' (जीईएम) पथकाच्या अहवालानुसार, जागतिक लोकसंख्येच्या ४० टक्के लोकांना त्यांच्या मातृभाषेत शिक्षणाची सुविधा नाही. विविध देशांमध्ये मातृभाषेच्या भूमिकेबद्दल समज वाढलेली असूनही, धोरणात्मक उपक्रम मर्यादित आहेत, असेही या अहवालात म्हटले आहे. हा अहवाल २५व्या आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनानिमित्त संकलित करण्यात आला आहे. या निमित्ताने मातृभाषांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी केलेल्या समर्पित प्रयत्नांचा गौरव करण्यात आला.

(चित्र : एआय)



**"आज, जागतिक स्तरावर, ४० टक्के लोकांना ते ज्या भाषेत बोलतात आणि जी भाषा त्यांना समजते त्या भाषेत शिक्षण घेता येत नाही. काही कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये, हा आकडा ९० टक्क्यांपर्यंत जातो. याचा परिणाम एक अब्जाहून अधिक विद्यार्थ्यांवर होत आहे**

– वरिष्ठ सदस्य, जीईएम पथक

### ही आव्हाने

- या प्रकरणातील काही आव्हानांमध्ये शिक्षकांची मातृभाषा वापरण्याची मर्यादित क्षमता, मातृभाषेत अभ्यास साहित्याची अनुपलब्धता आणि समुदायाचा प्रतिकार यांचा समावेश आहे
- काही कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये, हे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत जास्त आहे.
- २५ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांना याचा फटका बसला आहे.
- सर्व विद्यार्थ्यांना फायदा होईल, अशी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रांनी बहुभाषिक शिक्षण धोरणे आणि पद्धती लागू करण्याची शिफारस पथकाने केली.

### अडथळ्यांशी संघर्ष

'स्थलांतर वाढत असल्याने आणि वेगवेगळ्या भाषिक पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसह वर्गखोल्या अधिक सामान्य होत असल्याने भाषिक विविधता जागतिक वास्तव बनत आहे. ३१ दशलक्षाहून अधिक विस्थापित तरुणांना शिक्षणात भाषेच्या अडथळ्यांशी संघर्ष करावा लागत आहे,' असे 'भाषा विषय : बहुभाषिक शिक्षणावरील जागतिक मार्गदर्शन' या शीर्षकाचा अहवाल तयार करणाऱ्या पथकाने म्हटले आहे.

Maharashtra Times 3.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# महाविद्यालयांचे शैक्षणिक लेखापरीक्षण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांची शैक्षणिक व विद्याविषयक तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठीची माहिती ५ मार्चपर्यंत सादर करण्याचे निर्देश विद्यापीठाने दिले आहेत.

विद्यापीठाच्या संलग्नता कक्षाचे उपकुलसचिव गिरीश बेत यांनी या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११७ नुसार संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांची शैक्षणिक व विद्याविषयक तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व महाविद्यालये आणि संस्थांना स्वयंमूल्यमापन अहवाल ऑनलाइन पद्धतीने भरावा लागणार आहे. स्वयंमूल्यमापन अहवालामध्ये महाविद्यालय आणि संस्थेस मिळालेले नॅक किंवा एनबीए मूल्यांकन, प्राचार्य अथवा संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, भौतिक सुविधा अशी सर्व माहिती सादर करणे अनिवार्य आहे.

महाविद्यालय आणि संस्थांनी सादर केलेल्या माहितीची पडताळणी विद्यापीठाकडून नियुक्ती समितीद्वारे केली जाणार आहे. समितीने दिलेला शैक्षणिक व विद्याविषयक तपासणीचा अहवाल संबंधित महाविद्यालयाच्या बीओडी लॉग इनमध्ये उपलब्ध करून दिला जाणार आहे. या बाबतचे रिसतर वेळापत्रक आणि सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररीत्या कळवण्यात येणार असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

Loksatta 3.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# साहित्य महामंडळाचे कार्यालय येणार पुण्यात

## १00 व्या संमेलनाच्या आयोजनाचा मान

**पुणे, ता. २ : साहित्य संमेलनाचे आयोजन करणाऱ्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळा'चे कार्यालय आता पुण्याकडे येणार आहे. घटक संस्थांकडे प्रत्येकी तीन वर्षे फिरत्या स्वरूपात कार्यभार असणाऱ्या महामंडळाचे कार्यालय १ एप्रिलला महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्याकडे हस्तांतरित होणार आहे. पुढील तीन साहित्य संमेलने या काळात होणार असून, यात मानाच्या १०० व्या साहित्य संमेलनाचाही समावेश असेल.**

पुण्याची महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा साहित्य परिषद आणि नागपूरचा विदर्भ साहित्य संघ या चार प्रातिनिधिक संस्थांनी एकत्र येत १९६१ मध्ये 'अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ' या शिखर संस्थेची स्थापना केली. महामंडळाचे व्यवस्थापकीय कार्यालय प्रत्येक घटक संस्थेकडे तीन वर्षांच्या मुदतीसाठी असते. महामंडळावर घटक संस्थेचे प्रत्येकी तीन प्रतिनिधी, समाविष्ट संस्थांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी आणि सर्व संलग्न संस्थांचे मिळून जास्तीत जास्त तीन प्रतिनिधी सभासद असतात, अशी महामंडळाची रचना आहे.




### महामंडळातील संस्था

**घटक संस्था...**
- महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
- मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई
- मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर
- विदर्भ साहित्य संघ, नागपूर

**संलग्न संस्था...**

मराठी वाङ्मय परिषद, बडोदे

**समाविष्ट संस्था...**
- मराठी साहित्य परिषद, हैदराबाद
- मराठी साहित्य सेवक मंडळ, गोवा
- कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद, गुलबर्गा
- मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य
- छत्तीसगड मराठी साहित्य परिषद, बिलासपूर
- मध्य प्रदेश मराठी साहित्य संघ, भोपाळ

### 'मसाप'चे पदाधिकारी सांभाळणार कार्यभार

सध्या महामंडळाचे कार्यालय मुंबई मराठी साहित्य संघाकडे आहे. त्यांच्या कार्यकाळात वर्धा, अमळनेर आणि दिल्ली अशी तीन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने झाली. आता मुंबई मराठी साहित्य संघाकडील तीन वर्षांचा कालावधी संपुष्टात आल्याने महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे (मसाप) हे कार्यालय हस्तांतरित होईल. यात 'मसाप'च्या घटनेनुसार 'मसाप'चे कार्याध्यक्ष हे महामंडळाचे अध्यक्ष होतील. 'मसाप'चे प्रमुख कार्यवाह हे महामंडळाचे कार्यवाह आणि 'मसाप'चे कोषाध्यक्ष हे महामंडळाचे कोषाध्यक्ष होतील.

### तीन वैशिष्ट्यपूर्ण संमेलने

पुण्याकडे महामंडळाचे कार्यालय असताना तीन साहित्य संमेलनांचे आयोजन होणार आहे. विशेष म्हणजे ही संमेलने अनुक्रमे ९९, १०० आणि १०१ वी असतील. विशेष म्हणजे शतक महोत्सवी संमेलन होत असताना महामंडळाचे कार्यालय हे साहित्य क्षेत्रातील आद्यसंस्था असलेल्या 'मसाप'कडे असण्याचा योग जुळून आला आहे.

"साहित्य संमेलनांना १४७ वर्षांची वैभवशाली परंपरा आहे. महामंडळाच्या स्थापनेपूर्वी महाराष्ट्र साहित्य परिषदच साहित्य संमेलनांचे आयोजन करत असे. त्यामुळे ९९, १00 आणि १0१ या वैशिष्ट्यपूर्ण संमेलनांवेळी 'मसाप'कडे महामंडळाचा कार्यभार येणे, हा सुंदर योग आहे. ही तीनही संमेलने आशयसंपन्न करण्याचा प्रयत्न आम्ही करू.

**- प्रा. मिलिंद जोशी**, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

Sakal 3.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'भारतीय ज्ञान परंपरेच्या माध्यमातून समाजोपयोगी बदल गरजेचे'

### विद्यापीठात सहा दिवसीय प्रशिक्षण वर्ग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** भारतीय ज्ञान परंपरेची वर्तमान परिस्थितीशी सांगड घालून समाजोपयोगी बदल करणे अतिशय गरजेचे आहे, असे मत विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सचिव प्रा. मनीष जोशी यांनी मांडले.

यूजीसीच्या मालवीय मिशन शिक्षण प्रशिक्षण केंद्रामार्फत राज्यातील प्राध्यापकांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित 'भारतीय ज्ञान परंपरा' बाबत सहा दिवसीय प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनावेळी प्रा. जोशी बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, यूजीसी-मालवीय मिशन शिक्षण प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. सुभाष केंद्रे, भारतीय ज्ञान परंपरा केंद्राच्या समन्वयक डॉ. मुग्धा गाडगीळ या वेळी उपस्थित होते. भारतीय ज्ञान परंपरा हा विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा विषय आहे. तो त्यांच्यापर्यंत परिणामकारकतेने पोहोचविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची गरज असल्यामुळे यूजीसीतर्फे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन सुरू करण्यात आल्याचे प्रा. जोशी यांनी सांगितले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अग्रेसर असून, भारतीय ज्ञान परंपरेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्या संबंधित कौशल्ये विकसित करण्यासाठीही पुढाकार घेत मोलाचे योगदान निश्चित देईल, असे डॉ. गोसावी यांनी नमूद केले.

04/03/2025 | Pune | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

---

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City_04Mar_2025_005 04 Mar 2025
www.dainikprabhat.com

# ३५ कनिष्ठ महाविद्यालयांनी शासनाचे नियम धुडकावले

### क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचा प्रकार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** पुणे विभागातील ३५ कनिष्ठ अनुदानित महाविद्यालयांनी शासनाचे नियम धुडकावत इयत्ता अकरावीसाठी प्रवेश क्षमतेपेक्षा अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आता या संबंधित महाविद्यालयांना शिक्षण विभागाकडून कारवाई करण्याची तंबीही देण्यात आली आहे.

महापालिका हद्दीत केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने अकरावीसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयात ऑफलाइनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतात. प्रत्येक महाविद्यालयाने अकरावीसाठी शिक्षण विभागाकडून विद्यार्थी क्षमतेनुसार तुकडी मान्यता करून घेणे बंधनकारक असते. ८०, १२० विद्यार्थी संख्येनुसार तुकडी मान्यता घेणे बंधनकारक असते. मात्र, ग्रामीण भागातील काही अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांनी शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवत बनवाबनवी केली आहे.

पुणे विभागात पुणे जिल्ह्यात ३५५, अहिल्यानगरमध्ये ३४६, सोलापूरमध्ये ३२१ याप्रमाणे अनुदानित महाविद्यालये आहेत. पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने नुकतीच कनिष्ठ महाविद्यालयांची संचमान्यता करण्यात आली. यात प्रत्येक महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येची पडताळणी करण्यात आली. त्यात पुणे जिल्ह्यातील १३, अहिल्यानगरमधील ११, सोलापूरमधील ११ याप्रमाणे अनुदानित महाविद्यालयांत प्रवेश मान्यता क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याची बाब निदर्शनास आली आहे.

पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने त्यावर संबंधित महाविद्यालयांना नोटिसा बजावून त्यांच्याकडून लेखी खुलासाही मागविला होता. यात महाविद्यालयांनी समाधानकारक खुलासा केलेला नाही.

#### प्रस्तावच दाखल नाहीत

प्रवेश क्षमतेपेक्षा अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायचे असल्यास त्यास माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक कार्यालयाकडून रीतसर प्रस्ताव दाखल करून मान्यता घेणे बंधनकारक आहे. मात्र, त्याबाबतचे प्रस्तावच संचालक कार्यालयाकडे दाखल केलेले नाहीत. आता पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांकडे संबंधित महाविद्यालयांबाबतचा अहवाल पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर कारवाई करण्यात येणार आहे.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता

# राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या सक्तीसाठी निधी रोखल्याचा वाद

**'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'ला विरोध का?**

तमिळनाडूने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' अमलात आणण्यास २०२१ पासूनच सकारण नकार दिलेला आहे, सत्ताधारी द्रमुक आणि विरोधक अण्णा द्रमुक या दोन्ही पक्षांनी विरोधच केला आहे. त्यातील प्रमुख मुद्दे : (१) त्रिभाषा सूत्र : आतापर्यंत तमिळनाडूमधील शिक्षण द्विभाषा सूत्रानुसार (तमिळ-इंग्रजी) सुरू आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदीचा समावेश करणे हा हिंदी लादण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जाते. (२) केंद्रीकरण आणि राज्यांची स्वायत्तता : राज्यघटनेनुसार शिक्षण हा समावर्ती सूचीतील विषय आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकार शिक्षणाबाबत स्वतंत्रपणे कायदे करू शकतात. मात्र, राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे राज्याची शिक्षण क्षेत्रातील स्वायत्तता कमी होत असल्याचा तमिळनाडू सरकारचा आरोप आहे. सर्व राज्यांसाठी एकच धोरण लागू करून स्थानिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक गरजांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचाही तमिळनाडू सरकारचे म्हणणे आहे. (३) चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम : राष्ट्रीय शिक्षण धोरणात पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा करतानाच 'मल्टिपल एंट्री, मल्टिपल एग्झिट' या तरतुदीनुसार विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सोडण्याची मुभा देण्यात आलेली आहे. एक वर्षाने प्रमाणपत्र, दोन वर्षांनी पदविका आणि चार वर्षांनी पदवी अशी ही व्यवस्था आहे. मात्र तमिळनाडूतील शिक्षणतज्ज्ञांचा आक्षेप असा की, या तरतुदीमुळे शिक्षणातील विद्यार्थी गळतीचे प्रमाण वाढू शकते. तसेच राज्यातील शिक्षण संस्थांकडे पुरेशा साधनसुविधा, शिक्षक नसल्याने या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे कठीण असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. (४) केंद्रीय प्रवेश परीक्षांना विरोध : तमिळनाडूचा केंद्रीय प्रवेश परीक्षांना, विशेषतः केंद्रीय विद्यापीठ प्रवेश परीक्षा (सीयूईटी) आणि वैद्यकीय पात्रता प्रवेश परीक्षा (नीट) यांना विरोध आहे. या परीक्षा 'सीबीएसई'च्या विद्यार्थ्यांसाठी अधिक फायदेशीर ठरतात, राज्य मंडळांचे विद्यार्थी मागे पडतात. परिणामी, खासगी शिकवणी वर्गांवरील अवलंबित्व वाढून सामाजिक न्याय तत्त्व बाधित होते, यावर तमिळनाडू सरकारने बोट ठेवले आहे.

**केंद्र सरकारने निधी का रोखला?**

केंद्र सरकारच्या समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत मिळणाऱ्या निधीचा संबंध राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीशी जोडण्यात आल्याने तमिळनाडू सरकार आणि केंद्र सरकार यांच्यातील वाद अधिक तीव्र झाला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू न केल्यामुळे केंद्र सरकारने शिक्षणासाठीचे १ हजार १५० कोटी रुपये रोखून ठेवले असल्याचा तमिळनाडू सरकारचा दावा आहे. "राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू करणे हे तमिळनाडूला दोन हजार वर्षे मागे ढकलण्यासारखे आहे. धोरणाची अंमलबजावणी केल्यास दोन हजार कोटी रुपयांचा निधी मिळेल, असे केंद्र सरकार सांगत आहे. मात्र, केंद्र सरकारने दहा हजार कोटी रुपये दिले तरीही आम्ही राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करणार नाही," असे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचे म्हणणे आहे. दोन हजार १५० कोटी रुपयांच्या निधीचा संबंध राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीशी न जोडता हा निधी त्वरित देण्याबाबत स्टॅलिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे.

**केंद्र सरकारची भूमिका काय?**

स्टॅलिन यांचे पत्र संघराज्य सरकार तत्त्वांच्या विरोधात असल्याची टीका केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केली आहे. तमिळनाडू राज्य नेहमीच सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीचे नेतृत्व करत आले आहे. मात्र, केवळ राजकीय कारणांसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०ला विरोध करणे हे राज्यातील विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि शैक्षणिक संस्थांना मिळणाऱ्या प्रचंड संधींपासून वंचित ठेवण्यासारखे आहे. मुळात राष्ट्रीय शिक्षण धोरण हे अतिशय लवचीक आहे. प्रत्येक राज्य त्यांच्या गरजांनुसार धोरणाची अंमलबजावणी करू शकते, असे प्रधान यांनी नमूद केले आहे.

**या वादाचे महत्त्व काय?**

राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या हाती असल्याने राज्यांकडून काही अपेक्षा ठेवल्या जाऊ शकतात. मात्र शिक्षणासाठी म्हणून राज्यांना केंद्राकडून मिळणारा बराचसा (किमान ७५ टक्के) निधी हा 'केंद्र सरकार पुरस्कृत योजनां'तून किंवा केंद्रीय, पण स्वायत्त संस्थांकडून येतो. यांनाही केंद्र सरकार निधी रोखण्यात सामील करून घेणार का, आणि तसे झाल्यास संघराज्य व्यवस्थेत गंभीर पेच उभा राहणार का, याकडे या वादाच्या निमित्ताने लक्ष राहील.

04/03/2025 | Pune | Page : 05
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता

# राज्य मंडळाच्या पेपरवाटपात घोळ

## बारावीच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी शिक्षकांकडे पोहोचल्याच नाहीत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : इयत्ता बारावीची परीक्षा सुरू झाल्यानंतर पहिल्या पेपरच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम परीक्षा संपेपर्यंत अंतिम टप्प्यात येते. मात्र, यंदा पेपरवाटपाच्या नियोजनाची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्याने घातलेल्या घोळामुळे अद्यापपर्यंत मराठी विषयाच्या उत्तरपत्रिका परीक्षकांपर्यंत पोहोचल्या नसल्याचा आरोप शिक्षकांकडून करण्यात येत आहे.

> मराठी विषयाच्या उत्तरपत्रिका सर्व परीक्षकांकडे वेळेत पोहोचल्या असून, त्या तपासणीचे काम सुरू आहे. यामध्ये काही तांत्रिक अडचण आहे का, याची माहिती घेण्यात येईल. त्याचप्रमाणे उत्तरपत्रिका नियामकांकडे पाठविताना त्याच्या नोंदी विभागीय कार्यालयाकडून घेतल्या जातात. त्यामुळे अशी कोणतीही माहिती मागवण्यात आली नाही.
> -ज्योत्स्ना शिंदे-पवार, प्र. विभागीय सचिव, राज्य मंडळ, मुंबई

तसेच शिक्षकांकडे पाठविण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांची संख्या किती आहे, याबाबत राज्य मंडळाकडून व्हॉट्सॲप ग्रुपवर माहिती मागवल्याने शिक्षकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

उत्तरपत्रिकेचे विभाजन करताना कोणतेही नियोजन न करता विषम पद्धतीने त्याचे वाटप केल्याने काही नियामकांकडे कमी, तर काही जणांकडे जास्त उत्तरपत्रिका पाठविण्यात आल्या. राज्य मंडळाकडून नियामकांकडे उत्तरपत्रिका पाठविण्यात आल्या तरी त्यांना परीक्षकांची माहिती देण्यात आली नाही. तसेच, नियामक आणि परीक्षक हे परस्परांपासून भौगोलिकदृष्ट्या दूर असल्याने परीक्षकांपर्यंत उत्तरपत्रिका उशिरा पोहोचल्या, तर काही परीक्षकांकडे उत्तरपत्रिका पोहोचल्याच नाहीत.

04/03/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# NEP's three-language policy isn't about Hindi imposition

'We consider all Indian languages as soul of *Bharatiyata* and the link to a better future for the country.' These words of Prime Minister (PM) Narendra Modi symbolise the core of the transformative National Education Policy (NEP) 2020. By ensuring foremost priority to one's mother tongue and regional languages, NEP 2020 conclusively strengthens cooperative federalism. Fabricating fictitious north-south fault lines for political profit and blatantly peddling false narratives like Hindi imposition is divisive federalism.

NEP 2020, like the earlier education policies of 1968 and 1986, follows the three-language policy. But the similarity absolutely ends there. Under the 1968 and 1986 policies, students in non-Hindi speaking states were compelled to take Hindi as the third language. But now under NEP 2020, the students are empowered to choose any regional language of their choice. The defining difference is that NEP 2020 progressively leaves the choice of the third language to the states, regions and students. This is a momentous shift in our educational policy to foster linguistic diversity in our nation.



CR Kesavan

Rinsing and repeating false binaries and strawman arguments like Hindi imposition to mislead and manipulate will not work anymore. We live in a digital age where one can effectively fact check malicious misinformation. In the 65-page NEP 2020 document, while Hindi is just mentioned once, regional languages like Tamil, Telugu, Malayalam, Kannada and Odia are mentioned more times.

The Dravida Munnetra Kazhagam (DMK) often raises the bogey of the rights and autonomy of state governments being impeded and eroded by the Centre. Education was originally in the State List of the Constitution. It was during the Emergency that education was moved to the Concurrent List, through the 42nd Amendment. Currently, Congress-led governments in Himachal Pradesh, Telangana, and Karnataka follow the three-language policy.

In 1968, the DMK government vehemently attacked and boycotted the three-language policy and since then, Tamil Nadu, regardless of the party in office, has followed the two-language policy. Today, the number of students in private schools in Tamil Nadu are higher than those in government schools. If the present state government deems it so detrimental and harmful, why are many private schools in the state still following the three-language policy? Is this not ideological dilution?

The dubious dichotomy in Tamil Nadu is that while students in many private school boards benefit from studying a third language of their choice, the disadvantaged government school students are being deprived of this option. Why is the DMK which touts its Dravida model of governance, denying government school students the valuable chance to learn great Dravidian languages like Telugu, Kannada or Malayalam? When learning a third language is the preserve of just the privileged class in private schools, how can that be true social justice?

Tamil, one the world's most ancient languages and its illustrious cultural legacy, have a special place in PM Modi's heart. Be it honouring Mahakavi Subramania Bharati's birth anniversary by celebrating it as National Language Day, installing the sacred *sengol* in the new Parliament, showcasing the historic Kashi and Saurashtra Tamil Sangamams, the publication of *Thirukkural* translations in 13 Indian languages or setting up Thiruvalluvar cultural centres across the globe, the Modi government has exhibited unswerving commitment to respecting Tamil heritage.

PM Modi recognises a civilisational connect in every Indian language. A significant moment during his 2023 Independence Day address was when he thanked the Supreme Court for its decision to provide the operative part of their judgements in regional languages. Under Modi's leadership, fostering inclusivity by preserving Indian languages has received a great fillip. We saw Kashmiri and Dogri being recognised as official languages in Jammu & Kashmir, following the abrogation of Article 370. Classical language status has been recently conferred upon Marathi, Pali, Prakrit, Assamese and Bengali. The PM has given a clarion call to provide medical, engineering and technical education in vernacular languages. Competitive exams such as JEE, NEET, and CUET are now conducted in 13 regional languages, and engineering courses are available in eight.

The visionary NEP 2020 by steadfastly prioritising one's mother tongue and regional languages, fortifies national integration. NEP 2020 is playing a pivotal role in India's journey of becoming a developed nation. Placing public good ahead of political fear-mongering will help substantially in securing a brighter future for our youth, the driving force of our nation.

*CR Kesavan is a national spokesperson of the BJP. The views expressed are personal*

Hindustan Times 4.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# शिक्षण संस्थांमध्ये समान संधी केंद्र

## 'यूजीसी'कडून नियमावलीचा मसुदा; हरकतींसाठी २८ मार्चपर्यंत मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये समान संधी केंद्र स्थापन करण्यासाठीच्या नियमावलीचा मसुदा जाहीर केला आहे. या मसुद्यावर हरकती-सूचना नोंदवण्यासाठी २८ मार्चपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

वंचित गटांसाठीची धोरणे व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर लक्ष देण्याचा या केंद्राचा उद्देश असून, शिक्षण संस्थांमध्ये समान संधी केंद्रांची रचना, कार्यपद्धती, समता पथकाची स्थापना, हेल्पलाइन सुरू करणे, समतादूत नियुक्ती करण्याचे या मसुद्याद्वारे प्रस्तावित करण्यात आले आहे.

यूजीसीने समान संधी केंद्रांच्या नियमावलीचा मसुदा संकेतस्थळावर जाहीर केला. देशातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये समता, सर्वसमावेशकता आणि भेदभावमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने ही नियमावली करण्यात आली आहे.

### समितीचे स्वरूप

उच्च शिक्षण संस्थांतील समान संधी केंद्रात संस्थेचे प्रमुख हे



पदसिद्ध अध्यक्ष असतील. सदस्य म्हणून उच्च शिक्षण संस्थेतील चार प्राध्यापक, संबंधित क्षेत्रातील अनुभव असलेले नागरी समाजाचे दोन प्रतिनिधी, शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा कौशल्य किंवा शिक्षणेतर उपक्रमांतील उत्कृष्टतेच्या आधारे निवडलेले दोन विद्यार्थी विशेष आमंत्रित म्हणून असतील. तर समन्वयक केंद्राचे सदस्य सचिव असतील. समितीमध्ये किमान एक महिला सदस्य, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती गटातील प्रत्येकी एक सदस्य असावा. तसेच, या प्रत्येक संस्थेने विभाग, वसतिगृह अशा ठिकाणी किमान एक 'समतादूत' नियुक्त करावा, असे नमूद करण्यात आले आहे.

### उल्लंघन केल्यास कठोर कारवाई

नियमावलीच्या अंमलबजावणीची देखरेख करण्यासाठी 'यूजीसी'कडून व्यवस्था निर्माण केली जाईल. नियमांचे पालन न केल्यास कारवाई नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांची समिती यूजीसीच्या समितीमार्फत केली जाईल. उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई केली जाईल. त्यात यूजीसीच्या योजनांमधून वंचित ठेवणे, पदवी अभ्यासक्रम किंवा ऑनलाइन अभ्यासक्रम प्रतिबंधित करणे, यूजीसीच्या यादीतून वगळले जाणे अशा स्वरूपाच्या कारवाईचा समावेश असेल, असा इशारा देण्यात आला आहे.

Loksatta 5.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# नॅक मूल्यांकनात बदलाचे वारे

पुढारी विशेष

गणेश खळदकर
पुढारी प्रतिनिधी

### मूल्यांकन प्रक्रिया आता केवळ ऑनलाइन करण्यात येणार

### विद्यापीठांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी अन् भ्रष्टाचार रोखण्यासाठी बदल

**पुणे : देशातील शिक्षणाचा दर्जा ठरविण्यासाठी राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेमार्फत करण्यात येणारे नॅक मूल्यांकन आता केवळ ऑनलाइन पद्धतीने केले जाणार आहे. विद्यापीठांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि मूल्यांकनातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी हा महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बदलामुळे यापुढील काळात अनेक महाविद्यालयांना देखील मूल्यांकनाच्या प्रक्रियेत सहभागी होता येणार असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.**

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या नॅक मूल्यांकनाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यातुलनेत नॅकच्या सदस्यांच्या भेटी कमी होत होत्या. या भेटी देण्यासाठी नॅककडे सदस्यांची मोठ्या प्रमाणात कमतरता होती. ऑनलाइन नॅक मूल्यांकनामुळे मोठ्या प्रमाणात वेळेची बचत होणार आहे. त्याचबरोबर प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून आर्थिक बचत देखील होणार आहे. त्यामुळे नॅकचे हे बदल अत्यंत स्वागतार्ह आहेत. कर्नाटकच्या गुंटूरमधील एका विद्यापीठाला 'ए' ग्रेड देण्यासाठी

नॅकच्या काही मूल्यांकनकर्त्यांनी संबंधितांकडून लाच घेतली होती. या प्रकरणानंतर नॅकला टीकेला सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर मूल्यांकन सुधारण्यासाठी नॅकने महाविद्यालयांची प्रत्यक्ष तपासणी थांबवली असून आता ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्याचा निर्णय घेतला आहे. नॅक मूल्यांकन ऑनलाइन करण्यासाठी विद्यापीठांसाठी एक संकरित प्रणाली तयार करण्यात येईल. ज्यामध्ये बहुतेक मूल्यांकन ऑनलाईन पद्धतीने केले जाईल. परंतु, काही पुनरावलोकनकर्ते साइटवर तपासणी देखील करतील. या नवीन धोरणांतर्गत, मूल्यांकनकर्त्यांची जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या आहेत. ऑनलाइन प्रणाली लागू झाल्यामुळे महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या मूल्यांकन प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येईल.

नॅकच्या मते, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी हा बदल आवश्यक आहे. गुंटूरमधील केएलईएफ विद्यापीठाला ए प्लस प्लस ग्रेड देण्यासाठी लाच घेतल्याच्या आरोपांच्या सीबीआय चौकशीनंतर हा निर्णय घेण्यात आला. या घोटाळ्यात सहभागी असलेल्या सात समवयस्क मूल्यांकनकर्त्यांवर नॅकने बंदी घातली आहे. याशिवाय गुणवत्ता मानके पूर्ण करण्यात अयशस्वी ठरलेल्या त्यांच्या एक पंचमांश मूल्यांकनकर्त्यांना काढून टाकण्यात आले आहे. त्याचबरोबर नॅकने एक हजाराहून अधिक नवीन समीक्षकांची नियुक्ती केली आहे, ज्यांना लवकरच प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे देखील तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

### राज्यात नॅक मूल्यांकनासाठी त्रिसूत्री

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पुढाकाराने राज्यातील महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन सक्तीचे करण्यात आले. नॅक मूल्यांकन अनेक महाविद्यालयांनी करावे, यासाठी परीसस्पर्श योजना राबविण्यात आली. देशातील एकमेव महाराष्ट्र राज्य आहे जी संबंधित योजना राबवत आहे. त्यासाठी वर्षाला तब्बल तीन कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. ज्या सुधारणा नॅक मूल्यांकन प्रक्रियेत राज्याने केल्या. त्याचा अहवाल देखील केंद्र सरकारला देण्यात आला आहे, अशा प्रकारची त्रिसूत्री ज्याला शिक्षण क्षेत्रात पाटील पॅटर्न नावाने ओळखले जाते, त्याची अंमलबजावणी करून जास्तीत जास्त महाविद्यालयांचे सध्या नॅक मूल्यांकन करण्यात येत आहे.

> नॅकमध्ये जो काही गुणात्मक बदल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तो नॅक मूल्यांकन प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीने अत्यंत स्वागतार्ह बदल आहे. नॅक ऑनलाईन करण्यात येणार असल्यामुळे पारदर्शकता येणार आहे, वेळेची बचत होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी देखील हे पूरक आहे. आता केवळ शुल्कासंदर्भात नॅकने पुनर्विचार केला तर तो राज्यासाठी महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे.
>
> \- डॉ. शैलेंद्र देवळाणकर,
> संचालक, उच्च शिक्षण संचालनालय

### नॅक मूल्यांकनाच्या शुल्कात कपात गरजेची

ग्रामीण भागातील विनाअनुदानित महाविद्यालये किंवा मुंबईसारख्या शहरातील महाविद्यालये या दोन्ही महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन करायचे असेल तर एकसारखेच शुल्क घेण्यात येते. संबंधित शुल्क अनेक महाविद्यालयांना परवडण्यासारखे देखील नसते. त्यामुळे अधिकाधिक महाविद्यालयांना मूल्यांकन प्रक्रियेत घ्यायचे असेल तर नॅक मूल्यांकनाचे शुल्क कमी करणे गरजेचे आहे. नॅक मूल्यांकनात एवढे चांगले बदल झाले आहेत. त्यामध्ये शुल्क कमी करण्याचा निर्णय झाला तर असंख्य महाविद्यालयांना त्याचा फायदा होणार आहे.

Pune Edition
Mar 05, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### संचालक, प्राचार्य व प्राध्यापकांची पदे भरा; अन्यथा कारवाई

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या अनेक महाविद्यालयांनी संचालक, प्राचार्य व प्राध्यापकांची पदे भरली नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यावर आता विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातर्फे परिपत्रक प्रसिद्ध केले असून, संबंधित महाविद्यालयांची (बीओडी) ऑनलाइनची सेवा बंद करण्यात येणार असून, संबंधित महाविद्यालयांवर विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचा इशारा विद्यापीठाचे उपकुलसचिव एस. डी. डावखर यांनी परिपत्रकाद्वारे दिला आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न अहिल्यानगर, नाशिक व पुणे जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य, संचालक तसेच प्राध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही करावी. याबाबतचे परिपत्रक ११ जून २०२४ रोजी प्रसिद्ध केले होते. परंतु, या परिपत्रकाचे पालन अनेक महाविद्यालयांनी केले नसल्याचे आढळले आहे.

बऱ्याच महाविद्यालयांनी प्राध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही सुरू केली नसल्याचे विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निदर्शनास आले आहे. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार

- **विद्यापीठाचा महाविद्यालयांना कारवाईचा इशारा**

संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या विद्यापीठ व राज्य शासनाने निश्चित केल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. त्या त्या अभ्यास व पाठ्यक्रमासाठी अध्यापन आणि प्रशिक्षण त्याचप्रमाणे संशोधन याकरिता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यासाठी पुरेशा मनुष्यबळाची आवश्यकता आहे. विद्यापीठाने दिलेल्या निर्देशाचे पालन करणे प्रत्येक संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर बंधनकारक आहे.

संलग्न महाविद्यालय व परिसंस्था यांनी दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून नियमित कायमस्वरूपी प्राचार्य, संचालक व प्राध्यापकांची पदे तातडीने भरण्याची कार्यवाही सुरू करावी; अन्यथा अशा संलग्न महाविद्यालयांची मान्यताप्राप्त परिसंस्थांची विद्यापीठाच्या पोर्टलवर असलेली बीओडी ऑनलाइनची सेवा बंद करण्यात येईल. तसेच, त्यांच्याविरुद्ध विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

Pune Edition
Mar 05, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### विद्यापीठात प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमध्ये प्रवेशासाठी आवश्यक सामाईक पात्रता परीक्षेची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज करण्यास सुरुवातीला ३ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यास आता मुदतवाढ देण्यात आली असून, विद्यार्थ्यांना येत्या १३ मार्चपर्यंत अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. तर, १८ ते २० मार्चदरम्यान पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी, तर ४ एप्रिलला पदवी प्रवेशासाठी परीक्षा घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केले आहे.

पुण्यातील विद्यापीठाच्या मुख्य संकुलासह नाशिक येथील उपकेंद्रातील अभ्यासक्रमांचाही या प्रवेश परीक्षेत सहभाग आहे. पुणे विद्यापीठात ५२ विभाग असून, दर वर्षी शेकडो विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येतात.

नगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यासह संपूर्ण देशभरातून विद्यार्थी विद्यापीठातील विभागांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करतात. पारंपरिक अभ्यासक्रमांसह व्होकेशनल, तांत्रिक, व्यवस्थापन, ललित कला, उपयोजित विज्ञानातील अनेक अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे. पूर्वी पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ओळखले जाणारे विद्यापीठ आता पदवी अभ्यासक्रमांबरोबरच सर्वसमावेशक पदवीचे केंद्र बनत आहे. त्यामुळे इयत्ता

- **विद्यार्थ्यांना १३ मार्चपर्यंत करता येणार अर्ज**

**प्रवेश परीक्षेचे स्वरूप**

- **२० गुणांचा सामान्य ज्ञान व अभियोग्यतेचा पेपर, तर ८० गुणांचा मुख्य विषयाचा पेपर असेल**
- **चुकीच्या प्रश्नाला एकचतुर्थांश गुण वजा होणार**
- **दोन तासांची ऑनलाइन प्रवेश परीक्षा**

बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाही विद्यापीठातील काही अभ्यासक्रमांना प्रवेश मिळविता येणार आहे. पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी उमेदवारांनी बारावी उत्तीर्ण केलेली असावी, तर पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी उमेदवारांनी मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान आवश्यक गुणांसह पदवीधर पदवी धारण केलेली असावी, असे पात्रतेचे निकष आहेत.

ही प्रवेश परीक्षा १०० गुणांची असून, २० गुण हे सामान्य ज्ञानावर असतात, तर ८० गुणांची संबंधित विषयाची परीक्षा असते. या परीक्षेचा कालावधी दोन तासांचा असून, ही प्रवेश परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. विद्यापीठाने केवळ अर्ज भरण्याच्या मुदतीत वाढ केली आहे. अन्य कोणताही बदल केलेला नाही. त्यामुळे परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

Pune Edition
Mar 05, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# 'सीईटी'साठी यंदा साडेसात लाखांवर अर्ज

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलतर्फे घेण्यात येणाऱ्या इंजिनिअरिंग, फार्मसी, कृषीसारख्या अभ्यासक्रमांकडे यंदा विद्यार्थ्यांचा ओढा असल्याचे दिसून येत आहे. मागील चार वर्षांच्या तुलनेत यंदा या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या विक्रमी अर्जांची नोंदणी झाली आहे.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ७ लाख ६४ हजार ३६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी अर्ज भरले आहेत. त्यामुळे यंदा सर्वच प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळणार आहे. सीईटी सेलकडून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. यंदा सीईटी सेलने या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी डिसेंबरमध्येच नोंदणी प्रक्रिया सुरू केली होती. त्यामध्ये एमएचटी-सीईटी परीक्षेसाठी ३० डिसेंबरला नोंदणी सुरू केली होती. त्याची मुदत २८ फेब्रुवारीला संपली.

- **इंजिनिअरिंग, फार्मसी, कृषीसारख्या अभ्यासक्रमांकडे यंदा विद्यार्थ्यांचा ओढा**

त्यानुसार यंदा एमएचटी-सीईटीसाठी राज्यभरातून ८ लाख ९४ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील ७ लाख ६४ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेचे शुल्क भरून नोंदणी अंतिम केली आहे. गेल्या काही वर्षांतील ही सर्वाधिक नोंदणी आहे.

गेल्या वर्षी ७ लाख २५ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सीईटी परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३८ हजार ५९५ ने वाढली आहे. यातील गेल्या वर्षी प्रत्यक्षात सहा लाख ७५ हजार विद्यार्थ्यांनी एमएचटी-सीईटी परीक्षा दिली होती. २०२१-२२ मध्ये ५ लाख ५ हजार ७८९ विद्यार्थ्यांनी अर्जनोंदणी केली होती, तर २०२२-२३ मध्ये ६ लाख ६ हजार ७९० विद्यार्थी अर्ज, २०२३-२४ मध्ये ६ लाख ३६ हजार ८०४, २०२४-२५ मध्ये ७ लाख २५ हजार ७७३, तर यंदा २०२५-२६ साठी ७ लाख ६४ हजार ३६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

एमएचटी-सीईटी परीक्षेचे वेळापत्रक सीईटी सेलने जाहीर केले आहे. त्यानुसार पीसीबी ग्रुपची एमएचटी-सीईटी परीक्षा ९ एप्रिल ते १७ एप्रिल या कालावधीत घेतली जाणार आहे, तर पीसीएम ग्रुपची एमएचटी-सीईटी परीक्षा १९ एप्रिल ते २७ एप्रिलदरम्यान होणार आहे, असे सीईटी सेलने जाहीर केले आहे. यंदा नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक ४ लाख ६३ हजार अर्ज फिजिक्स, केमिस्ट्री आणि मॅथेमॅटिक्स या विषयांचा ग्रुप असलेल्या सीईटी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी भरले आहेत; तर फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी या विषयांच्या ग्रुपची सीईटी देण्यासाठी तीन लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

Pune Edition
Mar 05, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# बी.एड., एम.एड. होणार एक वर्ष

## अभ्यासक्रमांच्या कालावधीसाठी 'एनसीटीई'चा प्रस्ताव

■ मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ४ : एक वर्ष पूर्णवेळ बी.एड. आणि एम.एड. अभ्यासक्रम पुन्हा सुरू करण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (एनसीटीई) सादर केला आहे. या नव्या प्रस्तावानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून हे दोन्ही अभ्यासक्रम एक वर्ष कालावधीसाठी राबविण्याचा नवीन प्रस्ताव सादर केला आहे.**

'एनसीटीई'ने मान्यता निकष आणि प्रक्रिया नियमावली २०२५चा मसुदा सादर केला आहे. केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (२०२०) अनुषंगाने शिक्षक शिक्षण कार्यक्रमांचे निकष आणि मानके मसुद्यात सादर केली आहेत. सध्या हा मसुदा परिषदेच्या संकेतस्थळावर खुला असून त्यावर सूचना मागविल्या आहेत. स्वतंत्र शिक्षक शिक्षण संस्थांना दोन वर्षांचा बी.एड. आणि एम.एड. अभ्यासक्रम राबवावा किंवा दोन वर्षांचा अभ्यासक्रम एक वर्षाच्या अभ्यासक्रमात रूपांतरित करावे, हा पर्याय नव्या मसुद्यानुसार खुला असेल.

दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत (एनटीए) प्रमाणित विषय आणि अभिरुची चाचणी घेण्यात येईल. या नव्या मसुद्यात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून योग, शारीरिक, संस्कृत आणि कला शिक्षणात 'आयटीईपी' अभ्यासक्रमांचे पर्याय खुले केले आहेत. मसुद्यावर शनिवारपर्यंत (ता. ८) सूचना नोंदविता येणार आहेत.

### एक वर्ष अभ्यासक्रमाचे पात्रता निकष

१. बी.एड. : पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात किमान ५० टक्के गुण किंवा चार वर्ष पदवी अभ्यासक्रमात किमान ५० टक्के गुण आवश्यक.

२. एम.एड : बी.एड. (एक वर्ष)/बी.एड. दोन वर्ष/चार वर्ष इंटिग्रेटेड टीचर्स एज्युकेशन प्रोग्रॅम (आयटीईपी) (किमान ५० टक्के गुण) किंवा बी.ए.बी.एड./बी.एस्सी.बी.एड./बी.एल.एड. (किमान ५० टक्के गुण)

Sakal 5.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 05 March 2025_003
05 Mar 2025

# तमिळ भाषेविषयी उत्तरेकडे काहीच काम कसे नाही?

## एम. के. स्टॅलिन : दक्षिण भारतीय भाषा कुणीच शिकले नाहीत



**चेन्नई, दि. ४ -** दक्षिण भारतीय नागरिकांना हिंदी शिकायला लावण्यासाठी दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा स्थापन होऊन एक शतक झाले आहे. इतक्या वर्षांत उत्तर भारतात किती तमिळ प्रचार सभा स्थापन झाल्या आहेत? अथवा एक तरी दक्षिण भारतीय भाषा शिकण्यासाठी उत्तरेत किती अकादमी आहेत? सत्य हे आहे की, आम्ही कधीही उत्तर भारतीयांनी त्यांचे संरक्षण करण्यासाठी तमिळ किंवा इतर कोणतीही दक्षिण भारतीय भाषा शिकावी अशी मागणी केली नाही. फक्त हिंदी भाषा आमच्यावर लादू नका. जर भाजपशासित राज्यांना ३ किंवा ३० भाषा शिकवायच्या असतील तर त्यांना ते करू द्या! तमिळनाडूला एकटे सोडा, असे प्रतिपादन तमिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी केले आहे.

दरम्यान, तमिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी रविवारी केंद्र सरकारच्या राज्यावर हिंदी लादण्याच्या कथित प्रयत्नांविरुद्ध कडक इशारा दिला. त्यांनी जाहीर केले की, तमिळनाडू कधीही नवीन शिक्षण धोरण आणि कोणत्याही स्वरूपात हिंदी लादणे स्वीकारणार नाही. शिवाय स्टॅलिन यांनी स्पष्ट केले आहे की तमिळनाडू एनईपी, सीमांकन आणि हिंदी लादण्यास नकार देते. त्यांनी केंद्र सरकारवर राष्ट्रीय शिक्षण परिषदेच्या माध्यमातून हिंदी लादण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला.

### शिक्षणमंत्र्यांचे त्रिभाषा धोरणाबाबत स्पष्टीकरण

दरम्यान, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या माध्यमातून भारतीय भाषांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्व पुन्हा सांगितले. सर्व भारतीय भाषांना समान अधिकार आहेत आणि सर्व समान पद्धतीने शिकवल्या पाहिजेत, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. तमिळनाडूतील काही लोक राजकीय हेतूने याला विरोध करत आहेत. आम्ही राष्ट्रीय शिक्षण धोरणात कुठेही असे म्हटलेले नाही की फक्त हिंदी शिकवली जाईल. उत्तराखंडमधील हरिद्वार येथे ते बोलत होते. एनईपीच्या त्रिभाषिक धोरणात हिंदी ही एकमेव भाषा म्हणून लादली जात नाही असे त्यांनी म्हटले आहे.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

### प्राध्यापक पदे भरण्याचे निर्देश

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या अनेक महाविद्यालयांनी संचालक, प्राचार्य आणि प्राध्यापकांची पदे भरली नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा महाविद्यालयांची ऑनलाइन सेवा बंद करण्याचा; तसेच दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. विद्यापीठाचे उपकुलसचिव एस. डी. डावखर यांनी याबाबतचे पत्रक प्रसिद्ध केले आहे.

विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यामधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या विद्यापीठ आणि राज्य सरकारने निश्चित केल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. त्या-त्या अभ्यास आणि पाठ्यक्रमासाठी अध्यापन, प्रशिक्षण त्याचप्रमाणे संशोधन यासाठी कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यासाठी पुरेशा मनुष्यबळाची आवश्यकता आहे. विद्यापीठाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे प्रत्येक संलग्न महाविद्यालयास बंधनकारक आहे.

Maharashtra Times 5.3.2025

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'भारतीय ज्ञान परंपरा' विषयावर प्रशिक्षण

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात यूजीसी-मालवीय मिशन शिक्षण प्रशिक्षण केंद्रामार्फत महाराष्ट्रातील प्राध्यापकांसाठी 'भारतीय ज्ञान परंपरा' बाबतचे सहा दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन विद्यापीठ अनुदान मंडळाचे सचिव प्रा. मनिष जोशी, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांचे हस्ते झाले. यावेळी प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे, युजीसी – मालवीय मिशन शिक्षण प्रशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. सुभाष केंद्रे, भारतीय ज्ञान परंपरा केंद्राच्या समन्वयक डॉ. मुग्धा गाडगीळ आदींसह ६५ हून अधिक प्रशिक्षणार्थी शिक्षक-प्राध्यापक उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अग्रेसर आहे. भारतीय ज्ञान परंपरेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्यासंबंधित कौशल्ये विकसित करण्यासाठीही पुढाकार घेत मोलाचे योगदान निश्चित देईल असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी केले. भारतीय ज्ञान परंपरा हा विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा विषय आहे. तो त्यांच्यापर्यंत परिणामकारकतेने पोहोचविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची गरज असल्यामुळे विद्यापीठ अनुदान मंडळामार्फत अशा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर भारतीय ज्ञान परंपरेची वर्तमान परिस्थितीशी सांगड घालून समाजोपयोगी बदल करणेही अतिशय गरजेचे असल्याचे प्रा. मनिष जोशी यांनी सांगितले. सूत्रसंचालन डॉ. सुमन पांडे यांनी केले. प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे यांनी आभार मानले.

Kesari 5.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# तातडीने पदभरती करा, अन्यथा कारवाई

## विद्यापीठाचा संलग्न महाविद्यालयांना इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न अनेक महाविद्यालयांनी संचालक, प्राचार्य आणि प्राध्यापकांची पदे भरली नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. महाविद्यालयांनी तातडीने पदभरतीची कार्यवाही सुरू करावी अन्यथा संबंधित महाविद्यालयांची ऑनलाइन सेवा बंद करण्याचा; तसेच दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा विद्यापीठाने दिला आहे.

विद्यापीठाचे उपकुलसचिव एस. डी. डावखर यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यामधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या विद्यापीठ आणि राज्य सरकारने निश्चित केल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. त्या त्या अभ्यास आणि पाठ्यक्रमासाठी अध्यापन, प्रशिक्षण त्याचप्रमाणे संशोधन यासाठी कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यासाठी पुरेशा मनुष्यबळाची आवश्यकता आहे. विद्यापीठाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे प्रत्येक संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्थेवर बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य, संचालक आणि प्राध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबतचे परिपत्रक पत्रक ११ जून २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते. मात्र, त्याचे पालन अनेक महाविद्यालयांनी केले नसल्याचे अधिकार मंडळाच्या निदर्शनास आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### विद्यापीठातील रिक्त पदांचे काय?

एकीकडे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांना पदभरती करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, विद्यापीठातच कुलसचिव, अधिष्ठाता, परीक्षा व मूल्यमापन संचालक अशी महत्त्वाची पदे रिक्त आहेत. त्याशिवाय शैक्षणिक विभागांतही प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. रिक्त पदांमुळे अतिरिक्त कार्यभाराने कामकाज करावे लागत आहे. त्यामुळे पदभरती न केल्यास कारवाईचा इशारा महाविद्यालयांना देताना विद्यापीठातील रिक्त पदे कधी भरली जाणार, असा प्रश्न शिक्षण क्षेत्रातून उपस्थित करण्यात येत आहे.

06/03/2025 | Pune | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# परीक्षांच्या वेळापत्रकाला विरोध

### अधिकारांत ढवळाढवळ होत असल्याचा आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) राज्यातील पहिली ते नववीच्या परीक्षांसाठी जाहीर केलेल्या वेळापत्रकावर शिक्षण क्षेत्रातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शासन मुख्याध्यापकांचा अधिकार हिसकावून घेत असल्याची टीका होत असून परीक्षा, वेळापत्रक अशा अनेक गोष्टींत शाळांना स्वातंत्र्य दिले, तरच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील ध्येय प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने काही होऊ शकेल, असे मत मुख्याध्यापक, शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांनी मांडले आहे.

कोणतीही चर्चा न करता शासनाचे अधिकारी मुख्याध्यापकांचा अधिकार हिसकावून घेऊ पाहत आहेत,' असे मत माजी मुख्याध्यापक महेंद्र गणपुले यांनी मांडले. तर 'परीक्षा, वेळापत्रक अशा अनेक गोष्टींत शाळा आणि शिक्षकांना

> कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची, प्राधिकरणाची मान्यता न घेता, संविधानातील तरतुदी, कायदे, नियम डावलून मनमानीपणा करण्याची प्रवृत्ती शासनातच वाढलेली आहे. बोर्डाचे अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके आणि शिक्षक-प्रशिक्षणे ही कामे विधिमंडळाला डावलून 'एसीईआरटी'कडे वर्ग केली आहेत, हा मनमानीपणाचा कळसचआहे.
>
> **- डॉ. वसंत काळपांडे,**
> माजी शिक्षण संचालक

स्वातंत्र्य दिले, तरच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील ध्येय प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने काही होऊ शकेल, असे बालभारतीच्या माजी विद्या सचिव धनवंती हर्डीकर यांनी सांगितले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळातर्फे वेळापत्रकात बदल करण्याची मागणी 'एससीईआरटी'कडे करण्यात आली आहे.

07/03/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

---

सामना

# मुलींना १०० टक्के फी माफ

### महिला दिनानिमित्त मुख्यमंत्र्यांची घोषणा

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) - जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत मोठी घोषणा केली. मुलींना शिक्षण शुल्कात १०० टक्के फी माफ करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. सभागृहातील सर्व सदस्यांनी बाकं वाजवून या घोषणेचे स्वागत केले.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासन मुलींना शिक्षण शुल्कात ५० टक्के सवलत देते. यापुढे ही सवलत १०० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. या वर्षी २०२४-२५मध्ये पात्र ७३ हजार ८४२ मुली होत्या. त्यांना १०० टक्के शुल्क माफ केले आहे. ज्या मुलींना आतापर्यंत ५० टक्के फी माफी दिली जात होती, त्यांनादेखील यापुढे सरसकट १०० टक्के फी माफी देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

Pune Edition
Mar 08, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 08 Mar 2025_015
08 Mar 2025

# विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे मूल्यांकन होणार

## शासनाचा निर्णय; दर्जा उंचावण्यासह स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी निर्णय

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ७ -** विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना मानांकन देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता विद्यापीठाच्या विभागांकडून झालेल्या कामगिरीचे मूल्यांकन करून विभागाची क्रमवारी जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना आपल्या दर्जात सुधारणा करावी लागणार आहे.

मुंबई विद्यापीठाने संशोधनाला चालना देण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक विभागांना मानांकन देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर हा उपक्रम राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठांमध्ये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याबाबतचा शासन निर्णय उच्च शिक्षण विभागाने आज प्रसिद्ध केला आहे. यापूर्वी फक्त विद्यापीठ व महाविद्यालयांचे नॅकद्वारा मूल्यांकन केले जात असे. आता विद्यापीठाकडूनच त्यांच्या शैक्षणिक विभागांचे मूल्यांकन केले जाणार आहे.

### गुणवत्तेचा लागणार कस...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सुमारे ५४ शैक्षणिक विभाग आहेत. यात विशेषत: विज्ञान शाखेच्या बहुसंख्य विभागातील संशोधनाचा दर्जाचा सर्वोत्तम आहे. आता विभागांचे मूल्यांकन आणि क्रमवारी जाहीर केली जाणार असल्याने त्यांच्यात गुणवत्तेची स्पर्धा लागेल. त्यातून विद्यापीठाचे नावलौकिक वाढण्यास आणखी मदत होणार आहे.

हा उपक्रम दरवर्षी १ जुलै ते ३० जून या शैक्षणिक वर्षातील विभागांच्या शैक्षणिक, संशोधन व इतर कामगिरीच्या आधारित राबविण्यात यावा. या कालावधीत विद्यापीठाच्या विभागांकडून झालेल्या कामगिरीचे मूल्यांकन करून विभागाची क्रमवारी जाहीर करण्याची कार्यवाही जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत करण्यात यावी, असेही राज्य शासनाने स्पष्ट केले आहे.

विभागांना मानांकन देण्याबाबतच्या उपक्रमाचे परिपत्रक संबंधित विद्यापीठांनी जुलै महिन्याच्या पहिल्या अथवा दुसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध करावे. विभागांनी आवश्यक ती कागदपत्रे दोन आठवड्यांत संबंधित प्रणालीवर अपलोड करावी आणि बाहेरील तज्ज्ञ समितीकडून मूल्यांकन पूर्ण करून घ्यावे. त्यांच्या अहवालानुसार विभागांची क्रमवारी जाहीर करावी. निकषानुसार सर्वोच्च गुण प्राप्त विभागास अनुदान, प्रशस्तिपत्र, सन्मानचिन्ह प्रदान करावे. ज्या विभागांना निकषांनुसार कमी गुण प्राप्त झाले आहेत, अशा विभागांना त्यांचे मूल्यांकन उंचावण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी, असेही शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# उच्च शिक्षणही तमिळमध्ये द्या

### भाषावादावरून अमित शहा यांचे आव्हान

वृत्तसंस्था, रानीपेट (तमिळनाडू)

देशात लागू करण्यात आलेल्या नव्या शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा सूत्रावरून तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या वादात शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही उडी घेतली. 'तमिळनाडूतील विद्यार्थ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्र्यांनी इंजिनीअरिंग आणि मेडिकलचे शिक्षण तमिळ भाषेत सुरू करावे,' असे आव्हान शहा यांनी स्टॅलिन यांना शुक्रवारी दिले.

तमिळनाडूतील आरटीसी तक्कोलम येथे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या ५६व्या स्थापना दिनानिमित्त कार्यक्रमात शहा बोलत होते. हिंदी भाषा लादली जात असल्याच्या आरोपाबाबत ते म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने काही चांगले बदल केले आहेत. त्यामुळे आता केंद्रीय सशस्त्र दलात सहभागी होऊ इच्छिणारे तरुण-तरुणी आपापल्या स्थानिक भाषांमध्ये परीक्षा देऊ शकतात. तमिळनाडूतील परीक्षार्थी तमिळमध्ये उत्तरे लिहू शकतील, अशी व्यवस्था आमच्या सरकारने केली आहे.'

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या माध्यमातून दक्षिणेतील राज्यांवर हिंदी भाषा लादली जात असल्याचा आरोप मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी द्रमुक पक्ष सातत्याने करीत आहे. केंद्र सरकारने हा आरोप निराधार असल्याचे स्पष्ट केले आहे.

Maharashtra Times 8.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# बीएड आता राष्ट्रीय पातळीवर

## राज्याचा अभ्यासक्रम रद्द; 'एनटीए' राबविणार आयटीईपीसाठी प्रवेश परीक्षा

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राष्ट्रीय अध्यापक शिक्षक परिषदेच्या म्हणजेच 'एनसीटीई'च्या सूचनेनुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून चार वर्षीय बीए/बीएस्सी-बीएड (एकात्मिक) हा अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता या अभ्यासक्रमाऐवजी चार वर्षांचा एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम म्हणजेच 'इंटिग्रेटेड टीचर्स एज्युकेशन प्रोग्राम' (आयटीईपी) हा अभ्यासक्रम घेतला जाईल. त्यासाठीची प्रवेश परीक्षा 'एनटीए'द्वारे राबवली जाणार आहे.

बीए/बीएस्सी या विषयांमध्ये बीएड करण्यासाठीचा चार वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे राबवला जात होता. दर वर्षी या परीक्षेच्या 'सीईटी'साठी अडीच ते तीन हजार उमेदवार अर्ज भरतात. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची प्रक्रिया 'सीईटी' कक्षाद्वारे राबवली जात होती. हा अभ्यासक्रम २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून बंद करून त्याचे रूपांतर चार वर्षांच्या एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात करण्याचा निर्णय 'एनसीटीई'ने घेतला. या निर्णयाबाबत राज्यातही चर्चा झाली असून, त्याला उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता देऊन हा बदल स्वीकारला आहे. त्यामुळे या अडीच हजार विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील 'सीईटी' द्यावी लागणार आहे.



(चित्र : एआय)

### शुल्क परत मिळणार

याआधी 'सीईटी' कक्षाकडून होणाऱ्या चार वर्षांच्या बीए/बीएस्सी बीएड या एकात्मिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी अनेक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. मात्र, आता ही परीक्षा रद्द झाल्याने या उमेदवारांना ऑनलाइन अर्ज नोंदणी करताना भरलेले शुल्क परत मिळणार आहे. अर्ज भरताना ज्या बँक खात्यातून शुल्क भरले होते, त्याच बँक खात्यात हे शुल्क परत करण्यात येईल. याबाबतची सूचना राज्य सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर लवकरच जाहीर होणार आहे.

### आता काय होणार?

'एनसीटीई'ने या संदर्भातील माहिती फेब्रुवारी महिन्यातच सर्व महाविद्यालयांना कळवली होती. या महाविद्यालयांना 'आयटीईपी' अभ्यासक्रम राबवण्यासाठी परिषदेकडे अर्ज करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, बीए/बीएस्सी एकात्मिक बीएड अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी सीईटी कक्षाने डिसेंबर २०२४ मध्येच अर्जनोंदणी सुरू केली होती. तसेच या परीक्षेची तारीखही जाहीर करण्यात आली होती. मात्र, आता उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पत्रानुसार सीईटी कक्षाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४ वर्षांच्या बी.ए./बी.एस्सी-बी.एड (एकात्मिक) प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना 'एनटीए'मार्फत राबविण्यात येणाऱ्या 'एनसीईटी २०२५'साठी ऑनलाइन अर्ज करण्याचा सल्ला दिला आहे.

हा अभ्यासक्रम 'एनसीटीई'कडे गेल्याने त्याची प्रवेश प्रक्रिया राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे (एनसीईटी) राबवली जाणार आहे. ही परीक्षा 'एनटीए'द्वारे २९ एप्रिल रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्जनोंदणी सुरू झाली असून, १६ मार्च ही अंतिम तारीख आहे. www.nta.ac.in या आणि https: //exams. nta. ac.in/ NCET/ या दोन संकेतस्थळांवर जाऊन उमेदवारांना अर्ज नोंदवता येईल.

Maharashtra Times 10.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# शैक्षणिक विभागांना मिळणार मानांकन

## विद्यापीठांमधील विभागांची यंदापासून क्रमवारी होणार जाहीर

**पुणे, ता. ९ : राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावून त्यांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर अग्रगण्य ओळख मिळवून देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. विद्यापीठांतर्गत शैक्षणिक विभागांना विविध मानदंड आणि निकषांवर आधारित मानांकन देण्याचा उपक्रम राज्यातील विद्यापीठांकडून राबविण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अध्यादेशाद्वारे स्पष्ट केले आहे.**



### वर्षभरातील कामगिरीवर ठरणार श्रेणी

■ हा उपक्रम दरवर्षी एक जुलै ते ३० जून या शैक्षणिक वर्षातील विभागांच्या शैक्षणिक, संशोधन आणि इतर कामगिरीवर आधारित राबविण्यात यावा. या कालावधीत विद्यापीठाच्या विभागांकडून झालेल्या कामगिरीचे मूल्यांकन करून विभागांची क्रमवारी जाहीर करण्याची कार्यवाही त्यानंतरच्या जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत करण्यात येईल, असा आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिला आहे.

मुंबई विद्यापीठाने विविध शैक्षणिक विभागांतील संशोधनाला चालना देणे, उपलब्ध संसाधनांचा पुरेपूर वापर करणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविणे, कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि जबाबदारी आणणे आणि एक स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठांतर्गत विभागांना मानांकन देण्याचा उपक्रम राबविला आहे. त्याचे चांगले परिणाम दिसून आले. मुंबई विद्यापीठाचा अनोखा प्रयोग विचारात घेऊन हा उपक्रम राज्यातील अन्य विद्यापीठांमध्ये राबविण्याची आवश्यकता निदर्शनास आली. त्यानुसार राज्यातील सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठांकडून विद्यापीठांतर्गत विभागांना 'युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर्क' (यूडीआरएफ) याद्वारे मानांकन देण्याचा उपक्रम राबविण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

यात दरवर्षी विद्यापीठांतर्गत सर्व विभागांच्या मागील वर्षाच्या गुणांकनाची क्रमवारीची कार्यवाही पुढील वर्षी जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत होणे अपेक्षित आहे. यंदाच्या वर्षी हा कालावधी उलटून गेल्याने केवळ या वर्षापुरता हा कालावधी मार्च ते मे असा राहणार आहे, असेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

" सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत विविध विभागांचे सध्या प्रशासकीय आणि शैक्षणिक लेखा परीक्षण (ऑडिट) करण्यात येते. त्याद्वारे विभागांना श्रेणी दिली जाते. परंतु, विभागांची क्रमवारी जाहीर करण्यात आल्यानंतर आणखी सकारात्मक बदल होतील. क्रमवारीत सर्वोत्कृष्ट असणाऱ्या विभागांना कदाचित निधी देताना फायदा होण्याची चिन्हे आहेत.

**- डॉ. विनायक जोशी,** विभागप्रमुख, संगणकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

" विद्यापीठांतर्गत सर्व विभागांची क्रमवारी जाहीर करण्याच्या प्रक्रियेतून विभागांमधील संवाद वाढेल. एका विभागाला दुसऱ्या विभागात सुरू असलेले विविध प्रकल्प, प्रयोगांची माहिती मिळेल, तसेच प्राध्यापक, कौशल्यांची प्रशंसा होईल. विद्यापीठांतर्गत विभागांमध्ये माहिती, ज्ञान आणि कौशल्यांची देवाण-घेवाण वाढेल. संशोधने अधिक सक्षमपणे करण्यास चालना मिळेल.

**- डॉ. विकास मठे,** विभागप्रमुख, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड इन्स्ट्रुमेंटेशन सायन्स, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Sakal 10.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# विद्यापीठांच्या विभागांसाठी आता 'यूडीआरएफ' रँकिंग

## 'एनआयआरएफ' आणि 'क्यूएस'च्या धर्तीवर केले जाणार मूल्यांकन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**उच्च शिक्षण विभागाने आता विद्यापीठांतील विभागांचेही मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व अकृषी आणि सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावून संशोधनाला चालना देणे हा यामागे उद्देश आहे. त्यानुसार एनआयआरएफ आणि क्यूएस मूल्यांकनाच्या धर्तीवर युनिव्हर्सिटी डिपार्टमेंटल रँकिंग फ्रेमवर्क (यूडीआरएफ) तयार करण्यात आले आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासूनच त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.**

राज्यातील विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना मूल्यांकन देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ज्या नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्कमध्ये (एनआयआरएफ) सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या क्रमवारीत राज्यातील विद्यापीठे मागे पडली, त्याच एनआयआरएफच्या धर्तीवर हे मूल्यांकन केले जाणार आहे. त्यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध करण्यात आला असून, त्यानुसार विद्यापीठाच्या विभागांकडून झालेल्या कामगिरीचे मूल्यांकन करून विभागाची क्रमवारी जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना दर्जात सुधारणा करावी लागणार आहे.

यापूर्वी फक्त विद्यापीठ व महाविद्यालयांचे नॅकद्वारे मूल्यांकन केले जात असे. आता विद्यापीठाकडूनच त्यांच्या शैक्षणिक विभागांचे मूल्यांकन केले जाणार आहे. हा उपक्रम दरवर्षी १ जुलै ते ३० जून या शैक्षणिक वर्षातील विभागांच्या शैक्षणिक, संशोधन व इतर कामगिरीच्या आधारित राबविण्यात यावा. या कालावधीत विद्यापीठाच्या विभागांकडून झालेल्या कामगिरीचे मूल्यांकन करून विभागाची क्रमवारी जाहीर करण्याची कार्यवाही जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत करण्यात यावी, असेही राज्य शासनाने स्पष्ट केले आहे.

विभागांना मूल्यांकन देण्याबाबतच्या उपक्रमाचे परिपत्रक संबंधित विद्यापीठांनी जुलै महिन्याच्या पहिल्या अथवा दुसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध करावे. विभागांनी आवश्यक ती कागदपत्रे दोन आठवड्यांत संबंधित प्रणालीवर अपलोड करावीत आणि बाहेरील तज्ज्ञ समितीकडून मूल्यांकन पूर्ण करून घ्यावे. त्यांच्या अहवालानुसार विभागांची क्रमवारी जाहीर करावी. निकषानुसार सर्वोच्च गुण प्राप्त विभागास अनुदान, प्रशस्तिपत्र, सन्मानचिन्ह प्रदान करावे. ज्या विभागांना निकषांनुसार कमी गुण प्राप्त झाले, अशा विभागांना त्यांचे मूल्यांकन उंचावण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी, असेही शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### विभागांचे असे केले जाणार मूल्यांकन

विद्यापीठांच्या विभागांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी पाच घटक ठरविले आहेत. यामध्ये प्राध्यापकांनी केलेले संशोधन आणि व्यावसायिक उपक्रमांसाठी ३०० गुण, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि अध्यापन प्रक्रियेसाठी १०० गुण, प्रशासन आणि विभागीय कार्यप्रणालीसाठी ११० गुण, विद्यार्थ्यांच्या प्रगती आणि संधींसाठी १४० गुण, तर कार्यशाळा, संमेलन आणि सहकार्य उपक्रमांसाठी ७५ गुण दिले जाणार आहेत.

Pune Edition
Mar 09, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### बीए/बीएस्सी, बीएड (एकात्मिक) अभ्यासक्रम बंद

**अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश परीक्षा शुल्क परतावा**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटीसेलकडून विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. यामधील बीए/बीएस्सी, बीएड (एकात्मिक) अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय राष्ट्रीय अध्यापक शिक्षक परिषद अर्थात एनसीटीईने घेतला आहे. त्यामुळे संबंधित अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा शुल्क परतावा देण्याचा निर्णय सीईटीसेलने घेतला आहे.

एनसीटीईने ४ वर्षीय बीए/बीएस्सी, बीएड (एकात्मिक) अभ्यासक्रम बंद करून ४ वर्षीय एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम या अभ्यासक्रमामध्ये परिवर्तित केला आहे. त्यानुसार, उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून चार वर्षांच्या बीए/बीएस्सी, बीएड (एकात्मिक) अभ्यासक्रमासाठी सामाईक प्रवेश परीक्षा आणि केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येऊ नये असे कळविले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षात चार वर्षांच्या बीए/बीएस्सी-बीएड (एकात्मिक) अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेचे भरलेले शुल्क उमेदवारांना परत करण्यात येणार आहे. त्याबाबत लवकरच संकेतस्थळावर स्वतंत्र सूचना प्रदर्शित केली जाणार असल्याची माहिती सीईटी सेलकडून देण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये चार वर्षांच्या बीए /बीएससी-बीएड (एकात्मिक) सीईटी २०२५ अभ्यासक्रमासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएद्वारे आयोजित चार वर्षीय एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय सामाईक प्रवेश परीक्षा एनसीईटी २०२५ साठी ऑनलाइन अर्ज भरण्याचा सल्ला देण्यात आला. इच्छुक आणि पात्र उमेदवार अधिकृत संकेतस्थळ https:///exams.nta.ac.in/NCET वर जाऊन अर्ज भरू शकतात. तसेच, चार वर्षीय बीए /बीएस्सी, बीएड (एकात्मिक) हा अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाविद्यालयांना चार वर्षीय एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम या अभ्यासक्रमामध्ये परावर्तित होत असल्याबाबत राष्ट्रीय अध्यापक शिक्षक परिषदेकडून कळविले आहे.

Pune Edition
Mar 10, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### पुढच्या वर्षाचे शैक्षणिक कामकाज २३४ दिवसांचे

**शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांची माहिती**

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

**आतापर्यंत १५ एप्रिलपर्यंत परीक्षा घेण्याची पद्धत रूढ होती. मात्र, नव्या वेळापत्रकानुसार परीक्षा मार्चपर्यंत पूर्ण करून एप्रिलपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू केले जाणार आहे. शैक्षणिक वर्षाच्या कामकाजाचे दिवस २३४ असणार आहेत. विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी विशेष वर्ग घेतले जाणार असून, शालेय शिक्षणात नवे बदल होतील, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली.**

राज्यातील शाळांमध्ये पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा, संकलित चाचणी २ यासाठी जाहीर केलेल्या वेळापत्रकाबाबतच्या शिक्षकांनी मांडलेल्या समस्यांच्या खोलात जाऊन आवश्यकतेनुसार उपाययोजना केल्या जातील, असे राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे आयुक्त राहुल रेखावार यांनी स्पष्ट केले.

राज्यातील पहिली ते नववीच्या परीक्षा एकाच वेळी घेण्यासाठीचे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने जाहीर केले आहे. त्यानुसार ८ ते २५ एप्रिल या कालावधीत नियतकालिक मूल्यांकन चाचणी, संकलित चाचणी २ या परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. परीक्षा एप्रिलअखेरपर्यंत लांबणार असल्याने उत्तरपत्रिका तपासणे, निकाल तयार करण्यास वेळच मिळणार नसल्याचा मुद्दा शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून उपस्थित करण्यात आला. या अनुषंगाने मुख्याध्यापक संघ महामंडळाचे अध्यक्ष तानाजी माने यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार यांची भेट घेऊन वेळापत्रकात बदल करण्याची मागणी केली.

रेखावार म्हणाले, वेळापत्रकामुळे निर्माण होणाऱ्या समस्या शिक्षकांकडून मांडण्यात आल्या. त्या समस्यांना उत्तरेही देण्यात आली. आता नव्या रचनेनुसार शैक्षणिक कामकाज २३४ दिवस करावे लागणार आहे.

**विद्यार्थ्यांसाठी विशेष वर्ग**

विद्यार्थ्यांसाठी विशेष वर्ग घेण्यात येणार असून, त्याचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे हे मुख्य उद्दिष्ट समोर ठेवून सामूहिक प्रयत्न करावे लागणार आहेत, असे मंत्री भुसे यांनी सांगितले.

Pune Edition
Mar 10, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# ‘बीएड’च्या प्रवेश परीक्षेसाठी विक्रमी नोंदणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्रातील पदवीसाठी आवश्यक असलेल्या बी.एड (सामान्य व विशेष), बीएड-एमएड, एमएड आणि एम.पी.एड या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेच्या नोंदणीला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. बीएड अभ्यासक्रमासाठी पाच वर्षांतील विक्रमी अर्ज नोंदणी झाली असून, यंदा एक लाख १६ हजार ५०० विद्यार्थ्यांनी शुल्क भरून अर्ज निश्चित केले आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी चुरस रंगणार आहे.

शिक्षणशास्त्रअंतर्गत येणाऱ्या या अभ्यासक्रमांच्या या प्रवेश परीक्षा मार्चमध्ये होणार आहेत. त्यासाठी राबविण्यात आलेली नोंदणी प्रक्रिया २८ फेब्रुवारी रोजी संपुष्टात आली. मात्र, अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज अर्धवट असल्याने व अनेकांनी शुल्क भरलेले नसल्याने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने विद्यार्थ्यांना ५ मार्चपर्यंत संधी दिली होती. या संधीचा अनेक विद्यार्थ्यांनी लाभ घेत नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यानुसार यंदा बी.एड अभ्यासक्रमासाठी राज्यभरातून १ लाख १६ हजार ५०० विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी केली आहे. मागील पाच वर्षांमधील ही सर्वाधिक अर्ज नोंदणी आहे. यंदा ही परीक्षा २४ मार्च रोजी होणार आहे.

10/03/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

सामना

# संचालक, प्राचार्य, प्राध्यापकांची पदे भरा

## अन्यथा बीओडी ऑनलाइनची सेवा होणार बंद

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी ) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न अनेक महाविद्यालयांनी संचालक, प्राचार्य व प्राध्यापकांची पदे भरली नसल्याचे समोर आले आहे. त्यावर आता विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातर्फे परिपत्रक प्रसिद्ध केले असून, संबंधित महाविद्यालयांची ऑनलाइनची सेवा बंद करण्यात येणार असून संबंधित महाविद्यालयांवर विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई केली जाणार आहे, विद्यापीठाचे उपकुलसचिव एस. डी. डावखर यांनी याबाबतचे पत्रक प्रसिद्ध केले आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न अहिल्यानगर, नाशिक व पुणे जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य, संचालक तसेच प्राध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही करावी. याबाबतचे पत्रक ११ जून २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते. मात्र, या पत्रकाचे पालन अनेक महाविद्यालयांनी केले नसल्याचे आढळून आले आहे. बऱ्याच महाविद्यालयांनी प्राध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही सुरू केली नसल्याचे विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निदर्शनास आले आहे.

विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या विद्यापीठ व राज्य शासनाने निश्चित केल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. त्या-त्या अभ्यास व पाठ्यक्रमासाठी अध्यापन आणि प्रशिक्षण त्याचप्रमाणे संशोधन याकरिता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यासाठी पुरेशा मनुष्यबळाची आवश्यकता आहे. विद्यापीठाने दिलेल्या निर्देशाचे पालन करणे प्रत्येक संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर बंधनकारक आहे.

संलग्न महाविद्यालय व परिसंस्था यांनी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून नियमित कायमस्वरूपी प्राचार्य संचालक व प्राध्यापकांची पदे तातडीने भरण्याची कार्यवाही सुरू करावी, अन्यथा अशा संलग्न महाविद्यालयांची मान्यता प्राप्त परिसंस्थांची विद्यापीठाच्या पोर्टलवर असलेली बीओडी ऑनलाइनची सेवा बंद करण्यात येईल. तसेच त्यांच्याविरुद्ध विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

Pune Edition
Mar 10, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठांच्या विभागांचे आता मूल्यांकन

### उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा निर्णय; विविध क्रमवाऱ्यांतील स्थान उंचाविण्याचा उद्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) राज्यातील विद्यापीठांची पीछेहाट झाल्याने, विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठ विभाग क्रमवारी आराखडा (यूडीआरएफ) तयार करण्यात आला आहे. त्यात विद्यापीठातील विभागांच्या कामगिरीचे मूल्यांकन करून विभागांची क्रमवारी जाहीर केली जाईल.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. शैक्षणिक विभागातील संशोधनाला चालना देणे, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम राबवणे, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठांतील विभागांना मानांकन देणे, असा उपक्रम मुंबई विद्यापीठाने राबवला. त्याचे चांगले परिणाम दिसून आले.

त्यामुळे हा उपक्रम राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये राबवण्याची आवश्यकता निदर्शनास आली. त्यानुसार, आता एनआयआरएफ, क्यूएस क्रमवारीत सर्व अकृषी आणि सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, संशोधनाला चालना देणे, या उद्देशाने विद्यापीठांतील विभागांच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाणार आहे. त्यात १ जुलै ते ३० जून या शैक्षणिक वर्षातील विभागांची शैक्षणिक, संशोधन आणि इतर कामगिरी विचारात घेतली जाईल. विद्यापीठानेच मूल्यांकन करून विभागांची क्रमवारी जाहीर करण्याची कार्यवाही जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत करावी, असे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

'विभागांच्या मूल्यांकनाबाबतच्या उपक्रमाचे परिपत्रक संबंधित विद्यापीठांनी जुलैच्या पहिल्या अथवा दुसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध करावे. विभागांनी आवश्यक ती कागदपत्रे दोन आठवड्यांत संबंधित प्रणालीवर अपलोड करावीत. बाहेरच्या तज्ज्ञ समितीकडून मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. त्यांच्या अहवालानुसार विभागांची क्रमवारी जाहीर करावी. निकषांनुसार सर्वोच्च गुणप्राप्त विभागास अनुदान, प्रशस्तिपत्र, सन्मानचिन्ह प्रदान करावे. निकषांनुसार कमी गुण मिळालेल्या विभागांनी त्यांचे मूल्यांकन उंचावण्याच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात,' असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### मूल्यांकनाची कार्यपद्धती

विद्यापीठांच्या विभागांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी पाच निकष निश्चित करण्यात आले आहेत. एकूण ७२५ गुणांसाठी मूल्यांकन केले जाणार आहे. त्यात प्राध्यापकांनी केलेले संशोधन आणि व्यावसायिक उपक्रमांसाठी ३०० गुण, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि अध्यापन प्रक्रियेसाठी १०० गुण, प्रशासन आणि विभागीय कार्यप्रणालीसाठी ११० गुण, विद्यार्थ्यांची प्रगती आणि संधींसाठी १४० गुण, तर कार्यशाळा, संमेलन आणि सहकार्य उपक्रमांसाठी ७५ गुण दिले जाणार आहेत.

### चालू वर्षाची प्रक्रिया मार्च ते मेदरम्यान

चालू वर्षापुरता मूल्यांकन कालावधी मार्च ते मे २०२५ असा राहील. त्यामुळे चालू वर्षासाठी विद्यापीठांनी वेळापत्रक आखून उपक्रमाची सुरुवात करावी. पुढील शैक्षणिक वर्षापासून उपक्रमाचा कालावधी जुलै ते ऑक्टोबर असा राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

11/03/2025 | Pune | Page : 18
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# एसबीसी आरक्षण सेट परीक्षेतून वगळले

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सहायक प्राध्यापक पदासाठी महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांसाठी जूनमध्ये घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षेतून (सेट) विशेष मागास प्रवर्गासाठीचे (एसबीसी) आरक्षण वगळण्यात आले आहे. त्यामुळे या प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज कसा भरायचा, असा प्रश्न आहे.

परीक्षेसाठी इच्छुक उमेदवार निखिल तपासे म्हणाले, 'सेट परीक्षेसाठीच्या आरक्षणामध्ये एसबीसी प्रवर्गाचा समावेश नसल्याचे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या माहितीपत्रकातून निदर्शनास आले.

गेल्या वर्षी झालेल्या परीक्षेत या आरक्षणाचा समावेश होता. त्यामुळे अचानक हे आरक्षण का वगळण्यात आले, असा प्रश्न निर्माण झाला. याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे विचारणा केली असता, यूजीसीच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, त्यासाठीची कागदपत्रे दाखवण्यात आली नाहीत. त्यामुळे आता या प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज कसा भरायचा, असा प्रश्न आहे.'

> सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) निर्देश दिले होते. त्याचे पालन विद्यापीठाने केले आहे.
> **- डॉ. ज्योती भाकरे, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे सेट परीक्षेचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार, १५ जून रोजी ४०वी परीक्षा होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. नियमित शुल्कासह या परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी १३ मार्चपर्यंत मुदत आहे. तर, विलंब शुल्कासह २१ मार्चपर्यंत अर्ज भरता येणार आहेत.

Loksatta 11.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# UGC's new teacher appraisal system is a lot more holistic

The criticism of the University Grants Commission (UGC)'s recent reforms based on the National Education Policy 2020 in these columns (*UGC's flawed proposals for teacher hiring, promotions*, Sukhadeo Thorat, February 18) fails to recognise higher education governance's dynamic and evolving nature. The argument that online consultations on regulatory matters compromise thorough reflection is based on an outdated understanding of discourse and participation. Digital platforms are vital to democratising engagement with stakeholders, making the process more inclusive, not less rigorous.

Has the academic performance indicator (API) been removed from the 2025 draft UGC (Minimum Qualifications for Appointment and Promotion of Teachers and Academic Staff in Universities and Colleges and Measures for the Maintenance of Standards in Higher Education Institutions) Regulations without extensively studying its limitations? This assumes that the deficiencies of API were unknown or insignificant. The assumption that removing the API system constitutes moving away from objectivity to subjectivity disregards the inherent limitations of a mechanistic evaluation framework. While the API was conceived with good intentions, it had evolved into a rigid, number-driven mechanism that often incentivised quantity over quality in academic contributions.



M Jagadesh Kumar

Faculty members were forced to comply with API rather than focus on genuine intellectual growth. In the best institutions globally, it is recognised that academic excellence is multidimensional and can't be represented by rigid scorecards. The notion that faculty recruitment and promotion are objective solely when numerical indicators are used to assess performance is a narrow interpretation of fairness. While numerical scores may provide a semblance of fairness, they are ill-equipped to capture the full spectrum of faculty members' intellectual and pedagogical contributions.

The draft regulations emphasise qualitative judgment and peer evaluation for assessing a scholar's contributions. This accommodates intellectual diversity without reducing it to mere numbers and aligns with the evolving nature of academic inquiry. Such an approach is a move toward a more reflective, context-sensitive, and inclusive evaluation system.

NEP 2020's vision of multidisciplinary learning, research excellence, and institutional autonomy necessitates moving away from archaic evaluation frameworks. In embracing these changes, UGC is enhancing transparency by ensuring that academic contributions are assessed to reflect their impact.

The contention that the selection committee's discretionary powers would lead to favouritism is based on an oversimplified dichotomy between numerical objectivity and human judgment. An effective selection process incorporates multidimensional assessments that balance qualitative and quantitative measures. Exclusive reliance on rigid numerical thresholds does not necessarily ensure high academic standards; instead, the subject experts in selection committees must focus on an appraisal of teaching effectiveness, research impact, and innovative contributions that may not always fit within a predefined formula. The assertion that if subject experts in a selection committee evaluate research publications and academic contributions inherently leads to bias disregards the importance of peer review and institutional oversight. The presumption that the selection committee wields unchecked authority and operates without accountability overlooks academic governance and professional assessment principles. It is not uncommon for reputable educational institutions worldwide to function on the principles of rigorous peer evaluation, ensuring that quality and scholarly integrity are upheld.

Furthermore, introducing an assessment parameter called "significant contributions" in the 2025 UGC draft regulations should not be hastily dismissed as an arbitrary shift in policy. Digital content creation, establishment of start-ups, student mentorship, research in Indian knowledge systems and promotion of Indian languages in higher education reflect an attempt to align faculty evaluation with contemporary academic and societal needs. Any claim that such contributions lack clear definitions overlooks the possibility that they are intended to encourage a broader and more holistic understanding of an educator's role. The criticism that the emphasis on Indian knowledge systems perpetuates exclusivity ignores the inclusive intent behind the policy. The regulation does not privilege one philosophical tradition over others but encourages comprehensive engagement with India's diverse intellectual heritage.

The recalibration of faculty assessment and selection mechanisms are an alignment with the evolving ethos of higher education, where quality is measured in quantifiable increments in an ecosystem that values integrity, diversity, and academic excellence.

*M Jagadesh Kumar, chairman, UGC and former vice-chancellor, JNU.*
*The views expressed are personal*

Hindustan Times 11.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# Stalin intensifies attack on Pradhan over NEP

**HT Correspondent**

letters@hindustantimes.com

**NEW DELHI:** Union education minister Dharmendra Pradhan on Monday told Parliament that the ruling Dravida Munnetra Kazhagam (DMK) in Tamil Nadu refused to implement the National Education Policy (NEP) for "politics", prompting a strong reaction from the party's president and chief minister MK Stalin, who accused the former of "arrogance" and asked him to "control his tongue".

During his reply in Parliament on the central funds for the PM Schools for Rising India (PM SHRI) scheme, Pradhan called the Stalin government "dishonest", evoking protests from the DMK MPs, who raised slogans and disrupted proceedings of the House, resulting in its adjournment.

"They are dishonest and ruining the future of the students of Tamil Nadu...They are misleading the people...They are doing politics," Pradhan said in a sharp attack on the Stalin-led DMK government amid its stiff opposition to implementation of the three-language policy under the NEP.

He added the TN government agreed to the PM SHRI scheme and DMK lawmakers conveyed this to him. "But when they went back, they made a U-Turn. They are doing mischief with the lives of the students. They are misleading the people and doing injustice to students of Tamil Nadu... They just want to do politics."



**Proceedings of the Lok Sabha underway during the budget session of Parliament on Monday.** SANSAD TV

Shortly after Pradhan's comments in Parliament, Stalin took to social media to launch a scathing attack against the Union minister, who he accused of speaking with "arrogance as if he was a king" and asked him to "control his tongue". "You are deceiving Tamil Nadu by withholding its rightful funds, yet you call Tamil Nadu MPs uncivilised? You are insulting the people of Tamil Nadu. Does the Hon'ble Prime Minister, Thiru. Narendra Modi accepts this?" he said.

Referring to Pradhan's letter to him that outlined Tamil Nadu's rejection of the NEP, three-language policy and PM SHRI MoU, he said the DMK government functioned by respecting the views of the people, unlike the BJP leaders who were bound by "words from Nagpur".

"Just answer if you could release the funds rightfully meant for Tamil Nadu students, which have been collected from our own tax contributions, or not?" the chief minister said.

The Tamil Nadu government and the Centre have been engaged in a war of words over NEP Policy (NEP) 2020 which makes implementation of three language formula mandatory. Tamil Nadu, which has a two-language one, has opposed NEP with concerns over the possible imposition of Hindi or Sanskrit under the three-language policy.

DMK lawmakers took exception to Pradhan's remarks and raised slogans against the Union government. Speaker Om Birla asked them to return to their seats for the House to function. He adjourned the House until noon as the DMK members continued their protests.

As the House reassembled, DMK member Kanimozhi said she was "very pained and hurt" by a word Pradhan used. She said DMK lawmakers and the Tamil Nadu education minister met Pradhan for the release of funds. "...we have issues with the NEP and cannot accept it in full. ...the three language formula is not acceptable to Tamil Nadu."

Pradhan responded to Kanimozhi, saying that he should not have used a word for the members of Tamil Nadu, the state government, and its people. "I withdraw my word if it has hurt anyone." Birla had since Pradhan withdrew the word, and he too has directed expunging it from the records.

Heated exchanges also took place outside Parliament between the BJP and opposition parties, including the Congress.

BJP member Nishikant Dubey accused the DMK of trying to divide the country by inciting passions by opposing the NEP and delimitation of parliamentary constituencies. "...They are trying to disturb the harmony in the country. They want to impose English throughout and win elections by inciting passions," he said.

Hindustan Times 11.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता

# विद्यापीठांतील प्राध्यापक भरतीला मुभा

## अकृषी विद्यापीठांतील ६५९ पदांची नियुक्ती लवकरच

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यपालांनी स्थगिती उठविल्यामुळे राज्यातील अकृषी विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या रिक्त पदाच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. अकृषी विद्यापीठांतील ६५९ पदांची भरती प्रक्रिया लवकरच सुरू होईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली.

सदस्य जयंत आसगावकर यांनी लक्षवेधीद्वारे प्राध्यापक भरतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना चंद्रकांत पाटील म्हणाले, विद्यापीठांमधील प्राध्यापक भरती प्रक्रिया पारदर्शी व्हावी, यासाठी राज्यपालांनी भरती प्रक्रियेला स्थगिती दिली होती. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाद्वारे भरती प्रक्रिया करण्याची त्यांची सूचना होती. त्यामुळे भरती प्रक्रिया रखडली होती. पण, विद्यापीठ अनुदान आयोगाने प्राध्यापकांच्या रिक्त जागांची भरती विद्यापीठांद्वारेच करण्याची सूचना केल्यामुळे काही अटी आणि निकषांसह राज्यपालांनी प्राध्यापकांच्या भरतीवरील स्थगिती मागील आठवड्यात उठवली आहे.

राज्यपालांनी ८० टक्के गुण संबंधित उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेला द्यावेत आणि २० टक्के गुण मुलाखतीसाठी द्यावेत, अशी सूचना केल्याचे पाटील म्हणाले.

### 'महाविद्यालयांसाठी नव्याने प्रस्ताव'

महाविद्यालयांत प्राध्यापकांच्या ४२३५ जागांची भरती करण्याचा प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पाठविला होता. तसेच नवीन शिक्षण धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे रिक्त पदांच्या भरतीला मान्यता द्या, असा प्रस्ताव वित्त विभागासमोर ठेवला आहे. वित्त विभागाने त्याला तत्त्वतः मान्यता दिली आहे. वित्त विभागाकडे नव्याने प्रस्ताव दाखल करून भरतीसाठी मान्यता घेतली जाईल, असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

12/03/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# नवे शैक्षणिक धोरण स्वीकारणार नाही

## मुख्यमंत्री स्टॅलिन यांची भूमिका; 'एनईपी'वरून खर्गे यांचे राज्यसभेत वादग्रस्त विधान, माफीनामा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

नव्या शैक्षणिक धोरणावरून (एनईपी) मंगळवारीही राज्यसभेत प्रचंड गोंधळ झाला. काँग्रेसचे अध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी असंसदीय व वादग्रस्त विधान केल्यामुळे कमालीचा गदारोळ झाला. अखेर खर्गे यांनी उपसभापतींची माफी मागितल्यानंतर हा गोंधळ शांत झाला. 'मी तुम्हाला उद्देशून नव्हे; तर सरकारच्या धोरणाविरोधात ते विधान केले होते,' अशी सारवासारव खर्गे यांनी केली. दरम्यान, काहीही झाले तरी एनईपी स्वीकारणार नाही, अशी भूमिका तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी स्पष्ट केली.

राज्यसभेत मंगळवारी प्रश्नोत्तराच्या तासानंतर कामकाज पुन्हा सुरू झाले. या वेळी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या कार्यपद्धतीवर चर्चा सुरू होती. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सोमवारी द्रमुकबाबत केलेल्या विधानाचे तीव्र पडसाद या चर्चेदरम्यान उमटले. 'राजकारणासाठी तुम्ही राज्यातील विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करीत आहात,' असा आरोप प्रधान यांनी केला होता. 'या विधानामुळे प्रधान यांनी तमिळनाडू सरकारचा अपमान केला असून त्यांनी याबाबत माफी मागावी,' अशी मागणी अनेक विरोधी खासदारांनी केली. मंगळवारी काळे कपडे परिधान करून आलेल्या द्रमुकच्या खासदारांनी नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणास; तसेच लोकसभा मतदारसंघांच्या फेररचनेस विरोध करून घोषणाबाजी केली आणि 'प्रधान यांनी माफी मागावी,' अशी मागणी केली.

दरम्यान, या सर्व गदारोळात खर्गे बोलण्यासाठी उभे राहिले. 'तुम्हाला सकाळच्या सत्रात या विषयावर बोलण्याची संधी दिली होती,' याचे स्मरण उपसभापती हरिवंश यांनी खर्गे यांना करून दिले. 'त्या वेळी प्रधान हे सभागृहात उपस्थित नव्हते. तुमचा हा आक्षेप म्हणजे हुकूमशाही आहे,' असे खर्गे उत्तरले. मात्र, 'आता दिग्विजयसिंह यांची बोलण्याची पाळी आहे,' असे उपसभापतींनी सांगताच खर्गे संतापले.

'या विषयावर चर्चा करण्यासाठी आम्ही पूर्ण तयारीने आलो आहोत. आम्ही तुम्हाला संपवून टाकू (ठोकेंगे),' असे वादग्रस्त विधान खर्गे यांनी केले. या विधानावर भाजपचे नेते व सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. 'खर्गे यांनी उपसभापतींना उद्देशून जी भाषा वापरली ती निषेधार्ह आहे. याचा सर्वांनी निषेध करायला हवा. ही भाषा माफीयोग्य नाही. मात्र, त्यांनी माफी मागावी व त्यांचे हे विधान कामकाजातून काढून टाकावे,' असे नड्डा म्हणाले.

यावर खर्गे यांनी त्वरित माफी मागितली; तसेच 'मी तुम्हाला उद्देशून बोलत नव्हतो. माझा रोख सरकारच्या धोरणांवर होता. प्रांतिक फूट पाडणाऱ्या सरकारला आमचा विरोध आहे. तमिळनाडू सरकारला अप्रामाणिक व असंस्कृत म्हणणाऱ्या प्रधान यांच्याकडे राजीनामा मागायला हवा. तरीही, माझ्या विधानामुळे तुम्ही दुखावले गेला असाल तर मी तुमची माफी मागतो,' असे ते उपसभापतींना म्हणाले.

### द्रमुककडून संसदेत निदर्शने

**नवी दिल्ली :** द्रमुकच्या खासदार कनिमोळी आणि पक्षाच्या इतर खासदारांनी मंगळवारी राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी), त्रिभाषा सूत्र या मुद्द्यांवरून संसदेत निदर्शने केली. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संसदेत त्रिभाषा सूत्रावरून केलेल्या वक्तव्याचा या खासदारांनी निषेध केला. द्रमुकने राष्ट्रीय शिक्षण धोरणाला आणि विशेषतः त्रिभाषा सूत्राला विरोध केला आहे. त्रिभाषा सूत्र म्हणजे तमिळनाडूत हिंदी थोपवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप द्रमकुने केला आहे. द्रमुकच्या मागणीला काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसने पाठिंबा दिला.



संसदत परिसरात निदर्शने करताना कनिमोळी आणि द्रमुकचे अन्य खासदार.



> "तुम्ही काल टीव्हीवर संसदेचे कामकाज पाहिले असेल. हिंदी आणि संस्कृतचा स्वीकार केला, तरच तमिळनाडूला दोन हजार कोटी रुपये दिले जातील, असे ते उद्धटपणे सांगत आहेत. कोण? तर ते केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान. मात्र, तुम्ही दहा हजार कोटी रुपये दिले, तरी मी तुमची विध्वंसक नागपूर योजना स्वीकारणार नाही. हे मी पुन्हा येथे सांगतो.
>
> – एम. के. स्टॅलिन, मुख्यमंत्री, तमिळनाडू

**प्रधान यांच्याविरोधात नोटीस**

द्रमुकच्या खासदार कनिमोळी यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधा[न] यांच्याविरोधात हक्कभंगाची नोटी[स] दाखल केली आहे. संसदेत प्रधा[न] यांनी तमिळनाडूतील शिक्ष[ण] व्यवस्थेबद्दल आणि त्रिभा[षा] धोरणाबद्दल केलेल्या विधानाचा संद[र्भ] त्यांनी दिला. द्रमुकच्या खासदारां[नी] आज संसद परिसरातही जोरद[ार] निदर्शने केली. प्रधान यांनी माफ[ी] मागावी अशी मागणीही कनिमोळ[ी] यांनी केली.

**स्टॅलिन भूमिकेवर ठाम**

'राष्ट्रीय शैक्षणिक धोर[ण] (एनईपी) ही 'विध्वंसक नाग[पूर] योजना' असून, केंद्र सरकारने द[हा] हजार कोटी रुपये देऊ केले तरीदेखील हे धोरण आम[्ही] स्वीकारणार नाही,' असे तमिळनाडू मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यां[नी] मंगळवारी सांगितले. 'आम[्ही] तमिळनाडूसाठी याच लढाऊ बाण्या[ने] लढत राहू. आम्ही जबाबदारीच[्या] भावनेने लोकांचे सरकार चालवत[ो.] तुमचा पाठिंबा कायमच असाय[ला] हवा,' असेही स्टॅलिन म्हणाले.

Maharashtra Times 12.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# अध्यापक पदभरती लवकरच

**उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पाटील यांची माहिती**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांची ४,४३५ पदे लवकरच भरण्यात येणार आहेत. भरतीला मान्यता देण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे फेरसादर करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधिमंडळात दिली.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे आणि अनुदानित महाविद्यालये; तसेच अकृषी विद्यापीठांमधील प्राध्यापक, सहायक प्राध्यापक आणि इतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत विचारण्यात आलेल्या तारांकित प्रश्नावर उत्तर देताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पाटील यांनी ही माहिती दिली.

ते म्हणाले, 'राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे आणि अनुदानित महाविद्यालये येथील शिक्षकीय, शिक्षकेतर पदे ही सेवानिवृत्ती, राजीनामा, मृत्यू इत्यादी कारणांमुळे रिक्त आहेत, ही बाब खरी आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या अंमलबजावणीवर आधारित उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यमापन करण्यासाठी प्रणाली विकसित करण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) घेण्यात आला आहे. शैक्षणिक संस्थेने किमान ७५ टक्के अध्यापकांची नियमित/कायमस्वरूपी नियुक्ती करणे हा त्यापैकी एक मापदंड आहे. त्यासंदर्भातील सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केली असून, संबंधितांकडून सूचना, प्रतिक्रिया मागविल्या आहेत. राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांची ४,४३५ पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला होता. या प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांची माहिती नमूद करून प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात येत आहे.'

राज्यातील अकृषी विद्यापीठातील प्राध्यापक भरतीबाबत मान्यता; तसेच अन्य तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना विद्यापीठांचे कुलपती यांच्याकडून या भरती प्रक्रियेस काही अटी शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन राहून स्थगिती देण्यात आली. ही बाब खरी आहे.

राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील शिक्षकीय पदांच्या ८० टक्के पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अध्यापकीय पदांच्या भरतीबाबत राज्यपाल यांची मान्यता घेऊन चालू वर्षी २८ फेब्रुवारी रोजी आदेश काढले आहेत. राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांची ४,४३५ पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात येत आहे, असेही पाटील यांनी उत्तरात नमूद केले आहे.

Maharashtra Times 12.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# शैक्षणिक धोरणावर उत्तर देताना प्रधान आक्रमक

“महात्मा गांधींची हत्या करणाऱ्याला सारा देश ओळखतो. पण गांधी हत्येसाठी ब्राह्मण वर्गाचे लोक जबाबदार आहेत, असे पाठ्यपुस्तकांमधून मुलांना शिकवले पाहिजे का?” असा संतप्त सवाल करीत आज केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ‘एनसीईआरटी’च्या पाठ्यपुस्तकांमधून जातीयवादाचा गंध येत असल्याचा दावा खोडून काढला.

नव्या शैक्षणिक धोरणावर राज्यसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. “बंदूक उचलणारे आणि देशाच्या लोकशाहीला न मानणारे नक्षलवाद्यांच्या आंदोलनाला आम्ही जनआंदोलन म्हणणार नाही आणि पाठ्यपुस्तकांतून त्याचा उल्लेख मिटविण्याचा निर्णय योग्यच आहे. करोना काळात ‘एनसीईआरटी’ने पाठ्यपुस्तकांतील चुका सुधारण्याचे काम केले आहे,” असे प्रधान म्हणाले. भारत बहुभाषिक देश आहे. कोणाचे अधिकार हिरावून घेण्यासाठी भाषेचा आग्रह करण्याचे पाप मोदींच्या सरकारने केले नाही आणि भविष्यात करणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## मराठी मुलाचा उल्लेख

■ आज शैक्षणिक धोरणावरील चर्चेदरम्यान केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मराठी भाषक संशोधकाचा उल्लेख केला. “मनुष्याच्या शरीराला लेझरने जोडण्याचे तंत्रज्ञान विकसित करणारी नवनिर्मिती एका मराठी भाषक मुलाने पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात सादर केली. त्याला मान्यता दिल्यानंतर दोन वर्षांमध्ये त्याचा दीड कोटीचा व्यवसाय झाला. ज्या भाषेत लहानापासून शिकला त्याच भाषेत पुढे वाटचाल केली तरच अशी नवनिर्मिती होऊ शकते, हे नव्या शैक्षणिक धोरणाचे हे यश आहे, असे प्रधान म्हणाले.

Sakal 12.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# शिक्षण धोरणावरून लोकसभेत धूमशान सुरूच

## संसद भवनात द्रमुकचा निषेध

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) वरून संसदेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यातील संघर्ष सुरूच आहे. मंगळवारी अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होण्यापूर्वी द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) च्या खासदारांनी संसद भवनात निदर्शने केली.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या वक्तव्याविरोधात दोन्ही सभागृहांमधील द्रमुक खासदारांनीही निषेध व्यक्त केला, तर राज्यसभेत विरोधकांनी केलेल्या गोंधळामुळे अधिवेशनाचा पहिला तास विस्कळीत झाला. दुसरीकडे, लोकसभेत राष्ट्रीय शिक्षण धोरणावर चर्चा झाली.

द्रमुक खासदार कनिमोझी यांनी केंद्रावर तामिळनाडूतील मुलांचे भविष्य उद्ध्वस्त केल्याचा आरोप केला. त्या म्हणाल्या की, केंद्र सरकार तामिळनाडूला दिले जाणारे पैसे रोखत आहे. केंद्र सरकार राज्यावर त्रिभाषा धोरण व राष्ट्रीय शिक्षण धोरणावर स्वाक्षरी करण्यासाठी दबाव आणत आहे. द्रमुक खासदार म्हणाल्या की, केंद्र सरकारला तामिळनाडूच्या मुलांसाठी येणारा निधी रोखण्याचा कोणताही अधिकार नाही.

धर्मेंद्र प्रधान यांनी वापरलेल्या भाषेवरही कनिमोझी यांनी आक्षेप घेतला. सोमवारी सभागृहात त्यांनी अतिशय अनादरपूर्ण पद्धतीने उत्तर दिले, असे द्रमुक खासदार म्हणाल्या. त्यांनी तामिळनाडूतील लोकांना असभ्य आणि बेईमान म्हटले. दरम्यान, काँग्रेस खासदार के. सुरेश यांनी 'एनईपी'वरून केंद्र सरकारवर टीका केली आणि राज्य सरकारे आणि शिक्षणतज्ज्ञांशी सल्लामसलत न करता धोरण पुढे ढकलल्याचा आरोप केला. त्यांनी आरोप केला की, सरकारचा खरा हेतू संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे भगवेकरण करण्याचा आहे. तामिळनाडू नेहमीच त्रिभाषा धोरणाच्या विरोधात राहिले आहे; परंतु त्यांच्या संमतीशिवाय केंद्र सरकारने हा निर्णय घेतला. तामिळनाडूतील आमच्या पक्षाचे सदस्यही द्रमुकला पाठिंबा देतात.

Pune Edition
Mar 12, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# अभियांत्रिकी विषयाच्या परीक्षा मराठीतून होणार

- मुख्यमंत्री फडणवीसांची विधान परिषदेत माहिती

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या अभियांत्रिकीसारख्या तांत्रिक कोर्सेसच्या परीक्षा यापुढे मराठीतून घेतल्या जाणार आहेत. त्यासाठी मराठीतून पुस्तके तयार करण्याकरिता आयोगाशी चर्चा करून कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येईल आणि या परीक्षा मराठीतून घेतल्या जातील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली.

विधान परिषदेत ठाकरे गटाचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा मराठीतून घेण्याबाबत प्रश्न विचारला होता. महाभारतीच्या वेबसाईटवर दोन परीक्षांबद्दल फक्त इंग्रजीतूनच माहिती देण्यात आल्याने याकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, आयोगाच्या परीक्षा मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषेतून घेतल्या जातात. इंजिनिअरिंगशी संबंधित परीक्षा इंग्रजीतूनच घेतल्या जातात.



न्यायालयासमोर हा विषय गेल्यानंतर एक बैठक झाली असता, त्यामध्ये या विषयांची मराठीत पुस्तके उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले.

मराठी पुस्तके उपलब्ध नसली, तरी नव्या शैक्षणिक धोरणामध्ये अभियांत्रिकी हा विषय मराठीमध्ये घेण्याची अनुमती मिळाली आहे. त्यामुळे ज्या विषयांची मराठीत पुस्तके उपलब्ध नाहीत, अशा टेक्निकल कोर्सेसची परीक्षा आयोगाकडून मराठीत घेतली जात नाही. आता मराठीतून पुस्तके तयार करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली.

Pune Edition
Mar 13, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

City 13 Mar 2025_003
13 Mar 2025

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# तामिळनाडूत नवे शैक्षणिक धोरण लागू नाही

## द्रमुक खासदार कनिमोझी यांचे उत्तर

**नवी दिल्ली, दि. १२** - पीएम श्री शाळांसाठी संमतीपत्रावर तामिळनाडूने स्वाक्षरी केलेली नाही. केवळ आमच्या राज्य सरकारच्या नेतृत्वाखालील समितीच्या शिफारशींवर आधारित पीएम श्री शाळा आम्ही स्वीकारू, केंद्र सरकारच्या शिफारशींवर नाही. आम्ही कुठेही त्रिभाषा धोरण किंवा एनईपी पूर्णपणे स्वीकारण्याचा उल्लेख केलेला नाही. तामिळनाडूला जे काही मान्य असेल ते आम्ही स्वीकारू, जास्त काही नाही, कमी काही नाही. त्यामुळे याबाबतचे सर्व गैरसमज पसरवणे थांबवा, असे आवाहन द्रमुक खासदार कनिमोझी यांनी केले आहे.

पंतप्रधान-श्री शाळांना तामिळनाडू सरकारने दिलेल्या संमतीवर केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी टिप्पणी केली होती. त्यावर कनिमोझी यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे.



प्रधान मंगळवारी म्हणाले की, द्रमुक खासदार आणि मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी माझ्यावर पीएम-श्री शाळा स्थापन करण्याच्या तामिळनाडूच्या संमतीबद्दल संसदेची दिशाभूल केल्याचा आरोप केला. मी माझ्या विधानावर ठाम आहे आणि यासंदर्भातले संमती पत्र शेअर करत आहे, असे कनिमोझी यांनी म्हटले आहे.

यापूर्वी, प्रधान यांनी १५ मार्च २०२४ रोजी तामिळनाडू शालेय शिक्षण विभागाचे एक पत्र शेअर केले होते. त्यामध्ये तामिळनाडूने पीएम-श्री शाळा स्थापन करण्यास संमती दिल्याचे म्हटले होते.

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी द्रमुकवर हल्लाबोल करताना म्हटले होते की, द्रमुक खासदार आणि मुख्यमंत्री कितीही खोटे बोलू शकतात. पण जेव्हा सत्य समोर येते, तेव्हा ते ते दाबण्याची तसदी घेत नाहीत. मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकारकडे तामिळनाडूच्या जनतेला उत्तर देण्यासाठी बरेच काही आहे. नव्या शैक्षणिक धोरणामधील भूमिकेत राज्याकडून अचानक बदल का झाला, असे त्यांनी विचारले आहे. त्या म्हणाल्या की, द्रविड मुन्नेत्र कळघमने त्रिभाषा धोरणाला विरोध केला आहे. स्टॅलिन सरकार तामिळनाडूमध्ये राजकीय अशांतता निर्माण करण्याचा आणि मुलांना शिकण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. नवीन शिक्षण धोरण प्रत्यक्षात पाचवीपर्यंत मातृभाषेत शिकण्याचे, शक्य असल्यास आठवीपर्यंत आणि त्याहूनही चांगले, असे सांगते. राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे म्हणणे असे आहे, परंतु ते (द्रमुक) अशी कल्पना करू इच्छितात की, उत्तरेकडील राज्ये हिंदी भाषा लादत आहेत.

दरम्यान, तीन भाषा धोरणावरील सीतारामन यांच्या विधानावर एमडीएमके खासदार दुराई वायको म्हणाले, पेरियार यांनी कधीही तमिळ भाषेचा अपमान केला नाही. पेरियार यांच्या तमिळ समाजावरील प्रेम आणि त्यागावर कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाही. आमच्या अर्थमंत्री सीतारामन एक ज्येष्ठ राजकारणी आहेत. त्यांना ही वस्तुस्थिती चांगली माहिती आहे, परंतु त्या या मुद्द्याचे राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत, असेही वायको म्हणाले.

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# Stalin leads protests against 'saffron' NEP

Divya Chandrababu
letters@hindustantimes.com

{ MK STALIN } TAMIL NADU CHIEF MINISTER

PM Modi, I have an appeal! Try to develop India rather than Hindi. Sanskrit can't be developed even if you spend thousands of crores...



**CHENNAI:** Tamil Nadu chief minister MK Stalin on Wednesday led a state-wide protest against the Union government amid a raging uproar over the National Education Policy (NEP), which he dubbed as a "saffron policy" aimed at developing Hindi and not the nation, and the proposed delimitation exercise, which he claimed was a sword hanging over south India.

"We oppose NEP as it will completely destroy Tamil Nadu's education growth. The NEP does not accept reservation that is social justice. This policy denies the assistance amount to scheduled castes, scheduled tribes and other backward classes," Stalin said at a public rally.

Tamil Nadu views the three-language formula, a key aspect of NEP, as a "proxy for Hindi imposition", he said, accusing the Centre of withholding funds to the state for opposing implementation of certain central schemes, including NEP. "Can there be more anarchy than saying that if you do not adopt the Hindi language, we will not provide funds?" he claimed, asserting the state will continue its two-language policy.

Alleging that it was not the NEP but a "saffron policy", Stalin said: "Prime Minister Narendra Modi, I have an appeal! Try to develop India rather than Hindi. Sanskrit cannot be developed even if you spend thousands of crores. You will spend crores to develop a language that is not spoken by the people. Will you betray our Tamil language that is recognised in several countries and spoken by the people?"

His remarks came a day after Union education minister Dharmendra Pradhan accused the Stalin government of trying to score political brownies to "revive" the ruling party's fortunes, saying the DMK's "latest cacophony" on language imposition exposed their "hypocrisy".

In his address, Stalin said Pradhan should not take class on democracy for the Tamil people.

Stalin also reiterated his position on the proposed delimitation exercise of Lok Sabha seats, saying it was a "sword" that hangs over not only Tamil Nadu but the entire south India. "The BJP wants to sustain power through wins in northern states alone and that is the conspiracy! They are trying to develop themselves by increasing the number of MPs in the states where they have influence. The DMK will stop this," Stalin said.

The DMK chief said he has sent letters to 29 parties in Andhra Pradesh, etc.

Hindustan Times 13.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर. या वेळी उपस्थित अन्य मान्यवर.

### 'परीक्षेच्या कामकाजासाठी ऑनलाइन प्रणाली विकसित'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालय स्तरावरील परीक्षेसंबंधी देयके सादर करत असताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यासंदर्भात महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची मते विचारात घेऊन ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. प्रशासकीय कामात वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी तसेच अचूकता व पारदर्शकता आणण्यासाठी पेपरलेस प्रशासकीय कामकाज करण्यावर विद्यापीठाचा भर असणार आहे,' असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वित्त व लेखा विभाग आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर यांच्या संयुक्त विद्यमाने परीक्षाविषयक कामांची देयके ऑनलाइन भरण्यासाठीच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहसचिव प्रशासन ए. एम. जाधव, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे, डॉ. धोंडीराम पवार, परीक्षा संचालक डॉ. प्रभाकर देसाई, वित्त व लेखा अधिकारी चारुशीला गायके, प्राचार्य रितेश पाटील उपस्थित होते. परीक्षाविषयक कामांच्या देयकांसाठी ही ऑनलाइन प्रणाली महाविद्यालयांसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे कामात होणारी दिरंगाई टळणार आहे, असे प्रतिपादन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहसचिव प्रशासन ए. एम. जाधव यांनी केले.

या कार्यशाळेत पुणे शहर व जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील ५५० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शुभांगी औटी, डॉ. अण्णासाहेब निंबाळकर, डॉ. अजय कवाडे, गणेश साबळे यांनी या कार्यशाळेचे संयोजन केले. व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ.अजय कवाडे यांनी केले. डॉ. प्रशांत मुळे यांनी आभार मानले.

**प्राचार्य, परीक्षा अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा होणार**

परीक्षा संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी परीक्षा सुरळीतपणे व्हाव्यात, मूल्यमापनाचे कामकाज वेळेत व्हावे, यासाठी लवकरच प्राचार्य आणि महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांची विद्यापीठ कार्यशाळा आयोजित करणार असल्याचे सांगितले.

Pune Edition
Mar 15, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रभात
City 15 Mar 2025_011
15 Mar 2025
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

### 'ऑन-द-जॉब'साठी अर्थसहाय्य मिळणार

#### विद्यापीठाने मागविले प्रस्ताव

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत कार्यानुभव संधी व ऑन- द- जॉब- ट्रेनिंग या उपक्रमाअतंर्गत कार्यशाळांसाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. यासाठी महाविद्यालयांकडून ऑनलाइन पद्धतीने प्रस्तावही मागविण्यात आले आहेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संलग्नित महाविद्यालयांत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कार्यानुभव संधी व ऑन- द- जॉब- ट्रेनिंग संदर्भात जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित कराव्या लागणार आहे. यासाठी महाविद्यालयांना प्रस्ताव सादर करण्यासाठी २५ मार्चपर्यंत मुदत देण्यात आलेली आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपकुलसचिव डॉ. वैशाली साकोरे यांनी दिली आहे.

ऑनलाइन पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे मुदतीत सादर करावी. , असेही विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहेत.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
Citi 16 Mar 2025_005
16 Mar 2025
www.dainikprabhat.com

# बीबीए, बीसीएचे शुल्क राहणार गतवर्षीप्रमाणेच

## सीईटी सेलच्या महाविद्यालयांना स्पष्ट सूचना

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १५** - बीबीए, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाचे शुल्क संबंधित विद्यापीठाने गतवर्षी जेवढे निश्चित केले होते, तेच यंदाच्या वर्षीही आकारण्यात यावे, अशा स्पष्ट सूचना राज्य सीईटी सेलने सर्व संस्थांना दिल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.




हे सर्व अभ्यासक्रम आता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित आले आहेत, त्यामुळे या अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा मिळाला आहे. परिणामी, या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सीईटी सेलद्वारे सीईटी घेऊन केंद्रीय प्रवेश पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यापूर्वी ह्या अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया विद्यापीठाच्या माध्यमातून होत होती आणि महाविद्यालये दर वर्षी आपल्या मार्जीनुसार अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित कारीत होते.

आता व्यावसायिक दर्जा असलेल्या अभ्यासक्रमाचे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित केले जाते. या प्राधिकरणाकडून महाविद्यालयातील शैक्षणिक व पायाभूत सुविधा, प्राध्यापक, कर्मचारी यांचा विचार करुन शुल्क निर्धारित केले जाते. या प्राधिकरणाने शुल्क निश्चित केल्यानंतर संस्था अथवा महाविद्यालयांना तेवढेच शुल्क आकारणे बंधनकारक आहे. त्यादृष्टीने हे प्राधिकरण महत्त्वाचे आहे. परंतु गतवर्षी उशिराने प्रवेश झाल्याच्या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी बैठक झाली. त्यात शुल्क रचनेसंदर्भात निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार संस्था अथवा महाविद्यालयात यंदाच्या वर्षी बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए आणि एमसीए इंटिग्रेटेड ही अभ्यासक्रम सुरु झाली आहेत. त्यांनी गतवर्षीच्या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाने जितके शुल्क निर्धारित केले होते, तेवढेच शुल्क आकारण्यात यावे. तसेच, गतवर्षीपासून ज्या संस्थेत अभ्यासक्रम सुरु झाली आहेत, त्यांनी त्याच्या मागच्या वर्षी जेवढी शुल्क होती, तेवढेच आकारावे, असेही निर्देश उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिले आहेत.

### शिष्यवृत्ती मिळणार

या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता ही योजना लागू झाली आहे. त्यामुळे या दोन्हींची शिष्यवृत्ती राज्य सरकारकडून विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

### सीईटी अनिवार्य

या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी देणे अनिवार्य आहे. त्यासाठी राज्य सीईटी सेलने विद्यार्थ्यांकडून २५ डिसेंबर २०२४ ते १० फेब्रुवारी २०२५ या कालवधीत नोंदणी करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर मुदतवाढ देण्यात आली. आता या अभ्यासक्रमाच्या सीईटीच्या नोंदणीसाठी अर्ज करण्याची मुदत २० मार्चपर्यंत आहे.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 17 Mar 2025_016
17 Mar 2025
www.dainikprabhat.com

# शिक्षकांसाठी पाच दिवसीय कार्यशाळा

## एनसीईआरटी, 'परख'तर्फे १७ मार्च ते २१ मार्चदरम्यान आयोजन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व दिल्लीतील एनसीईआरटी, परख यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते २१ मार्च या कालावधीत इयत्ता नववी ते बारावीच्या शिक्षकांसाठी यशदा येथे पाच दिवसीय कार्यशाळा घेण्यात येणार आहे. शिक्षकांचे समृद्धीकरण करण्याच्या अनुषंगाने ही कार्यशाळा महत्त्वाची ठरणार आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रीय शालेय शिक्षण व साक्षरता विभागाचे अतिरिक्त सचिव आनंद पाटील यांच्या हस्ते होणार आहे. शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, विद्या प्राधिकरण संचालक राहुल रेखावार, परखचे विभागप्रमुख डॉ. इंद्राणी भादुरी आदी उपस्थित असणार आहेत. विवेक गुप्ता, विशाल पंजनकर, आनंद कृष्णास्वामी, डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. शिवानी लिमये, श्रीधर नागरगोजे, सुवर्णा देशपांडे आदी मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेसाठी शिक्षण संचालक शरद गोसावी, संपत सूर्यवंशी, डॉ. महेश पालकर, कृष्णकुमार पाटील, राज्यमंडळ सचिव देविदास कुलाळ आदी उपस्थित राहणार आहेत.

केंद्र स्तरावर देशातील सर्व बोर्डांना समान पातळीवर आणण्याचे प्रयत्न सुरू असून, ही कार्यशाळा समग्र प्रगतिपत्रक माध्यमिक स्तर व प्रश्नपत्रिकांचे प्रमाणीकरण या विषयावर होणार आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ वरही चर्चा होणार आहे. विविध राज्यांच्या प्रश्नपत्रिकांच्या तुलनात्मक अभ्यासावरही या कार्यशाळेत प्रकाश टाकला जाणार आहे.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 17 Mar 2025_005
17 Mar 2025
www.dainikprabhat.com

# विद्यापीठाच्या परीक्षा २५ मार्चपासून

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २५ मार्चपासून सरू करण्यात येत आहेत. या अभ्यासक्रमांच्या परीक्षांची वेळापत्रके टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत. या परीक्षेसाठी सर्व व्यवस्था करण्याचे निर्देश विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना दिले आहेत.

पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षा आणि कला, वाणिज्य व विज्ञान या पदवीस्तरावरील प्रथम वर्षाच्या परीक्षा, विधी अभ्यासक्रम पदवीस्तरावरील प्रथम वर्षाच्या परीक्षेचे आयोजन महाविद्यालयस्तरावर करण्यात येणार आहे.

परीक्षा सुरू झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र, अर्थात कॅप सुरू करावेत. काही कारणांमुळे विद्यार्थ्यांचे उत्तरपत्रिका बारकोड संबंधित परीक्षा केंद्रास प्राप्त झालेली नसतील, तर त्यांना इमर्जन्सी बारकोड देऊन परीक्षा देण्याची व्यवस्था करावी. परीक्षा अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना इमर्जन्सी बारकोडवरुन परीक्षेस बसविणे हा दखलपात्र गुन्हा असून, त्याबाबत संबंधितावर कारवाई होऊ शकते, असेही परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी सांगितले आहे.

### अभ्यासक्रमाचे वेळापत्रक संकेतस्थळावर

सर्व पदविका अभ्यासक्रम व बीए, बीकॉम व बीएसस्सी या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा २५ मार्चपासून सुरू होणार आहेत. विधी अभ्यासक्रम आणि बीबीए अभ्यासक्रमाची पदवीस्तरावरील परीक्षा ९ एप्रिलपासून सुरू होणार आहेत. या अभ्यासक्रमाचे वेळापत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. अन्य अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रकही लवकरच प्रसिद्ध केले जाणार आहे.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 17 Mar 2025_005
17 Mar 2025

# पेपर तपासणीत हलगर्जी; विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

## राज्य मंडळ, विभागीय मंडळाकडे नियंत्रणाचा अभाव

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६ -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येत असलेल्या इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणी प्रकरणी शिक्षकांकडून हलगर्जीपणा केला जात असल्याचे प्रकार उघडकीस येऊ लागले आहेत. उत्तरपत्रिका तपासणीतील गोपनीयतेच्या नियमांचे पालनच शिक्षकांकडून होत नसल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्यही टांगणीला लागले आहे.

राज्य मंडळाने उत्तरपत्रिका तपासणीसाठी कडक नियमावली ठरविलेली आहे. यंदा दहावी, बारावी या दोन्ही परीक्षांचे निकाल येत्या १५ मे पुर्वी लावण्यासाठी जोरदार हालचालीही सुरू आहेत. यासाठी उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज अनुदानित, विनाअनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वच शिक्षकांना देण्यात आलेले आहे. उत्तर तपासणीसाठी मानधन कमी आणि डोकेदुखी जास्त असल्याचे कारण पुढे करत काही शिक्षक हे कामकाज टाळण्याचा प्रयत्नही



करताना दिसतात.

**एसटी बसमध्ये!**

नांदेड जिल्ह्यातील एका शिक्षकाने चालत्या एसटी बसमध्ये प्रवाशांची गर्दी, गोंधळ सुरू असतानाच उत्तरपत्रिका तपासण्याचा धडाका लावला होता. नवी मुंबईतील रस्त्यावर उत्तरपत्रिका सापडल्या, त्यानंतर विरारमध्ये एका घरातील आगीत उत्तरपत्रिका जळून खाक झाल्याने खळबळ उडाली. त्यातून शिक्षकांचा हलगर्जीपणा उघड झाला आहे.

शिक्षकांनी उत्तरपत्रिका या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात बसूनच तपासणे बंधनकारक आहे. मात्र, बहुसंख्य शिक्षक हे उत्तरपत्रिका तपासणीसाठी घरी नेत असल्याचे आढळून येते. मॉडरेटरही उत्तरपत्रिका घरीच घेऊन जातात. त्यामुळे दुर्दैवी घटना घडत आहेत. उत्तरपत्रिका तपासणीत हलगर्जीपणा करत असलेल्या शिक्षकांवर कारवाईचे धाडस दाखविले जाणार का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

### केंद्रीय मूल्यमापनाचा अवलंब गरजेचा

इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षांच्या उत्तर पत्रिका तपासणीसाठी विद्यापीठांमार्फत राबविण्यात येत असलेल्या केंद्रीय मूल्यमापन कार्यक्रमाचा अवलंब करण्याची आवश्यकता आहे. काही ठराविक ठिकाणी उत्तरपत्रिका तपासणीसाठी केंद्रे सुरू करून त्याच ठिकाणी उत्तर पत्रिका तपासणी, मॉडरेशनचे सर्व कामकाज पुर्ण करण्याच्या अनुषंगाने कार्यपद्धती वापरली पाहीजे. यातून उत्तरपत्रिकांची गोपनीयताही बाळगता येऊ शकेल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# मंत्रालयात अडकला क्रीडा गुणांचा प्रश्न

- एमएओ अध्यक्षांची संमती
- क्रीडामंत्र्यांनीही दिला हिरवा कंदील

## ४२ क्रीडा प्रकारांचा निर्णय प्रलंबित : तब्बल चार लाखांहून अधिक खेळाडूंचा समावेश

**पुढारी वॉच**

**सुनील जगताप**
पुढारी प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील खेळाडूंना दहावी आणि बारावी परीक्षांमध्ये ग्रेस गुण दिले जातात. या ग्रेस गुणांमध्ये राज्यातील तब्बल ४२ क्रीडा प्रकारांचा समावेशच अद्याप केलेला नाही. या ४२ क्रीडा प्रकारांमध्ये राज्यातील तब्बल चार लाखांहून अधिक खेळाडूंचा समावेश असून, त्यांचे शालेय नुकसान होत असल्याचे समोर आले आहे. क्रीडा विभागाकडून शासनाला अनेक वेळा प्रस्ताव जाऊनही मंत्रालयात मात्र हा प्रश्न अडकला असल्याचे समोर आले.

शालेय खेळ क्रीडा महाराष्ट्र राज्य संस्थेमार्फत शासनाकडे वारंवार ४२ क्रीडा प्रकारांबाबत पत्रव्यवहार झाला होता. या पत्रांची दखल घेत तत्कालीन क्रीडामंत्री आणि क्रीडा आयुक्त यांनी ४२ क्रीडा प्रकारांचा शालेय स्पर्धेत समावेश केला. मात्र, या क्रीडा प्रकारांना क्रीडा गुणांकन व क्रीडा अनुदान दिलेले नाही. क्रीडा प्रकारांना गुण मिळावेत, याकरिता क्रीडामंत्री आणि क्रीडा आयुक्त यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव यांना शिफारस केली, मात्र निर्णयाअभावी राज्यातील चार लाखांपेक्षा अधिक खेळाडूंचे नुकसान होत आहे. यासंदर्भात एमएओचे अध्यक्ष अजित पवार यांनी सचिवांना पुढील कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, तर क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनीही या विषयावर हिरवा कंदील दाखवला आहे.

"सन २०१३ मध्ये शालेय क्रीडा स्पर्धेत समावेश केलेल्या क्रीडा प्रकारांना शालेय स्पर्धेत क्रीडा गुणांकन मिळावे, यासाठी शालेय खेळ क्रीडा संस्था महाराष्ट्राच्या वतीने सतत शासन दरबारी पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरू आहे. सदर क्रीडा प्रकारांना क्रीडा गुणांकन मिळावे, यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी आजतागायत तीन वेळा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय यांना अहवाल पाठविला आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय येथील कार्यालयातून दरवेळी नवीन अधिकारी रुजू झाल्यानंतर अगोदरच्या कागदपत्रांची माहिती न घेता पुन्हा अहवाल मागवत आहेत. मंत्रालयातील या विभागाच्या कार्यालयातील कामकाज अनागोंदी पद्धतीने सुरू आहे.

**- शाम भोसले,** अध्यक्ष, शालेय खेळ-क्रीडा संघटना, महाराष्ट्र राज्य

"राज्यातील ४२ क्रीडा प्रकारांतील खेळाडूंना ग्रेस गुण तसेच अनुदान सुरू करावे, यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने अहवाल पाठविण्यात आला आहे. त्याचबरोबर शिफारसही शासनाकडे केलेली आहे. मात्र, पुन्हा एकदा अहवाल पाठविण्याबाबत सूचना मिळालेल्या आहेत. त्याच पत्रावर सध्या काम सुरू असून लवकरच हा अहवाल पुन्हा पाठविण्यात येईल.

**- उदय जोशी,** उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय

"माझी या विभागात नव्याने नियुक्ती झाली आहे. यापूर्वी दोन अहवाल क्रीडा विभागाकडून आलेले आहेत. त्यामध्ये पहिल्या अहवालात काही त्रुटी होत्या. तर दुसऱ्या अहवालाची फाईल शोधण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याचबरोबर क्रीडा विभागालाही अहवाल पाठविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. अधिवेशन सुरू असल्याने कामाचा व्याप अधिक आहे. लवकरच या संदर्भातील निर्णय घेऊ.

**- अशोक दमय्यवार,** अपर सचिव, शालेय क्रीडा विभाग, मंत्रालय

### या ४२ खेळांचा समावेश

आष्टे- डू- आखाडा, बुनिफाईट, कुडो, स्पीडबॉल, टेंग- सु- डो, फिल्ड आर्चरी, मॅटिक्सबॉल क्रिकेट, मिनीगोल्फ, सुपर सेवन क्रिकेट, बेल्ट रेसलिंग, फ्लोअरबॉल, थायबॉक्सिंग, हाफकिडो बॉक्सिंग, रोप स्किपींग, सिलंबम, बूडबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, थांग ता मार्शल आर्ट, कुराश, लगोरी, रस्सीखेच, पॉवरलिफ्टींग, बीच व्हॉलीबॉल, टार्गेटबॉल, टेनिस क्रिकेट, जित कुने दो, फुटसाल, कॉर्फबॉल, टेबल सॉकर, हुप क्वॉन दो, युग मुन दो, वोवीनाम, ड्रॉप रो बॉल, ग्रॅपलिंग, पेन्टाक्यू, लंगडी, जंपरोप, स्पोर्ट डान्स, चॉकबॉल, चॉयक्वांदो, फुटबॉल टेनिस, बुडो, म्युजिकल चेअर, टेनिस बॉल क्रिकेट.

My Pune Edition
Mar 18, 2025 Page No. 06
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

City | Pune Times Mirror | Monday, March 17, 2025 | 5

# Board results by May 15

### 175 students whose answer sheets were burnt will get average marks; case filed against teacher and principal

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com

TWEET @YashPune_Mirror


PIC FOR REPRESENTATIONAL PURPOSES ONLY

A fire broke out at the house of a teacher in Virar (West), burning the answer sheets of 175 students of Class XII (Commerce). They were answer sheets of the subject of Commerce Organization and Management (OC). According to the rules of the HSC-SSC board, the students whose answer sheets are burnt will get marks for that subject based on the average of the marks obtained in the other subjects. There is a rule that answer sheets should be checked at schools during school hours, but as a fact it is not followed. A case has been registered against the principal and the teacher concerned.

Meanwhile, principals and teachers are under pressure to complete checking lakhs of papers due to the mandatory rule of declaring the results by May 15. Therefore, there is a possibility of errors in the results.

The exams of Class XII students started on February 11 and those of Class X on February 21. As the exams started 10 days earlier than usual, the results will also be declared by May 15. Accordingly, the board officials are reviewing the answer sheets checked by the sectional boards of Pune, Nagpur, Chhatrapati Sambhajinagar, Mumbai, Kolhapur, Amravati, Nashik, Latur, and Konkan every day. Earlier, the board had said that the subject teacher should check at least 35 answer sheets every day during school hours so that all answer sheets can be checked on time.

"The board exam answer sheets are expected to be checked at the school itself during school hours instead of taking them home. After receiving complaints of taking answer sheets home, action is being taken against the concerned teacher and the school principal after investigation. Meanwhile, under the guidance of seniors, the examination of answer sheets is going on at a fast pace and the results of both classes are planned to be declared by May 15," said Audumbar Ukirde, Divisional Secretary, Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, Pune.

To make the examinations of class X and XII free of copying, this year the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education has adopted a mixed system for the examination centres as well as for the supervisors. But it did not have much effect.

**Class X, XII examination**

| Class | Number of students | Checking of answer sheets completed |
|---|---|---|
| Class X | 16 lakh | 44% over |
| Class XII | 15 lakh | 9% over |

> **Answer sheets are expected to be checked at the school itself during school hours instead of taking them home.**
>
> — Audumbar Ukirde, Divisional Secretary, MSBSHSE

During this examination, flying squads have taken action against more than 200 students across nine divisional boards. The paper of information technology (IT) subject of class XII students is still left and two papers of class 10 students are also left. The examination will conclude on March 17.




Pune Mirror 17.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

महाराष्ट्र टाइम्स

माझे पुणे

विद्यापीठांची नगरी

# राज्य कौशल्य विद्यापीठाची पुण्यात भरारी

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesofindia.com



**“विद्यार्थ्यांना ६० टक्के प्रात्यक्षिक, तर ४० टक्के थिअरी अभ्यासक्रमावर आधारित देशातील एकमेव सरकारी कौशल्य विद्यापीठ आहे. त्यामुळे केंद्र सरकारने नुकतीच 'केस स्टडी' म्हणून विद्यापीठाच्या शैक्षणिक कामकाजाची माहिती जाणून घेतली आहे. सध्या इंडस्ट्री-अॅकॅडेमिया सहकार्य वाढविण्यावर पूर्णपणे लक्ष देण्यात येत आहे. विद्यापीठ सुरू होऊन केवळ दोन वर्षे झाली आहे. त्यामुळे आगामी काही वर्षांत कौशल्य विद्यापीठ देशात अग्रेसर राहणार आहे.**

\- **डॉ. अपूर्वा पालकर**, कुलगुरू, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ



**रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचा पुणे कॅम्पस.**

**पुणे :** विद्यार्थ्यांना कमी शुल्कात दर्जेदार कौशल्याभिमुख शिक्षण मिळून, त्यांना चांगल्या रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने स्थापन झालेल्या रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने दोन वर्षांत आपल्या नावलौकिकात भर घातली आहे. या विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने, विद्यापीठाने गेल्या वर्षीपासून पुणे कॅपम्सची स्थापना केली आहे. या सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट, डिझाइनचे विविध कौशल्याभिमुख अभ्यासक्रमाची संधी मिळत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या निर्मितीचा निर्णय २०२१मध्ये झाला. कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रमांना वाहिलेले हे राज्यातील एकमेव सरकारी विद्यापीठ असून, पहिल्या कुलगुरू म्हणून डॉ. अपूर्वा पालकर यांची नेमणूक करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी या विद्यापीठाचे नामकरण रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ असे करण्यात आले. या विद्यापीठाचा उद्देश केवळ शिक्षण देणे एवढाच नसून, स्टार्टअप, इन्क्युबेशन, रोजगारक्षमता, प्रशिक्षण, समुपदेशन, अॅप्रेंटिशिप, ऑन-जॉब प्रशिक्षण आणि प्लेसमेंटसाठी सहकार्य करणे असा आहे. उद्योगांना रोजगारासाठी तयार मनुष्यबळ उपलब्ध करून देत, बेरोजगारी कमी होईल आणि राज्याच्या आर्थिक विकासासाठी हातभार लावण्याचे काम विद्यापीठाकडून होत आहे. मुंबई केंद्रबिंदू असलेल्या या विद्यापीठाने पुण्यासह, ठाणे, पनवेल, नागपूर येथे आपले स्वतंत्र कॅम्पस सुरू केले आहेत. देशातील विद्यापीठे आणि कॉलेजांमध्ये असलेल्या अभ्यासक्रमांपेक्षा उद्योगांची गरज पूर्ण करणाऱ्या नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांचे शिक्षण विद्यापीठातून दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांचा विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी ओढा वाढत आहे.

या विद्यापीठात विद्यार्थ्यांना बीए, बीबीए, एमबीए, इंजिनीअरिंग, डिझाइनमधील डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यातील अनेक अभ्यासक्रमांना सरकारची शिष्यवृत्ती दिली जाते. 'औध आयटीआय'मध्ये तात्पुरत्या स्वरूपात पुणे कॅम्पस कार्यान्वित आहे. या कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांना बी-टेक इन कम्प्युटर टेक्नॉलॉजी, मेकॅट्रॉनिक्स इंजिनीअरिंग, आयटी; तसेच बीबीए, डिझाइनमधील पदवी अभ्यासक्रम शिकता येतात. त्याचप्रमाणे एमटेक इन कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, सायबर सिक्युरिटी, डेटा सायन्स अँड एआय, क्लाउड कम्प्युटिंग अँड डेव्हऑप्स असे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण कौशल्याभिमुख शिक्षण घेण्याची सुविधा पुण्यात उपलब्ध झाली आहे. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही स्वतंत्र परीक्षा आणि मुलाखतीद्वारे पार पडते. त्यासाठी एप्रिल महिन्यात प्रवेश प्रक्रिया सुरू होते, अशी माहिती विद्यापीठाने दिली आहे.

### कमी शुल्कात कौशल्याभिमुख शिक्षण

देशातील अनेक विद्यापीठांमध्ये नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांचे शुल्क हे भरपूर आहे. यातील अनेक अभ्यासक्रमांना शिष्यवृत्तीही मिळत नाही. मात्र, कौशल्य विद्यापीठ हे राज्य सरकारी विद्यापीठ असल्याने, या विद्यापीठातील अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. यासोबतच प्लेसमेंटसाठीही सहकार्य करण्यात येते. त्यामुळे नावीन्यपूर्ण आणि रोजगाराभिमुख शिक्षण घेण्यासाठी पुण्यातील विद्यार्थ्यांना आणखी एक पर्याय निर्माण झाला आहे. आगामी काळात अभ्यासक्रमांच्या यादीत विस्तार होणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

Maharashtra Times 18.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

# पेपर जळाले; गुण मात्र बोर्डाकडे शाबूत

**पुढारी विशेष**

- **दहावी-बारावी परीक्षांचे निकाल लागणार वेळेतच**
- **१५ मे डेडलाइनसाठी राज्य मंडळाचे युद्धपातळीवर प्रयत्न**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी- बारावीच्या परीक्षेतील बारावीच्या वाणिज्य शाखेच्या एका विषयाच्या तब्बल ३०० उत्तरपत्रिका मुंबईत जळाल्या. त्याचा दहावी- बारावीच्या निकालावर परिणाम होऊन निकाल लांबणार असल्याची चर्चा होती. परंतु, त्याचा निकालावर शून्य परिणाम होणार असून, निकाल वेळेतच लागणार असल्याची माहिती राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

> दहावीचे पेपर सोमवारी संपले, तर बारावीचे पेपर मंगळवारी संपणार आहेत. राज्य मंडळाने यंदा पहिल्यांदाच दहावी-बारावीचे निकाल १५ मेपर्यंत जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्य मंडळाची जय्यत तयारी सुरू आहे. मुंबईत जळालेल्या उत्तरपत्रिकांचे गुण राज्य मंडळाकडे उपलब्ध असल्याने त्याचा निकालावर काहीही परिणाम होणार नसून निकाल वेळेतच लावण्यासाठी राज्य मंडळ प्रयत्नशील आहे.
>
> - **शरद गोसावी**, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ



राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेचा शेवट भूगोलाच्या पेपरने सोमवारी झाला, तर बारावीच्या परीक्षेचा शेवट आज मंगळवारी (दि. १८) आयटी विषयाने होणार आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांसह पालकांचे लक्ष निकालाकडे लागणार आहे. दरम्यान, मुंबईत बारावीच्या एका विषयाच्या उत्तरपत्रिका जळाल्याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्य मंडळाने दिलेली दहावी- बारावीच्या निकालाची १५ मे ही तारीख पुढे ढकलली जाणार का? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्या पार्श्वभूमीवर राज्य मंडळातील अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी संबंधित शक्यता फेटाळली आहे.

राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील घटनेचा निकालावर शून्य परिणाम होणार आहे. कारण, संबंधित विद्यार्थ्यांचा गुणदान-तक्ता राज्य मंडळाकडे उपलब्ध आहे. दहावी-बारावीची पेपर तपासणी दोन टप्प्यांत होते. पहिल्या टप्प्यात विषय शिक्षकाने पेपर तपासल्यानंतर संबंधित पेपरची मॉडरेटरमार्फत तपासणी होते.

जळालेल्या उत्तरपत्रिकांची संबंधित परीक्षकाने तपासणी करून त्याचा गुणतक्ता तयार केला होता. त्यामुळे जळालेल्या संबंधित उत्तरपत्रिकांमध्ये विद्यार्थ्यांना किती गुण मिळाले, याची माहिती संबंधित परीक्षकाकडे आहे. त्यानंतर संबंधित उत्तरपत्रिका मॉडरेटरकडे देण्यात आल्या. त्यानंतर मॉडरेटरमार्फत त्या उत्तरपत्रिकांची तपासणी करण्यात येणार होती. परंतु, दरम्यानच्या काळात त्या उत्तरपत्रिका जळाल्या. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांचे त्या विषयांचे गुण राज्य मंडळाकडे शाबूत आहेत. त्यामुळे त्याचा निकालावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे राज्य मंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

Pune Edition

Mar 18, 2025 Page No. 07

Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

# सेट परीक्षेसाठी २१ मार्चपर्यंत विलंब शुल्क भरून अर्ज भरता येणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या सेट परीक्षेसाठी ऑनलाइन पद्धतीने नियमित शुल्क भरून अर्ज भरण्याचा कालावधी संपला आहे. परंतु, उमेदवारांना येत्या २१ मार्चपर्यंत विलंब शुल्क भरून अर्ज भरता येणार असून, परीक्षेचे हॉल तिकीट ५ जूनपासून उमेदवारांना डाऊनलोड करता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

- **परीक्षेचे हॉल तिकीट ५ जूनपासून डाऊनलोड करता येणार**



सेट परीक्षेतून पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालयां मध्ये सहायक प्राध्यापक म्हणून काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे राज्यातील शेकडो विद्यार्थी या परीक्षेची आतुरतेने वाट पाहतात.

यंदाची परीक्षा राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये १५ जूनला होणार आहे. उमेदवारांना विलंब शुल्काद्वारे २१ मार्चपर्यंत पुणे विद्यापीठाच्या वेबसाइटवरून ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरता येणार आहे. या अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची संधी २२ ते २४ मार्च या कालावधीत उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांना परीक्षेचे हॉल तिकीट ५ जूनपासून डाऊनलोड करता येईल. परीक्षेचा अर्ज भरताना ऐनवेळी होणारी धावपळ टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी लवकर अर्ज भरावेत.

परीक्षेची सविस्तर माहिती https:///setexam.unipune.ac.in या वेबसाइटवरील माहितीपुस्तिकेत उपलब्ध आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या सेट विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

Pune Edition

Mar 18, 2025 Page No. 07

Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# कार्यानुभव कार्यशाळेसाठी विद्यापीठाकडून अनुदान

**पुणे, ता. १७ :** विद्यार्थ्यांना कार्यानुभव (इंटर्नशिप) आणि ऑन द जॉब ट्रेनिंगची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी कार्यशाळा आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांना आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत अनुदान देण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये अनुदान दिले जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि परिसंस्थांकडून प्रस्ताव मागविले आहेत.या योजनेसाठी विद्यापीठाने ऑनलाइन प्रस्ताव मागविले आहेत. महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे २५ मार्चपर्यंत प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने सादर करायचे आहेत. त्यात स्थानिक उद्योगांना आमंत्रित करावे. उद्योगांची संघटना, एमआयडीसी अशा संस्थांच्या सहकार्याने कार्यशाळा घ्यावी आदी अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत.

## उद्दिष्ट काय?

- इंटर्नशिप, ऑन द जॉब ट्रेनिंगसंदर्भात जागरूकता निर्माण करणे
- रोजगारक्षमतेची गरज व महत्त्व स्पष्ट करणे
- स्थानिक उद्योग, एसएमई, सरकारी कार्यालये, स्वयंसेवी संस्थांशी संपर्क वाढविणे

> नॅकची कमीत कमी 'ब' श्रेणी अथवा एनबीएची कमीत कमी 'ब' समकक्ष श्रेणी असल्याचे प्रमाणपत्र असणाऱ्या, तसेच महाविद्यालयात कायमस्वरूपी किंवा प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य असलेल्या महाविद्यालयांना अनुदान दिले जाईल.
>
> **- डॉ. वैशाली साकोरे,** उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग

## विद्यापीठाकडून मिळणारे अनुदान

| सहभागी उद्योजक/कंपन्या | अर्थसाह्य (रु.) |
|---|---|
| कमीत कमी २५ | २०,००० |
| कमीत कमी ५० | ३०,००० |

Sakal 18.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

प्रभात
City 19 March 2025_015
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
20 Mar 2025
www.dainikprabhat.com

# विद्यापीठ प्रशासनाचा कारभार चव्हाट्यावर

**प्रभात वृत्तसेवा**

- **अर्थसंकल्पाची प्रत अधिसभा सदस्यांना पोहोचलीच नाही**
- **२२ मार्चच्या अधिसभेत सूचना मांडणार कशा?**

**पुणे, दि. १८ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची (सिनेट) बैठक येत्या २२ मार्च रोजी होत आहे. या बैठकीची कार्यक्रमपत्रिका व विद्यापीठाच्या अर्थसंकल्पाची हॉर्ड कॉपी अद्याप काही अधिसभेच्या सदस्यांना प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अधिसभेत कपात सूचना कशा मांडायच्या, असा प्रश्न काही अधिसभा सदस्यांनी उपस्थित केला आहे.

अर्थसंकल्पात कपात सूचना मांडण्यासाठी अंतिम मुदत सोमवारी (दि. १७) होती. मात्र, अर्थसंकल्पाची प्रतच न मिळाल्याने काही अधिसभा सदस्यांना कपात सूचनाच मांडता आले नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

विद्यापीठाची अधिसभेची बैठक येत्या शनिवारी होत असून, यात विद्यापीठाचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. अर्थसंकल्पास अधिसभेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण असणार आहे. विद्यापीठात ही बैठक होण्यापूर्वी सर्व अधिसभा सदस्यांना कार्यक्रमपत्रिका व अर्थसंकल्पाची प्रत त्यांच्या पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठविली जाते. त्यानुसार या वेळी कार्यक्रमपत्रिका सर्व सदस्यांना ऑनलाइन पाठविण्यात आली, तर बजेटची प्रत प्रत्यक्षात सदस्यांना देण्यात आली.

दरम्यान, अधिसभेत विद्यापीठाचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी ज्या सदस्यांना कपात सूचना मांडावयाच्या आहेत, त्यांच्याकडून प्रस्ताव स्वीकारले जातात. हे प्रस्ताव पाठविण्याची शेवटची मुदत दि. १७ मार्चपर्यंत होती. त्यापूर्वीच अधिसभा सदस्यांना बजेटची प्रत मिळायला हवी होती. मात्र, काही सदस्यांना ती प्रत आजच मिळाली आहे, तर काही सदस्यांना अजूनही मिळालेलीच नाही. त्यांच्यापुढे कपात सूचना मांडाव्यात कशा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

तथापि, अधिसभा सुरू होण्यापूर्वी किमान १५ दिवस बैठकीची कार्यक्रमपत्रिका व बजेटची प्रत सदस्यांना मिळणे अपेक्षित असते. त्यानंतर त्याबाबत अभ्यास करून सदस्य कपात सूचना मांडतात; परंतु विद्यापीठ प्रशासनाकडून सदस्यांना वेळेत त्याची प्रत दिली जात नाही. त्यावरून काही अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान, अधिसभा सदस्यांच्या नाराजीसंदर्भात विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी नेहमीप्रमाणे प्रतिसाद दिला नाही.

प्रभात
City 19 March 2025_013
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
20 Mar 2025
www.dainikprabhat.com

# बीएड महाविद्यालयांना चार हजार पुस्तके अनिवार्य

**पुणे, दि. १८ -** माध्यमिक स्तरावर शिक्षक होण्यासाठी आवश्यक असलेल्या बीएड महाविद्यालयांना त्यांच्या ग्रंथालयात किमान चार हजार पुस्तके ठेवणे अनिवार्य आहे, असे निर्देश राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे अर्थात एनसीईटीने दिले आहे. त्यामुळे आता शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना ग्रंथालयात पुस्तकांची संख्या वाढवावी लागणार आहे.

बीएड महाविद्यालयांना ग्रंथालयात एनसीईआरटी आणि एनसीईटीच्या व्यतिरिक्त अन्य पुस्तके ठेवावी लागतील. यासंदर्भात सर्व बीएड महाविद्यालयांना सूचना दिल्या असून, नव्या शैक्षणिक धोरणानुसार बीएड महाविद्यालयांना दरवर्षी १०० नवीन चांगली पुस्तके खरेदी करण्याचे निर्देशही दिले आहेत. या सूचनाची अंमलबजावणी न करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्याचे संकेतही देण्यात आले आहेत.

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# विद्यापीठात शनिवारच्या अर्थसंकल्पाची लगीनघाई

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा येत्या शनिवारी (दि. २२) होणार आहे. त्यामुळे विद्यापीठात मोठ्या रकमेच्या विविध फायलींवर काम सुरू असून, विद्यापीठ कर्मचारी त्यात व्यस्त आहेत. तर, विद्यापीठात अमली पदार्थसेवनाच्या वारंवार घडणाऱ्या घटना, कुलसचिवांची पदभरती, प्राध्यापक भरती, अधिष्ठात्यांचा पदभार, परीक्षा विभागाचे कामकाज, संशोधनाचा दर्जा, संलग्न महाविद्यालयांचे प्रश्न, विद्यापीठाची घटती विद्यार्थिसंख्या आदी विषयांवर अधिसभेत जोरदार खडाजंगी होणार असल्याचे अधिसभा सदस्यांनी स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाच्या शनिवारी होणाऱ्या अधिसभेत विद्यापीठाचे बजेट मंजूर केले जाणार आहे. त्यामुळे सध्या विविध विभागांच्या बैठका सुरू आहेत. परंतु, गेल्या दोन वर्षांपासून नियमित अधिष्ठाता विद्यापीठाला नाही. तब्बल पावणेदोन वर्षांपासून प्रभारी कुलसचिवांवर विद्यापीठाचा कारभार सुरू आहे. त्यामुळे अधिसभेत यावर घमासान पाहायला मिळणार आहे.

- **अर्थसंकल्पीय अधिसभेत विविध विषयांवर होणार खडाजंगी**

अधिसभा सदस्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, ई-कंटेटनिर्मिती, महाविद्यालयांचा दर्जा उंचाविण्यासाठी राबविण्यात येणारे संशोधनवृध्दी कार्यक्रम, विद्यापीठाच्या विभागांमधील संशोधन प्रकल्प, प्रवेश परीक्षेसाठी आलेल्या अर्जांची संख्या, विद्यापीठाच्या परीक्षांचे कॅपचे नियोजन, विद्यापीठातील विविध पदांची भरती प्रक्रिया आदी प्रश्नांची विद्यापीठ प्रशासनाकडे सरबत्ती करण्यात आली आहे. तसेच विद्यापीठाच्या अहिल्यानगर येथील उपकेंद्राला डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे नाव देण्यासह अन्य काही महत्त्वाचे प्रस्ताव देखील मांडण्यात येणार आहेत. त्यामुळे येत्या शनिवारी होणारी अधिसभा विविध अंगांनी वादळी ठरण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

My Pune Edition
Mar 20, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 20 Mar 2025_003
20 Mar 2025

# कोणतीही भाषा लादली जाणार नाही

### केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुकांत मुजुमदार यांची माहिती : शिकण्यासाठीच्या तीन भाषा असतील प्रदेशनिष्ठ

**चेन्नई, दि. १९ - नव्या शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा सूत्रानुसार, हिंदी भाषा दाक्षिणात्य राज्यात लागू करण्याचा केंद्राचा नियम दिसून येतो. मात्र द्रमुक खासदारांच्या निषेधादरम्यान, सरकारने संसदेत स्पष्ट केले की, कोणत्याही राज्यावर कोणतीही भाषा लादली जाणार नाही आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणात भाषेबाबत लवचिक दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे.**

राज्यसभेत एका लेखी प्रश्नाच्या उत्तरात केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुकांत मुजुमदार यांनी सांगितले की, मुलांनी शिकायच्या तीन




भाषा त्यांच्या राज्यांशी, प्रदेशांशी आणि अभ्यासक्रमाशी जोडल्या जातील. सरकारचा असा विश्वास आहे की, त्रिभाषा सूत्रामुळे आकांक्षा आणि बहुभाषिकतेला चालना मिळेल तसेच राष्ट्रीय एकता आणखी मजबूत होईल.

सुकांत मुजुमदार यांनी असेही म्हटले आहे की, जे विद्यार्थी त्यांच्या अभ्यासादरम्यान तीनपैकी एक किंवा अधिक भाषा बदलू इच्छितात, ते इयत्ता ६ वी किंवा ७ वी मध्ये ते करू शकतील, परंतु त्यांना माध्यमिक शाळेच्या शेवटी पूर्वी निवडलेल्या भाषांमध्ये मूलभूत प्रवीणता दाखवावी लागेल.

दक्षिण भारतातील राज्यांमध्ये हिंदी भाषा लादण्याच्या मुद्द्यावर द्रमुक सरकार केंद्र सरकारवर सतत हल्ला करत आहे. सभागृहाच्या आत आणि बाहेर राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी संबंधित तीन भाषा सूत्राला सतत विरोध करत आहे. केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुकांत मजुमदार यांनी यासंबंधीच्या दुसऱ्या एका प्रश्नात सांगितले की, नव्या धोरणात, सरकार विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची भाषा निवडण्याचा पर्याय देत असते. या तीनपैकी किमान दोन भाषांपैकी भारतीय वंशाच्या असतील.

तत्पूर्वी, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या भागाच्या सुरुवातीला, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या तामिळनाडूमध्ये नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबतच्या विधानावरून द्रमुक खासदारांनी लोकसभेत प्रचंड गोंधळ घातला होता. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी द्रमुकवर या मुद्द्यावर राजकारण करण्याचा आणि विद्यार्थ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करण्याचा आरोप केला होता, जरी द्रमुक खासदारांच्या निषेधानंतर धर्मेंद्र प्रधान यांना त्यांच्या काही विधानांवर खेद व्यक्त करावा लागला.

# शोधनिबंध प्रसिद्ध करण्यात पिछाडी

### सात कार्यरत प्राध्यापकांकडून केवळ १२ शोधनिबंध प्रकाशित

**वेध अधिसभेचे**

**पुणे, ता. १९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला २०२४-२५ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानानुसार संशोधन प्रकल्पांसाठी एकूण संख्या १२७ इतकी आहे. तर याच आर्थिक वर्षात विद्यापीठातील सर्व विभागांना मिळून तब्बल २५ कोटी ७५ लाखांहून अधिक रुपये संशोधन अनुदान विविध संस्थांकडून मिळाली आहे. परंतु, जागतिक विद्यापीठांशी स्पर्धा करून पाहणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शोधनिबंध प्रसिद्ध करण्यात मात्र मागे असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**

अभिसभेची वार्षिक सभा येत्या शनिवारी (ता. २२) मार्चला होणार आहे. यात विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर करण्यात येईल. अधिसभेत सदस्य शंतनू लामधाडे यांच्या प्रश्नावर वित्त व लेखा विभाग, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या वतीने डॉ. संगीता जगताप यांनी दिलेल्या उत्तरात ही माहिती आहे. प्राध्यापकांच्या विभागानुसार संशोधन प्रकल्पांची संख्या, ५०० पेक्षा



जास्त सायटेशन असलेले शोधनिबंध, विद्यापीठाला मिळालेले संशोधन अनुदान याबाबत लामधाडे यांनी प्रश्न विचारले आहेत. लामधाडे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना ५०० पेक्षा जास्त सायटेशन असलेल्या शोधनिबंधांची माहिती विद्यापीठाने दिली आहे. त्यात सात कार्यरत प्राध्यापकांच्या १२ शोधनिबंधांना, तर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या आठ निवृत्त प्राध्यापकांच्या २० शोधनिंबधांना ५०० पेक्षा जास्त सायटेशन आहेत, अशी माहिती विद्यापीठाने दिली आहे.

> विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागातून सर्वाधिक शोधनिबंध प्रसिद्ध होत असल्याचे दिसून येत आहे. परंतु, वाणिज्य, भाषा, मानवविज्ञान, भाषा या किती शोधनिबंध प्रसिद्ध झाले, याची माहिती विद्यापीठाने द्यावी. याशिवाय संशोधनासाठी दिले जाणारे अनुदानही खूप कमी आहे. जागतिक विद्यापीठांशी स्पर्धा करण्यासाठी विद्यापीठाकडून संशोधन वाढीसाठी सर्वकष प्रयत्न होणे आवश्यक आहेत.
> **- शंतनू लामधाडे,** सदस्य, अधिसभा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एस्पायर रिसर्च मेटॉरशिप प्रोग्रॅम योजनेअंतर्गत एकूण १० प्राध्यापकांना १० लाख २८ हजार ५०० रुपये अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तर, मागील तीन वर्षात प्रत्येक विभागात एक हजार ५५२ शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. विद्यापीठाला २०२४-२५ या आर्थिक वर्षात सर्व विभाग मिळून २५ कोटी ७५ लाख १५ हजार ४५७ इतके अनुदान विविध संस्थांकडून प्रत्यक्ष प्राप्त झाले आहे. संशोधन अनुदान वाढविण्यासाठी विद्यापीठ काय प्रयत्न करत आहे, असा प्रश्न लामधाडे यांनी विचारला. त्यावर, संशोधक अध्यापकांमध्ये संशोधन वृत्ती वृद्धींगत होण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. शिक्षकांना विविध अनुदान देणाऱ्या संस्थांना संशोधन प्रकल्प सादर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असल्याचे विद्यापीठाने सांगितले आहे.

Sakal 20.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# नियुक्त्यांची रखडपट्टी

## विद्यापीठाचे राजभवनाकडे बोट

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनातील महत्त्वाचे कुलसचिव आणि विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता पदांसह प्राध्यापक भरतीच्या नियुक्त्या या रखडल्या आहेत. मात्र, राजभवन कार्यालयाकडून मान्यता मिळाली नसल्याने या नियुक्त्या रखडल्याचे कारण देत विद्यापीठ प्रशासनाने राजभवनकडे बोट दाखविले आहे. गेल्या अधिसभेतही या विषयांवर वादळी चर्चा झाली होती.

कुलसचिव हे विद्यापीठ प्रशासनातील संविधानिक पद मानले जाते. या पदासाठी विद्यापीठाने निवड समिती स्थापन करून मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण केली होती. मात्र, निवड प्रक्रियेतून वादग्रस्त नावावर शिक्कामोर्तब झाल्याने याला तीव्र विरोध झाला. यानंतर राजभवन कार्यालयातून निवड प्रक्रिया थांबविण्यात आली; तसेच अधिष्ठाता पदे आणि प्राध्यापक भरतीला राजभवन कार्यालयाकडून स्थगिती देण्यात आली. विद्यापीठाच्या गेल्या अधिसभेत (नोव्हेंबर २०२४) याविषयावर विस्तृतपणे चर्चा झाली. येत्या २२ मार्च रोजी होणाऱ्या अधिसभेतदेखील याबाबत प्रश्न मांडण्यात आला आहे. अधिसभा सदस्य विजय सोनवणे यांनी नियुक्ती प्रक्रिया रखडण्याची कारणे विचारली आहेत. यावर प्रशासनाकडून व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रविंद्र शिंगणापूरकर यांनी उत्तर दिले.

कुलसचिव पदासाठी निवड समितीने १० आणि ११ जुलै २०२४ रोजी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. मात्र, राजभवन कार्यालयाकडून २६ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या पत्राद्वारे निवड प्रक्रिया थांबविण्याचे आदेश विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. प्राध्यापक भरतीची नियुक्ती प्रक्रिया रखडली नसून, अर्ज छाननी करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. अर्जांची छाननी झाल्यानंतर मुलाखती आयोजित करण्यात येऊन भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे शिंगणापूरकर यांनी सांगितले.

Maharashtra Times 20.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### संशोधनाला निधी देण्यात विद्यापीठाचा हात आखडता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : विविध क्रमवारींमध्ये संशोधनाला महत्त्व असतानाही संशोधनासाठी निधी देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा हात आखडता आहे. विद्यापीठाने अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीचा पुरेपूर वापर होत नसल्याचे दिसून येत आहे.

विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा २२ मार्च रोजी होणार आहे. त्यासाठीची कार्यक्रमपत्रिका अंतिम करण्यात आली आहे. त्यात विद्यापीठाकडून संशोधनासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाबाबत शंतनू लामधाडे, डॉ. प्रशांत हिरे, डॉ. नीता मोहिते यांनी प्रश्न विचारले आहेत. या प्रश्नांना डॉ. संगीता जगताप, डॉ. नितीन घोरपडे यांनी उत्तरे दिली आहेत. विद्यापीठाला २०२४-२५ या आर्थिक वर्षात मिळालेल्या अनुदानानुसार १२७ संशोधन प्रकल्प मिळाले. तसेच अॅस्पायर रीसर्च मेन्टॉरशीप प्रोग्रॅम योजनेअंतर्गत १० प्राध्यापकांना १० लाख २८ हजार ५०० रुपये अनुदान मंजूर करण्यात आले. विद्यापीठाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात संशोधन अनुदानासाठी ४ कोटी ९० लाख रुपये तरतूद केली होती. विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांना विद्यापीठामार्फत अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे १ कोटी ४० लाख रुपये, तसेच विविध संस्थांकडून २५ कोटी ७५ लाख १५ हजार ४५७ रुपये अनुदान मिळाले. विद्यापीठाने महाविद्यालयीन स्तरावरील संशोधनाला वाव देण्यासाठी अर्थसंकल्पात ३ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद केली होती, त्यापैकी २ कोटी २६ लाख ६ हजार ६४९ रुपयांचाच निधी वितरित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्याशिवाय विद्यापीठाकडून अॅस्पायर योजनेअंतर्गत २०२१-२२मध्ये ३७ लाख २१ हजार ८४४, २०२२-२३मध्ये ३५ लाख ४२ हजार ७२४ रुपये, २०२३-२४मध्ये ४ लाख ६८ हजार ७१ रुपये, तर २०२४-२५मध्ये २ कोटी २६ लाख ६ हजार ६४९ रुपये महाविद्यालयांना देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

#### पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता प्रस्ताव प्रलंबित

डॉ. राजेश मणेरीकर यांनी पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता प्रलंबित प्रस्तावांबाबत विचारलेल्या प्रश्नाला व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी उत्तर दिले आहे. त्यानुसार विद्यापीठाकडे मान्यतेसाठी एकूण २६४ प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यात विज्ञान शाखेचे १६०, वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेचे ५९, अभियांत्रिकी शाखेचे ३६, तर आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेच्या नऊ प्रस्तावांचा समावेश आहे.

20/03/2025 | Pune | Page : 20
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### विद्यापीठात २१ मार्चपासून राष्ट्रीय लोकनाट्य महोत्सव

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : भारत सरकारचे उदयपूर येथील पश्चिम सांस्कृतिक केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ललित कला केंद्र गुरुकुल यांच्यातर्फे २१ ते २३ मार्च दरम्यान विद्यापीठाच्या संत नामदेव सभागृहात 'राष्ट्रीय लोकनाट्य महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ अभिनेत्री जयमाला इनामदार, विनोदवीर वसंतराव अवसरीकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन होणार आहे.

ललित कला केंद्राचे प्रमुख डॉ. प्रवीण भोळे यांनी ही माहिती दिली. शुक्रवारी (२१ मार्च) सायंकाळी पाच वाजता होणाऱ्या उद्‌घाटन कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे उपस्थित राहणार आहेत. पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचे संचालक फुरकान खान, ललित कला केंद्राचे प्रमुख डॉ. प्रवीण भोळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित होणाऱ्या महोत्सवाच्या समन्वयाचे काम लोककलेचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. प्रकाश खांडगे, विकास कोकाटे करत आहेत, तर डॉ. सत्यजित खांडगे सूत्रसंचालन करणार आहेत.

सायंकाळी होणाऱ्या कार्यक्रमात दशावतार, सौरभ भट यांचा जयपुरी ख्याल, श्रेयस बडवे यांचे लळीत, राजस्थानच्या रावल यांचा कलगीतुरा, विधी व भक्तिप्रधान लोकनाट्य बलस्थाने आणि मर्यादा या विषयावरील परिसंवादात डॉ. प्रकाश खांडगे तसेच डॉ. संजय देशमुख, डॉ. मुकुंद कुळे, डॉ. संतोष शेणई, डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ. सुनीता धर्मराव यांचा सहभाग आहे. राजस्थानचा कुचामणी ख्याल, लता लंका जयसिंग पाचेगावकर यांचा ढोलकी फडाचा तमाशा आहे.

20/03/2025 | Pune | Page : 20
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# Budget, academic issues to figure at SPPU senate meet

File photo



SPPU is slated to hold its annual budget senate meeting on March 22

**SwatiShindeGole**
@timesofindia.com

**Pune**: Mistakes in marksheets, delay in issuing transcripts, a central kitchen for running the university canteen, and unavailability of guides for PhD students are among the issues to be discussed at the annual budget senate meeting at Savitribai Phule Pune University (SPPU) on March 22.

Last year, the university had cleared a budget of Rs 627 crore for 2024-25 fiscal year. Among various suggestions and proposals by senate members, one on PhD guides stand out. The proposal stated: "In several research centres under SPPU, many students pursue PhDs, and the university has allowed hiring assistant guides to guide them after their chief guide retires. However, the situation has arisen in some research centres that due to the retirement of both the chief guide and the assistant guide, there are no guides available at the respective research centre. Therefore, they should be provided with a mentor from another research centre."

A senate member, Karishma Pardeshi, said, "However, teachers face certain issues when announcing vacant seats for each admission round. Some teachers have guide recognition in more than one subject, and vacant seats for these subjects are evenly distributed in PhD tracking portal. The research guide is not given any flexibility to decide on subjects in which students can be admitted. Vacant seats must be announced during PhD admissions."

Another member, Sunil Lokhande, proposed that SPPU should establish a policy to approve various proposals related to research centre recognition/renewal, student eligibility, and teacher recognition and promotion within a specific timeframe.

The Times of India 20.3.2025

# News Paper Clippings During March 2025

## Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# यंदा पहिलीपासून राज्यात 'सीबीएसई'चे वेळापत्रक

## 'एनसीईआरटी'च्या धर्तीवर अभ्यासक्रम; पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने पूर्णतः नवे बदल

- शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांची विधान परिषदेत माहिती
- पुढील शैक्षणिक सत्र १५ जूनपासून
- त्यानंतर १ एप्रिलपासून सत्र सुरू करण्याचा विचार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात येत्या शैक्षणिक वर्षात (२०२५-२६) पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम हा 'एनसीईआरटी'च्या धर्तीवर तयार केला जाणार आहे. या नव्या बदलानुसार पहिलीच्या वर्गाची नवीन पुस्तके येत्या जूनपूर्वी उपलब्ध करून दिली जाणार आहेत. याबरोबरच 'सीबीएसई' केंद्रीय मंडळाच्या धर्तीवर वेळापत्रकाची अंमलबजावणी केली जाणार आहे. मात्र, यंदा शाळा १५ जूनपासून सुरू होणार आहेत. ही माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी गुरुवारी विधान परिषदेत दिली.

राज्यात नवीन शैक्षणिक धोरणानुसार, 'एनसीईआरटी'च्या धर्तीवर असलेल्या अभ्यासक्रमानुसारच पुस्तके तयार केली जात आहेत. पहिली ते बारावी पुस्तकेही यानुसार टप्प्याटप्प्याने बदलणार आहेत. ही संपूर्ण प्रक्रिया पाच वर्षांत पूर्ण केली जाणार आहे. याबरोबरच राज्यात टप्प्याटप्प्याने 'सीबीएसई' केंद्रीय मंडळाचे वेळापत्रक लागू करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. शाळांचे भविष्यातील शैक्षणिक वेळापत्रक 'सीबीएसई'प्रमाणे केले जाणार आहे. यंदा परीक्षाच २४ एप्रिलपर्यंत चालणार असल्याने 'सीबीएसई'प्रमाणे १ एप्रिलपासून शैक्षणिक वर्ष सुरू होणार नाही. यंदा १५ जूनपासूनच शाळा सुरू होणार आहेत. यासंदर्भातील शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाकडून जारी करण्यात येणार आहे.

भाजप नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी विधान परिषदेत विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर देताना, हा विषय पुन्हा चर्चेला आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून 'सीबीएसई'च्या वार्षिक वेळापत्रकानुसार १ एप्रिलपासून नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री म्हणाले की, याबाबत विचारविनिमय सुरू आहे, त्यामुळे 'सीबीएसई' अभ्यासक्रम लागू करण्याचा अंतिम निर्णय झालेला नाही, असे लेखी उत्तरात म्हटले आहे. शैक्षणिक सत्र १ एप्रिलपासून सुरू करण्याच्या निर्णयावरही अद्याप शिक्कामोर्तब करण्यात आले नसल्याचेही म्हटले आहे.

'सीबीएसई'अंतर्गत असलेली पाठ्यपुस्तके इंग्रजी व हिंदी माध्यमात उपलब्ध आहेत, मराठीसह अन्य माध्यमांसाठी ती उपलब्ध करून दिली जाणार असून, राज्य मंडळांच्या शाळांचे वार्षिक वेळापत्रक १५ जूनपासून सुरू होत असून, नवीन शैक्षणिक सत्राची 'सीबीएसई'च्या वार्षिक वेळापत्रकानुसार १ एप्रिलपासून सुरुवात करण्यात येणार आहे, हेही खरे आहे काय? असे प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी उपस्थित केले. त्यास दादा भुसे यांनी लेखी उत्तर दिले असून, त्यात विचारण्यात आलेली माहिती अंशतः खरी असल्याचे स्पष्ट केले आहे.

यामुळे अनेक प्रश्न शाळा आणि शिक्षण क्षेत्रातून उपस्थित होत आहेत. राज्यात यंदा विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम हा 'एनसीईआरटी'च्या धर्तीवर तयार केला जाणार आहे व वेळापत्रक 'सीबीएसई'प्रमाणे असणार आहे, अशी माहिती शिक्षण विभागातून देण्यात आली.

### आवश्यक तयारीसाठी पुरेसा अवधी लागणार

राज्यातील शाळांच्या परीक्षा एप्रिल महिन्यात सुरू होणार आहेत. त्यामुळे नवीन शैक्षणिक सत्र एप्रिल महिन्यात सुरू करणे शक्य होणार नाही. तसेच, काही विषयांची पुस्तके 'सीबीएसई'नुसार तयार करण्याचा शिक्षण विभागाचा विचार आहे. मात्र, त्यासंदर्भात आवश्यक तयारी करण्यासाठी पुरेसा अवधी लागणार आहे. त्यामुळे 'सीबीएसई'चा अभ्यासक्रम राज्य मंडळ स्वीकारणार असल्याची घोषणा झाली असली, तरी ती अंशतः खरी असल्याचे उत्तरात म्हटले आहे.

Pune Edition
Mar 21, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 21 Mar 2025_005
21 Mar 2025

# महत्त्वाच्या पदांच्या नियुक्तीचा प्रश्न अधिसभेत गाजणार

**प्रभात वृत्तसेवा**

- **नियुक्त्या अद्याप रखडलेल्याच**
- **विद्यापीठ प्रशासनाचे राजभवनाकडे बोट**

**पुणे, दि. २०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनातील अत्यंत महत्वाचे असलेल्या कुलसचिव पदासह विविध विद्याशाखांच्या अधिष्ठाता पदाची नियुक्तीप्रक्रिया लांबणीवर पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मागील अधिसभेत या विषयावर वादळी चर्चा झाली. मात्र, राजभवन कार्यालयाकडून मान्यता मिळाली नसल्याने नियुक्ती रखडल्याचे विद्यापीठाचे म्हणणे आहे. त्यामुळे आता कुलसचिव, अधिष्ठात्यांच्या नियुक्तीसाठी आणखी प्रतीक्षाच करावी लागणार असल्याचे दिसते आहे.

येत्या शनिवारी अधिसभेची बैठक आहे. या पार्श्वभूमीवर अधिसभा सदस्य विजय सोनवणे यांनी कुलसचिव, अधिष्ठाता ही पदे नियुक्ती प्रक्रिया रखडल्याचा प्रश्न उपस्थित केला. त्यास प्रशासनाकडून व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रविंद्र शिंगणापूरकर यांनी उत्तर दिले. कुलसचिव हे विद्यापीठ प्रशासनातील संविधानिक पद मानले जाते. या पदासाठी विद्यापीठाने निवड समिती गठीत करून मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण केली होती. परंतु निवड प्रक्रियेतून वादग्रस्त नावावर शिक्कामोर्तब झाल्याने यास तीव्र विरोध झाला. यानंतर राजभवन कार्यालयातून निवड प्रक्रिया थांबविण्यात आली. त्याचप्रमाणे अधिष्ठाता पदे आणि प्राध्यापक भरतीला राजभवन कार्यालयाकडून स्थगिती देण्यात आली आहे, असे या उत्तरात नमूद केले आहे.

त्यानंतर दुसऱ्या वेळी कुलसचिव पदासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. त्यासाठी निवड समितीने दि. १० व ११ जुलै रोजी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. मात्र, राजभवन कार्यालयाकडून दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या पत्राद्वारे निवड प्रक्रिया थांबविण्याचे आदेश विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. प्राध्यापक भरतीची नियुक्ती प्रक्रिया रखडलेली नसून, अर्ज छाननी करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. अर्जांची छाननी झाल्यानंतर मुलाखती घेऊन भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे शिंगणापूरकर यांनी सांगितले.

### विद्यापीठात ३५३ शिक्षक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सध्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये १४८ शिक्षक शासनमान्य पदावर, १०० शिक्षक विद्यापीठ निधीतील पदावर, तसेच १०५ शिक्षक हे करार पद्धतीने कार्यरत आहेत. अधिसभा सदस्य विनायक आंबेकर यांनी शासनमान्य प्राध्यापक आणि विद्यापीठ निधीतील प्राध्यापकांची नेमकी संख्या किती ? असा प्रश्न अधिसभेच्या कार्यक्रमपत्रिकेत मांडला आहे. या प्रश्नाला व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. राजेंद्र विखे पाटील यांनी उत्तर दिले.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 21 Mar 2025_015
21 Mar 2025

# विद्यापीठाकडून ६४ लाखांचा चुराडा?

## शैक्षणिक धोरण अंमलबजावणी; कार्यशाळा, जनजागृतीवर उधळपट्टी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अभ्यासक्रम तयार करण्याच्या कार्यशाळा घेण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी दीड वर्षात ६४ लाख २८ हजार ९२१ रुपयांचा चुराडा करण्यात आला आहे. राज्य शासनाकडून यासाठी काहीच निधी मिळाला नसल्याने सर्व खर्च विद्यापीठ निधीमधूनच करण्यात आल्याची बाब उघड झाली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा शनिवारी (दि. २२) होणार आहे. यानिमित्ताने सदस्यांनी काही विषयांवर प्रश्न सादर करून त्यावर उत्तरे मागविली होती. डॉ. अपूर्व हिरे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी उत्तरे दिली आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी जून २०२३ ते डिसेंबर २०२४ दरम्यान अभ्यासक्रम तयार करण्यासाठीच्या कार्यशाळांसाठी ७ लाख ९६ हजार ६५७ रुपये एवढा निधी खर्च करण्यात आला. जनजागृतीसाठी ५६ लाख ३२ हजार २६४ रुपये खर्च झाला आहे. धोरण्याच्या अंमलबजावणी संदर्भात फिडबॅक घेण्यात आलेला नाही. पदवीचे प्रथम वर्ष असल्याने फिडबॅक वर्षाअखेरीस घेण्यात येणार असल्याने त्यानंतरच त्याचा अहवालही तयार होणार आहे.

धोरणाच्या अंमलबजावणीसाठी खर्ची पडलेल्या रकमेपैकी किती रक्कम शासनाकडून प्राप्त झाली व विद्यापीठ फंडातून किती रक्कम खर्ची केली गेली? असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. त्यावर शासनाकडून कोणतीही रक्कम प्राप्त झाली नसल्याची बाब उघड झाली आहे. यामुळे सर्व खर्चाचा भार विद्यापीठालाच सोसावा लागला आहे.

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा मंगळवारपासून

**पुणे, ता. २० :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या नियमित, अनुशेष लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा २५ मार्चपासून सुरू होणार आहेत. सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

सर्व विद्याशाखांमधील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या पदविका परीक्षा, मान्यताप्राप्त पारंपरिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य आणि विज्ञान) पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या परीक्षा तसेच विधी अभ्यासक्रम पदवी स्तरावरील

| अभ्यासक्रम | परीक्षांचा कालावधी |
|---|---|
| सर्व पदविका | २५ मार्च ते २५ एप्रिल |
| प्रथम वर्ष बीए, बीकॉम, बीएस्सी, बीकॉम (बीबीए,आयटी, सीए) | २५ मार्च ते २५ एप्रिल |
| प्रथम वर्ष बीबीए | १ ते २० जून |

प्रथम वर्षाच्या एलएलबी, बीए एलएलबी परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येईल. पारंपरिक अभ्यासक्रमांतील पदवीस्तर प्रथम वर्ष आणि विधी अभ्यासक्रम प्रथम वर्ष वगळून या अभ्यासक्रमांच्या उर्वरित वर्षे, पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, पदवी आणि पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व वर्षांच्या अनुरूप सत्र परीक्षांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर करण्यात येणार आहे. परीक्षेच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयात काटेकोर नियोजन करण्यात यावे, बैठकव्यवस्था सुयोग्य असावी, विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशा सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

Sakal 21.3.2025

# कुलसचिव, अधिष्ठाता नियुक्तीची प्रतीक्षा

## वेध अधिसभेचे

**पुणे, ता. २० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील कुलसचिव आणि विविध विद्याशाखांच्या अधिष्ठाता पदांच्या नियुक्त्यांसह प्राध्यापक भरती रखडली आहे. सद्यःस्थितीत विद्यापीठातील विविध सांविधानिक पदांच्या भरतीसंदर्भात राजभवन कार्यालयाकडून मान्यता मिळाली नसल्याने या नियुक्त्या रखडल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**



### प्राध्यापक भरतीसाठी छाननी प्रक्रिया सुरू

■ विद्यापीठातील शासनमान्य प्राध्यापक नियुक्ती प्रक्रिया रखडलेली नसल्याचे प्रशासनाने अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्न आणि विभागांनी दिलेल्या उत्तरात स्पष्ट केले आहे. विद्यापीठातील शिक्षकी पदांपैकी शासनमान्य प्राध्यापकांची पदे भरण्याकरिता जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्जांची छाननी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे. अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू असून ती अंतिम टप्प्यात आहे. त्यानंतर मुलाखती आयोजित करून भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे विद्यापीठाने नमूद केले आहे.

मागील अधिसभेतही विद्यापीठातील कुलसचिव, अधिष्ठाता आणि प्राध्यापकांच्या रखडलेल्या नियुक्तीबाबत वादळी चर्चा झाली होती. यंदाही या रिक्त पदांबाबत चर्चा होण्याची चिन्हे आहेत. अधिसभा सदस्य विजय सोनवणे यांनी कुलसचिव, अधिष्ठाता आणि शासनमान्य प्राध्यापकांची पदे रखडण्याचे कारण काय? आणि त्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याला उत्तर देताना प्रशासनाने पदभरतीबाबत राजभवन कार्यालयाकडे बोट दाखविले आहे.

विद्यापीठातील कुलसचिव हे पद सरळ सेवेने भरण्याकरिता एक फेब्रुवारी २०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. यासाठी निवड समिती स्थापन करण्यात आली. पात्र उमेदवारांच्या जुलै २०२४ मध्ये मुलाखती पार पडल्या; परंतु विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील निवड आणि नियुक्ती प्रक्रिया पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत थांबविण्याचे आदेश राजभवन कार्यालयाने २६ नोव्हेंबर २०२४ मध्ये विद्यापीठास दिले. त्यानुसार ही पदभरती रखडली आहे. याबाबत आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही सुरू करण्यात येईल, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

Sakal 21.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# कुलसचिव, अधिष्ठात्यांची नियुक्ती अद्याप प्रतीक्षेतच

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनातील महत्त्वाचे कुलसचिव पदासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता पद आणि प्राध्यापक भरतीच्या नियुक्तीला अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. मागील अधिसभेत या विषयावर वादळी चर्चा झाली. मात्र, राजभवन कार्यालयाकडून मान्यता मिळाली नसल्याचे नियुक्ती रखडल्याचे कारण विद्यापीठ प्रशासनाने दिले होते. चार महिन्यांच्या कालावधीत कुठलीच हालचाल न झाल्याने कुलसचिव, अधिष्ठात्यांच्या नियुक्तीसाठी किती वेळ प्रतीक्षा करावी लागणार याबाबत साशंकता आहे.

कुलसचिव हे विद्यापीठ प्रशासनातील संविधानिक पद मानले जाते. या पदासाठी विद्यापीठाने निवड समिती गठीत करून मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण केली होती. परंतु, निवड प्रक्रियेतून वादग्रस्त नावावर शिक्कामोर्तब झाल्याने यास तीव्र विरोध झाला. यानंतर राजभवन कार्यालयातून निवड प्रक्रिया थांबविण्यात आली. त्याचप्रमाणे अधिष्ठाता पदे आणि प्राध्यापक भरतीला राजभवन कार्यालयाकडून स्थगिती देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या मागील अधिसभेत (नोव्हेंबर २०२४) याविषयावर विस्तृतपणे चर्चा झाली. येत्या २२ मार्च रोजी होणाऱ्या अधिसभेत देखील या विषयी प्रश्न मांडण्यात आला आहे. अधिसभा सदस्य विजय सोनवणे यांनी नियुक्ती प्रक्रिया रखडण्याची कारणे विचारली आहेत. यावर प्रशासनाकडून व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी उत्तर दिले.

कुलसचिव पदासाठी निवड समितीने १० व ११ जुलै रोजी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. मात्र, राजभवन कार्यालयाकडून २६ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या पत्राद्वारे निवड प्रक्रिया थांबविण्याचे आदेश विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. प्राध्यापक भरतीची नियुक्ती प्रक्रिया रखडलेली नसून अर्ज छाननी करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. अर्जांची छाननी झाल्यानंतर मुलाखती आयोजित करण्यात येऊन भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे शिंगणापूरकर यांनी सांगितले.



### विद्यापीठात ३५३ शिक्षक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सध्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये १४८ शिक्षक शासनमान्य पदावर, १०० शिक्षक विद्यापीठ निधीतील पदावर तसेच १०५ शिक्षक हे करार पद्धतीने कार्यरत आहेत. अधिसभा सदस्य विनायक आंबेकर यांनी शासनमान्य प्राध्यापक आणि विद्यापीठ निधीतील प्राध्यापकांची नेमकी संख्या किती? असा प्रश्न अधिसभेच्या कार्यक्रमपत्रिकेत मांडला आहे. या प्रश्नाला व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. राजेंद्र विखेपाटील यांनी उत्तर दिले.

Kesari 21.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# विद्यापीठाने प्रश्नच नाकारले

## डॉ. जगझाप यांचे कुलगुरू डॉ. गोसावी यांना पत्र

**पुणे, ता. २१ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अधिष्ठाता पदावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणुका केलेल्या प्राध्यापकांचे तात्पुरत्या नेमणुकीचे निकष आणि आरक्षण धोरण, शिक्षकांची 'कॅस'अंतर्गत होणारी पदोन्नती, मुख्य वसतिगृह प्रमुखपदाचा कार्यभार यासंदर्भात अधिसभा बैठकीसाठी सदस्य डॉ. हर्ष जगझाप यांनी विचारलेले प्रश्न विद्यापीठ प्रशासनाने अग्राह्य धरले. प्रश्न नाकारून अधिसभेचा हक्कभंग केल्याबाबत डॉ. जगझाप यांनी तीव्र नाराजीने कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना पत्र धाडले आहे.**

विद्यापीठाची अधिसभा (वार्षिक सभा) शनिवारी (ता. २२) होत आहे. सभेत सदस्यांनी विचारलेले प्रश्न आणि त्याला विभागाने दिलेली उत्तरे, तसेच अंतिम कार्यक्रमपत्रिका सादर झाली आहे. अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला अग्राह्य धरून उत्तरे न दिल्याने वादळी चर्चा होण्याची चिन्हे आहेत. आंतरविद्याशाखीय विभागाच्या अधिष्ठाता पदावर एका विभागात सहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत असणाऱ्या व्यक्तीची तात्पुरत्या स्वरूपात निवड झाली आहे. त्यामुळे प्राध्यापक आणि वरिष्ठ प्राध्यापक पदांवर कार्यरत असलेल्यांना कनिष्ठ पदावरील व्यक्तीच्या अधिकारात काम करावे लागत आहे. याशिवाय एकूण चार अधिष्ठाता पदांवर दोन वर्षांच्या प्रदीर्घ काळापर्यंत तात्पुरत्या नेमणुका चालू असल्याने या पदांना आरक्षणाचा नियम लावणे टाळले जात आहे. हे अधिसभेच्या लक्षात आणून देण्यासाठी विचारलेले प्रश्न विविध कलमे लावून अग्राह्य ठरविण्यात आले," असे डॉ. जगझाप यांनी पत्रात नमूद केले आहे.



पुणे विद्यापीठ

> "विद्यापीठातील शिक्षकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी अधिसभेमध्ये प्रश्न मांडण्याचा शिक्षकांच्या प्रतिनिधींचा हक्क अशाप्रकारे चुकीच्या पद्धतीने नियम लावून हिरावून घेतला जात आहे. ही बाब अधिसभेचा हक्कभंग करणारी आहे. अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर उत्तरे तत्काळ मिळावीत, अन्यथा माननीय राज्यपालांकडे तक्रार करण्यात येईल, तसेच शिक्षकांसह आंदोलन करण्यात येईल.
>
> **- डॉ. हर्ष जगझाप,**
> अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Sakal 22.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# 'एनईपी'बाबतचे दावे गाजणार

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची आज अधिसभा

### वेध अधिसभेचे

**पुणे, ता. २१ :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) प्रभावी अंमलबजावणीचा मोठा गाजावाजा करीत दावा करणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नेमके काय केले, यासाठी किती निधी वापरला, धोरणाच्या अंमलबजावणीचा प्रतिसाद आजमावण्यासाठी काय केले याबाबत आता अधिसभेत चर्चा झडण्याची चिन्हे आहेत. शनिवारी (ता. २२) अधिसभा होत आहे.

विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांत जून २०२३ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तब्बल ६४ लाख २८ हजार ९२१ रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. दरम्यान, नव्या धोरणानुसार अभ्यासक्रम तयार करण्याच्या कार्यशाळांवर सात लाख ९७ हजार ६५७ रुपये, तर धोरणाच्या जनजागृती कार्यक्रमांवर तब्बल ५६ लाख ३२ हजार २६४ रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अधिसभा सदस्य डॉ. अपूर्व हिरे यांनी याबाबत विचारलेल्या प्रश्नाला विद्यापीठ प्रशासनाने दिलेल्या उत्तरातून ही माहिती उघड झाली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी खर्च झालेल्या रकमेपैकी कोणतीही रक्कम राज्य सरकारकडून आलेली नाही. हा सर्व खर्च विद्यापीठ निधीतून करण्यात आल्याची माहितीही प्रशासनाने दिली आहे. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी नेमलेल्या सुकाणू समितीने दिलेल्या सूचनेनुसार अभ्यासक्रम आराखडा आणि संरचनेनुसारच 'एनईपी' अभ्यासक्रम सुधारित करण्यात आला आहे, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

### हे विषयही गाजणार

**■ अधिसभेत इतरही अनेक विषयांवर चर्चा होण्याची चिन्हे आहेत. महाविद्यालयांचा दर्जा उंचाविण्यासाठी आणि संशोधन वृद्धीसाठी कोणते प्रयत्न होत आहेत, पीएच.डी. केंद्र म्हणून मान्यतेचे निकष कोणते, वसतिगृहातील सुरक्षितता आणि सुविधांचा अभाव याविषयी चर्चा होण्याची दाट शक्यता आहे.**

Sakal 22.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा विद्यापीठावर आर्थिक भार

## सरकारकडून निधी मिळाला नसल्याचे स्पष्ट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी अभ्यासक्रम निर्मिती कार्यशाळा, जनजागृतीवर गेल्या दीड वर्षात विद्यापीठाने ६४ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च केला आहे. राज्य शासनाने त्यासाठी काहीच निधी दिलेला नाही. परिणामी, या खर्चाचा भार विद्यापीठ निधीवर पडल्याचे स्पष्ट झाले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा आज (२२ मार्च) होणार आहे. त्यासाठीची कार्यक्रमपत्रिका अंतिम करण्यात आली आहे. त्यात अधिसभा सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न, ठरावांचा समावेश आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत अधिसभा सदस्य डॉ. अपूर्व हिरे यांनी विचारलेल्या प्रश्नांना व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. देविदास वायदंडे यांनी उत्तरे दिली आहेत. त्यानुसार अभ्यासक्रम तयार करण्यासाठीच्या कार्यशाळांसाठी ७ लाख ९६ हजार ६५७ रुपये निधी खर्च करण्यात आला, तर जनजागृतीसाठी ५६ लाख ३२ हजार २६४ रुपये खर्च झाला आहे. राज्य शासनाच्या सुकाणू समितीने निर्देशित केलेला अभ्यासक्रम आराखडा आणि संरचनेनुसारच अभ्यासक्रम सुधारित करण्यात आले आहेत. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाकडून कोणतीही रक्कम देण्यात आलेली नाही, अशी माहिती दिली आहे. त्यामुळे विद्यापीठालाच खर्चाचा भार उचलावा लागल्याचे दिसून येत आहे.

### महाविद्यालयांकडून ५ कोटींहून अधिक विकास निधी

संलग्नित महाविद्यालयांकडून विद्यापीठाला विकास निधीची रक्कम मिळते. त्यानुसार २०२३-२४मध्ये २ कोटी ७८ लाख २२ हजार १५० रुपये, तर २०२४-२५मध्ये २ कोटी ५२ लाख ६५ हजार ७७५ रुपये विकास निधी मिळाला. २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीत विद्यापीठाने चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांचे आयोजन, क्रीडा साहित्य खरेदी, साहित्य खरेदी अशा कामांवर खर्च केला. त्यानुसार २०१९-२०मध्ये ४ कोटी २६ लाख ३० हजार ९३२, २०२०-२१मध्ये २ कोटी ४९ लाख ८६ हजार ४७५, २०२१-२२मध्ये १ कोटी १२ लाख ९५ हजार ३८६, २०२२-२३मध्ये १ कोटी ४१ लाख ६५ हजार ५४५, २०२३-२४मध्ये २ कोटी ५१ लाख ४६ हजार २६९, २०२४-२५मध्ये ५१ लाख ७० हजार ४०६ रुपये निधी खर्च केल्याची माहिती देण्यात आली आहे.

Loksatta 22.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# प्राध्यापक भरतीचे निकष बदलले!

## सुधारित निकषांनुसार महाविद्यालयांना करता येणार प्राध्यापक भरती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्यातील प्राध्यापक भरतीसंदर्भात राज्यपाल कार्यालयाने पुढील आदेश येईपर्यंत विद्यापीठाच्या शिक्षक आणि शिक्षकेतर संवर्गाची निवड आणि नियुक्तीची प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे निर्देश दिले होते. परंतु आता सुधारित निकषांनुसार प्राध्यापक भरती करण्यासाठी सशर्त परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार सुधारित निकषांनुसार महाविद्यालयांनी प्राध्यापक पदभरती करावी, असे स्पष्ट निर्देश राज्यपाल कार्यालयाचे सचिव विकास कुलकर्णी यांनी दिले आहेत.**

राज्य सरकारने विद्यापीठाच्या शिक्षकांच्या सध्याच्या निवड प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव राज्यपालांकडे सादर केला होता आणि त्यानुसार, राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या शिक्षक कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली होती. राज्य सरकारने विद्यापीठातील शिक्षकांच्या निवड प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या तपशीलवार प्रस्तावाचा अभ्यास केल्यानंतर राज्यपालांनी राज्य सरकारच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे आणि भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या शिक्षक कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया सशर्त सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे.

कुलकर्णी यांनी सरकारी विद्यापीठांच्या कुलगुरूंना दिलेल्या निर्देशानुसार, शिक्षण कर्मचाऱ्यांच्या एकूण निवड प्रक्रियेत उमेदवारांची निवड करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या यूजीसी नियम २०१८ अंतर्गत निकषानुसार निवड प्रक्रिया आयोजित केली जाईल. निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि संतुलित निवड प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि मुलाखत कामगिरी दोन्ही एकत्रित करण्याचा एकात्मिक दृष्टिकोन असेल. सुधारित निवड प्रक्रियेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निर्देश जारी करण्याच्या सूचनाही कुलगुरूंनी राज्य सरकारला दिल्या होत्या. त्यानुसार वरील निर्देशांचे पालन करण्यासाठी उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाला आता पुढील पावले उचलावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### शैक्षणिक, संशोधन अन् अध्यापन निकषाला ८० टक्के वेटेज

उमेदवारांचे मूल्यांकन शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि मुलाखतीतील कामगिरी या दोन्हींच्या आधारे केले जाईल. अंतिम निवड शैक्षणिक, संशोधन आणि अध्यापन निकषांच्या ८० टक्के वेटेजवर आणि मुलाखतीच्या कामगिरीसाठी २० टक्के वेटेजवर आधारित असेल. हे दोन निकष एकत्र करून, १०० गुणांची गुणवत्ता यादी तयार केली जाईल, ज्यामुळे सर्वात पात्र उमेदवारांची निवड केली जाईल. शैक्षणिक गुण संकेतस्थळावर किंवा सार्वजनिक डोमेनवर प्रदर्शित केले जातील.



### अशी असेल निवड प्रक्रिया

- निवड प्रक्रिया अत्यंत वस्तुनिष्ठ असेल आणि व्यक्तिनिष्ठ विवेकाधिकार कमी असेल.
- विद्यापीठ वर्गातील परिस्थितीत चर्चासत्र किंवा व्याख्यानाद्वारे अध्यापन आणि किंवा संशोधन क्षमतेचे मूल्यांकन करेल किंवा जिथे शक्य असेल तिथे मुलाखतीच्या टप्प्यावर अध्यापन आणि संशोधनात नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या क्षमतेवर चर्चा करेल.
- उमेदवाराचे मुलाखतीचे गुण निवड समितीच्या सर्व सदस्यांनी दिलेल्या सरासरी गुणांवर आधारित असतील. किमान ५० टक्के एकूण सरासरी गुण असलेले उमेदवार केवळ गुणवत्तेच्या क्रमाने निवडीसाठी पात्र मानले जातील.
- निवड समितीच्या बैठकांचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जाईल. मुलाखतीची प्रक्रिया संपल्यानंतर लगेचच बैठकीसाठी उपस्थित असलेल्या निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्षऱ्यांखाली ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग सील केले जाईल.
- मुलाखती पूर्ण होताच त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर केले जातील.

Pune Edition
Mar 23, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यापीठातच जुंपली नळावरची भांडणे!

## व्यवस्थापन परिषद सदस्य आणि अधिसभा सदस्य यांच्यातच हमरीतुमरी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**'काही व्यवस्थापन परिषद सदस्यांना विद्यापीठ त्यांची जहागिरी वाटते. त्यांची मनमानी थांबवा,' असा घणाघात अधिसभा सदस्यांनी केल्यानंतर 'आमचा दर्जा काढता काय? आम्ही दंड थोपटून तयार आहोत, कुणाच्या वशिल्याने इथे आलो नाही,' असे प्रत्युत्तर व्यवस्थापन परिषद सदस्यांनी दिले. नाशिक जिल्ह्यातील अधिसभा सदस्य आणि व्यवस्थापन परिषद सदस्य एकमेकांवर धावले. यातूनच भर दुपारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत नळावरची भांडणे सुरू झाल्याचा फील येऊन सायंकाळपर्यंत वातावरण धुमसत राहिल्याचे चित्र पाहायला मिळाले.**

विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेच्या बैठकीत शनिवारी स्थगन प्रस्तावांवर सभागृहात चर्चा सुरू असताना एकमेकांवर होत असलेल्या चिखलफेकीमुळे नाशिक जिल्ह्यातील व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य आणि अधिसभा सदस्य अशोक सावंत यांच्यात शाब्दिक बाचाबाची होऊन ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले. सुरक्षा कर्मचाऱ्यांना मध्यस्थी करून हा वाद मिटवावा लागला. सभागृहात तापलेले वातावरण पाहून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आधिसभेचे कामकाज काही कालावधीसाठी स्थगित करत असल्याची घोषणा केली.

विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये प्रथमच कुलगुरूंच्या भाषणापूर्वी स्थगन प्रस्ताव घेण्यात आला. या स्थगन प्रस्तावामध्ये विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात आलेल्या 'जीवनसाधना गौरव पुरस्कारा'साठी निवडण्यात आलेल्या व्यक्तींच्या नावावरून वाद झाला. तसेच कार्यक्रम व्यवस्थित पार न पडल्यामुळे विद्यापीठाच्या प्रशासनावर टीका करण्यात आली. व्यवस्थापन परिषद सदस्यांनी त्यांच्या मर्जीतील माणसांना पुरस्कारांची खिरापत वाटल्याचा आरोप करण्यात आला. व्यवस्थापन परिषद सदस्यांवर झालेल्या टीकेमुळे सभागृहाचे वातावरण तापले. सर्व व्यवस्थापन सदस्यांवर सरसकट टीका करू नये, असे मत काही सदस्यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या गेल्या अनेक वर्षापासूनच्या इतिहासात प्रथमच विद्यापीठाच्या कुलगुरूंचे भाषण न होता अधिसभेचे इतर कामकाज सुरू झाले. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल अशा पद्धतीचे वातावरण अधिसभेच्या बैठकीत पाहायला मिळाले. जीवनसाधना गौरव पुरस्कार देताना विद्यापीठाची गरिमा सांभाळावी, अशी भूमिका आधिसभा सदस्यांकडून व्यक्त करण्यात आली. परंतु सभागृहाचे कामकाज कशा पद्धतीने चालावे यासंदर्भातील विसर सभागृहातील काही सदस्यांना राहिला नाही की काय? असा प्रश्न काही अनुभवी सदस्यांकडून उपस्थित करण्यात आला.



नाशिक जिल्ह्यातील अधिसभा सदस्य आणि व्यवस्थापन परिषद सदस्य एकमेकांच्या अंगावर धावून गेल्यानंतर विद्यापीठात एकच गोंधळ उडाल्याचे दिसून आले.

### विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे दबावतंत्र...

अधिसभेत स्थगन प्रस्तावाच्या चर्चेवरील भाषणात सचिन गोरडे पाटील यांनी व्यक्त केलेल्या वक्तव्यावर आक्षेप घेत विद्यापीठाच्या कामगार संघटनेने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये अधिसभेसमोर आंदोलन केले. तसेच गोरडे-पाटील यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. त्यामुळे विद्यापीठाच्या अधिसभेचे कामकाज बंद पडले. कर्मचाऱ्यांबरोबरच विद्यापीठाचे उपकुलसचिव दर्जाचे अधिकारीसुद्धा आंदोलनात सहभागी झाले. त्यांनी गोरडे-पाटील यांच्या निलंबनाची मागणी केली; परंतु त्यांचे निलंबन केले, तर अधिसभा सदस्य गप्प बसणार नाहीत आणि विद्यापीठाला अर्थसंकल्प मंजूर करून घेणे अवघड होईल, याचा सारासार विचार करून कुलगुरूंनी यासंदर्भात निर्णय घेतला नाही. जेवणानंतर अधिसभेचे कामकाज दुपारी सव्वा चारवाजेपर्यंत बंद होते. पुढे सर्व सदस्यांनी दिलगिरी व्यक्त केली. त्यानंतर कामकाज सुरु झाले.

### विद्यापीठ प्रशासनाला कारभार सुधारण्याची गरज

अधिसभा सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली जात नाहीत. त्यांनी मांडलेल्या प्रस्तावांना केराची टोपली दाखवली जाते. विद्यापीठाच्या कार्यकृती अहवालात अनेक चुका आढळून आल्या. त्यामुळे कारभार सुधारण्याऐवजी कर्मचाऱ्यांची आंदोलने घडवून अधिसभा सदस्यांचा आवाज दाबण्याचा विद्यापीठ प्रशासन प्रयत्न करत आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाला कारभार सुधारण्याची गरज असल्याचे स्पष्ट मत काही वरीष्ठ अधिसभा सदस्यांनी व्यक्त केले.




### 'एनईपी'त विद्यापीठ अग्रेसर

मागील दोन वर्षात विद्यापीठाला एनईपी धोरण पूर्णपणे लागू करता आले नसल्याचे अधिसभा सदस्य नीता मोहिते यांनी सभागृहापुढे मांडले. यावर बोलताना कुलगुरु डॉ. गोसावी म्हणाले, इतर विद्यापीठांच्या तुलनेत पुणे विद्यापीठ एनईपी लागू करण्यात अग्रेसर आहे. सुकाणू समितीच्या सूचनेनूसार विद्यापीठाने अनेक बदल केलेले आहेत. प्र-कुलगुरू काळकर म्हणाले, विद्यापीठात अद्याप शंभर टक्के एनईपी लागू झालेले नाही. काही अभ्यासक्रमांसाठी मार्गदर्शक तत्वे विद्यापीठाला प्राप्त झालेले नाहीत.

### विद्यापीठातील १०० सीसीटीव्ही बंद

विद्यापीठात गेल्या दोन वर्षांपासून तब्बल १०० सीसीटीव्ही बंद असल्याचे अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणले. त्यावर विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी विद्यापीठात १ हजार २३५ कॅमेरे आहेत. त्यातील १०० कॅमेरे बंद अवस्थेत आहेत. त्यांच्या दुरुस्तीची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, येत्या ३१ मार्चपर्यंत कॅमेरे सुरु करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांनी विद्यापीठाच्या विविध ठिकाणी असलेल्या सर्व कॅमेऱ्यांचा ॲक्सेस एकाच ठिकाणी केंद्रीय पद्धतीने करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

### सिनेट मॅनेज केली जात असल्याचा गंभीर आरोप

विद्यापीठाच्या विविध समित्यांवर ठराविक व्यक्तींचीच निवड होत असून, या व्यक्तींना पाकिट स्वरूपात आर्थिक रसद पुरविली जाते. या पाकिट संस्कृतीला चाप बसावा आणि समित्यांवर लाडका भाऊ नेमण्याची योजना बंद करावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली. तसेच आधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न नाकारले जातात. अधिसभा सदस्य यांना फोन करून सांभाळून घ्यावे, असे सांगितले जाते. तसेच अधिसभेत काय प्रश्न विचारायचे हेदेखील आता विद्यापीठातील काही व्यक्ती ठरवत आहे. छान-छान, सोयीचे प्रश्न विचारा असे आम्हाला सांगितले जात असून सिनेट मॅनेज केली जात असल्याचा गंभीर आरोप शंतनु लामधाडे यांनी केला.

My Pune Edition
Mar 23, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

सामना

### पुणे विद्यापीठाची अधिसभा स्थगित

पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभेच्या बैठकीत अधिसभा सदस्य आणि व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. चिखलफेकीमुळे नाशिक जिल्ह्यातील अधिसभा सदस्य आणि व्यवस्थापन परिषद सदस्य एकमेकांवर धावले. सुरक्षा रक्षकांना मध्यस्थी करून हा वाद मिटवावा लागला. त्यामुळे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना अधिसभेचे कामकाज स्थगित करावे लागले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये प्रथमच कुलगुरूंच्या भाषणापूर्वी स्थगन प्रस्ताव घेण्यात आला. या स्थगन प्रस्तावामध्ये विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात आलेल्या 'जीवनसाधना गौरव पुरस्कारा'साठी निवडण्यात आलेल्या व्यक्तींच्या नावावरून वाद झाला.

सभागृहात चर्चा सुरू असताना

#### सदस्यांमध्ये बाचाबाची

व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य आणि अधिसभा सदस्य अशोक सावंत यांच्यात बाचाबाची झाली. सभागृहात तापलेले वातावरण पाहून कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी कामकाज स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा केली.

अनेक वर्षांच्या इतिहासात प्रथमच कुलगुरूंचे भाषण न होता अधिसभेचे इतर कामकाज सुरू झाले. 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' देताना विद्यापीठाची गरिमा सांभाळावी, अशी भूमिका सदस्यांनी मांडली.

**सचिन गोरडे पाटील विरोधात आंदोलन**

स्थगन प्रस्तावाच्या चर्चेवरील भाषणात सचिन गोरडे पाटील यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेत विद्यापीठाच्या कामगार संघटनेने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये अधिसभेसमोर आंदोलन केले. गोरडे–पाटील यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. त्यामुळे विद्यापीठाच्या अधिसभेचे कामकाज बंद पडले. गोरडे पाटील यांचे सदस्यत्व रद्द करावे, अशी मागणी कर्मचारी व अधिकारी यांनी केली.

Pune Edition
Mar 24, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### विद्यापीठाचा अर्थसंकल्प 82 कोटी तुटीचा

#### साधक-बाधक चर्चा होऊन आज बजेट होणार मंजूर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा ५६५ कोटी ६४ लाख ५४ हजार रुपये जमेचा आणि ६४८ कोटी ३ लाख ८३ हजार रुपये खर्चाचा अर्थसंकल्प शनिवारी सायंकाळी उशिरा अधिसभेत सादर केला. हा तुटीचा अर्थसंकल्प असून, ही तूट ८२ कोटी ३९ लाख २९ हजारांची आहे.**

व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी विद्यापीठाचा अर्थसंकल्प अधिसभेत मांडला. या अर्थसंकल्पात विद्यापीठातर्फे दिल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रकमेत वाढ करण्यात आली. या शिष्यवृत्तीत १ कोटी ८५ लाखांनी रक्कम वाढविण्यात आली आहे. यात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अर्थसाहाय्य योजना, महात्मा जोतिराव फुले अर्थसाहाय्य योजना, स्वामी विवेकानंद अर्थसाहाय्य योजना, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाहाय्य योजना आणि छत्रपती शिवाजी महाराज अर्थसाहाय्य योजनांचा समावेश आहे.





विद्यापीठात नव्याने बांधकाम सुरू करण्यात येणार नाही. मात्र, पूर्वीपासून जे बांधकाम सुरू आहे, ते पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. सर्व बांधकामामध्ये नियमितता, गतिमानता, कालबद्धता आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यासाठी विद्यापीठ आवारातील इमारती बांधकामासाठी एकूण ५८ कोटी व इतर सुविधा-सुधारणांसाठी १३ कोटींची तरतूद करण्यात आली आहे, असेही शिंगणापूरकर यांनी स्पष्ट केले.

ॲनिमल हाऊस बांधकामासाठी ३ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले आहे. संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी चौदा मजली संशोधन इमारत तसेच विद्यार्थी वसतिगृहाच्या दोन स्वतंत्र इमारती बांधण्यात येत असून, प्रत्येक वसतिगृहाची ५१३ विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था होणार आहे. विद्यापीठातील पाणीपुरवठा योजना अधिक सक्षम व नियोजनबद्ध करण्यासाठी ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. विविध विभागांत लिफ्ट बसविण्यासाठी २५ लाख तरतूद प्रस्तावित केली आहे. विद्यापीठातील विद्युतीकरण सक्षम करण्यासाठी १ कोटींची तरतूद अर्थसंकल्पात आहे. दरम्यान, अर्थसंकल्पात एका ठिकाणी अडीच कोटी रक्कम तब्बल २५ कोटींची दाखविण्यात आली. त्यावर अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला स्पष्टीकरण विचारले. यावरून चांगलीच खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले. अधिसभा सदस्य डॉ. विनायक आंबेकर यांनी यावरून सभात्याग केला. परंतु, कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांच्या विनंतीला मान देऊन डॉ. आंबेकर पुन्हा सभागृहात आले. त्यानंतर शनिवारचे अधिसभेचे कामकाज संपले. आता आज रविवारी सकाळी साडेदहा वाजता पुन्हा अधिसभेचे कामकाज सुरू होईल. या वेळी अर्थसंकल्पातील विविध बाबींवर चर्चा करून तो मंजूर केला जाणार आहे. त्यानंतर वार्षिक अहवाल, क्रीडा अहवाल मांडण्यात येईल तसेच शक्य झाल्यास प्रस्ताव आणि प्रश्नांवर चर्चा होईल आणि अर्थसंकल्पीय अधिसभेची सांगता होणार आहे.

Pune Edition
Mar 23, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठाचा तुटीचा अर्थसंकल्प

## ८२ कोटींची तूट; शिष्यवृत्ती, संशोधनावर भर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण ५६६ कोटी रुपये जमा आणि ६४८ कोटी रुपये खर्च असलेला अर्थसंकल्प मांडण्यात आला. यंदा अर्थसंकल्पात ८२ कोटी रुपयांची तूट दाखवण्यात आली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत १७ कोटी रुपयांनी तूट कमी झाली आहे. अर्थसंकल्पात चार शिष्यवृत्ती योजना, संशोधन, गुणवत्तावाढ, विद्यार्थी विकास, विद्यार्थी वसतिगृह अशा घटकांवरील भरीव तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा शनिवारी झाली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अधिसभेला प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे आदी उपस्थित होते. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाला अधिसभेने मान्यता दिली.

अर्थसंकल्पात विद्यार्थी विषयक सेवा व सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रम, उपकेंद्रांचे बांधकाम यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच, संशोधन प्रकल्प प्रसिद्धी, नावीन्यता जागरुकता योजना, बौद्धिक संपदा हक्क यासाठीही अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात आली आहे. संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी विद्यार्थी वसतिगृहाच्या १४ मजली दोन स्वतंत्र इमारती बांधण्यात येत आहेत. प्रत्येक वसतिगृहात ५१३ विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था होणार आहे. तसेच, वसतिगृह क्षमता वाढ, आणि देखभाल-विकासासाठी २९ कोटी ५६ लाख रुपयांची तरतूद आहे.

विद्यार्थ्यांसाठीच्या चार शिष्यवृत्त्यांसाठीची तरतूद एक कोटी ८५ लाख रुपयांनी वाढवण्यात आली आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अर्थसाहाय्य योजनेसाठी १ कोटी २५ लाख रुपये, महात्मा जोतिराव फुले अर्थसाहाय्य योजनेसाठी २ कोटी ३० लाख रुपये, राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसाहाय्य योजनेसाठी २ कोटी ३० लाख रुपये, स्वामी विवेकानंद अर्थसाहाय्य योजनेसाठी २ कोटी २५ लाख रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेअंतर्गत ७ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### अर्थसंकल्पातील प्रमुख तरतुदी

- क्रांतीवर बिरसा मुंदडा आदिवासी अध्यासन स्थापना : ५ लाख रुपये
- नाशिक, अहिल्यानगर उपकेंद्र इमारत बांधकाम : प्रत्येकी ५ कोटी रुपये
- प्राणिगृह बांधकाम : ३ कोटी रुपये
- विद्यार्थी विकास मंडळाची देखभाल आणि विकास : १२ कोटी ९६ लाख रुपये
- विद्यापीठातील पाणीपुरवठा योजना : ५० लाख रुपये
- विविध इमारतींमध्ये उद्वाहन व्यवस्थेसाठी : २५ लाख रुपये
- गुणवत्ता सुधार कार्यक्रम : १३ कोटी रुपये
- संशोधन योजना : ७ कोटी ५० लाख रुपये
- समर्थ भारत अभियान : ५० लाख रुपये
- युवा महोत्सव आणि स्पर्धा : १ कोटी ४० लाख रुपये

23/03/2025 | LS_SUN_City | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

member, and Ashok ... member Sachin Ghorde Patil's ... least in the previous two decades.

# Rs 648.03 cr Pune University budget presented, Rs 21 crore hike from last year

SOHAM SHAH
PUNE, MARCH 22

A BUDGET of Rs 648.03 crore for the financial year 2025-26 was presented before the Savitribai Phule Pune University Senate by Management Council member Ravindra Shingnapurkar on Saturday night.

A deficit of Rs 82.3 crore was estimated with revenue for the year being estimated at Rs 566 crore.

The budget marks an increase of Rs 21 crore compared to the previous year's budget.

The budget proposal allotted Rs 7.5 crore for research while Rs 12.96 crore has been allotted to caretaking and development of student development.

Rs 5 crore each is allotted for building and construction work of the Nashik and Ahilyanagar (Ahmednagar) sub-centre. Rs 3 crore has been allotted for construction of an "animal house".

Among other allocations under the caretaking section of the budget, Rs 8 lakh has been allotted for the Research Publication Portal of SPPU and Rs 5 lakh has been allotted for Intellectual Property Rights.

Under the development budget, Rs 10 lakh has been allotted for 'Carbon Credit and Green Audit' and 'Science Park' each under the development section.

**UNIVERSITY ALLOCATIONS MADE**

| Departments | Estimated amount |
|---|---|
| **Caretaking** | |
| Salaries (state govt aided) | Rs 126.95 cr |
| Salaries (unaided) | Rs 81.03 cr |
| **Non salary expenditure** | |
| Admin department | Rs 20.72 cr |
| student services, facilities | Rs 225.28 cr |
| Edu quality improvement | Rs 13.2 cr |
| Infra services dept | Rs 51.81 cr |
| **Development** (capital expenditure) | |
| Admin department | Rs 1.66 cr |
| Student services, facilities | Rs 10.81 cr |
| Infra services dept | Rs 5.41 cr |
| Constructions, facilities, improvements | Rs 71.99 cr |
| Projects, schemes (grants) | Rs 39.14 cr |
| TOTAL | Rs 648.06 cr |

### Schemes

Budgetary outlay for four out of six University schemes has been increased in the proposal. The outlay for Lokshahir Annabhau Sathe Financial Assistance Scheme has been increased from Rs 1 crore to Rs 1.25 crore, for Mahatma Jyotirav Phule Financial Assistance Scheme has been increased from Rs 2 crore to Rs 2.3 crore, for Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Financial Assistance scheme has been increased from 2 crore to 2.3 crore, and for Swami Vivekanand Financial Assistance Scheme has been increased from Rs 1.25 crore to 2.25 crore.

The outlay for Krantijyoti Savitribai Phule Financial Assistance Scheme and Chhatrapati Shivaji Maharaj Financial Assistance Scheme remains the same at 1 crore. Rs 5 lakh has been set aside for the initial expenditure for the establishment of the Krantiveer Birsa Munda Adivasi Chair till funds from the government are received.

The Indian Express 23.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

SENATE MEMBERS ALLEGE CORRUPTION, FAVOURITISM

# Chaos at SPPU senate meet over committees, anniversary event

Members almost come to blows, administration staff interrupts proceedings

SOHAM SHAH
PUNE, MARCH 22



Senate members levelled allegations against the Management Council. *Soham Shah*

CHAOS ENSUED on the first day of the Senate meeting of Savitribai Phule Pune University as members alleged irregularities in the appointment of committee members and alleged mismanagement of the anniversary event of the University held last month.

Trouble began early in the day as Senate members prevented Vice-Chancellor Suresh Gosavi from delivering his address and demanded that adjournment motions be taken up before the address. After a lengthy discussion, Gosavi agreed to the demand and a list of adjournment motions were taken up.

Senate members levelled allegations of corruption, favouritism and 'ruining the reputation of the University' against members of the Management Council. They alleged that the Senate was not consulted before conferring the SPPU Jeevansadhna Gaurav award to 10 people last month at the University's Anniversary event. Members further alleged that some of the awards were conferred on undeserving people 'close to the Management Council members'. Separately, Senate members also alleged that the same people were repeatedly being appointed to committees of the University and pointed out alleged irregularities in their functioning.

Sagar Vaidya, Management Council member, and Ashok Sawant, Senate member, almost came to blows during this discussion but were blocked by other members and security was brought in. Ashok Sawant had joined the other members in accusing the Management Council of wrongdoings. Vaidya then rose to defend himself, and the incident took place a few minutes after he started speaking. The meeting was then adjourned by the chair. Further interruption came due to a protest by administrative workers of the University objecting to Senate member Sachin Ghorde Patil's statements accusing the University administration of wrongdoings.

After the session was resumed after the protest, Vaidya, Sawant and Ghorde Patil issued apologies to the house. Vice Chancellor Suresh Gosavi also expressed regret at the events that unfolded in the house and requested members to keep the dignity of the house in mind. University staff pointed out that such an incident had not occurred in Senate meetings at least in the previous two decades.

The Indian Express 23.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# 'एमबीए'मध्येही आता 'एआय'चा बोलबाला!

## विविध शाखांचा होणार उदय । बिझनेस ॲनालिटिक्ससह विविध शाखांत एआयचा प्रभाव

पुढारी विशेष

**गणेश खळदकर**
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : माणसांचा स्वभाव, त्यांच्या आवडी-निवडी, मनुष्याची भविष्यातील खरेदी, वस्तूंचा पुरवठा आदींचा अभ्यास मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन अर्थात एमबीएच्या काही शाखांमध्ये केला जात आहे. त्यात आता आर्टिफिशीयल इंटेलिजन्स अर्थात एआयचा प्रभाव वाढला आहे. त्यामुळे सध्या अभियांत्रिकी क्षेत्रात जशा एआय आणि अभियांत्रिकी शाखा मिळून नवीन शाखा उदयास आल्या आहेत, तशाच शाखा एमबीएमध्ये उदयास येणार असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली आहे.**




अनेक विद्यापीठे तसेच महाविद्यालये 'एआय'चे महत्त्व लक्षात घेऊन व्यवस्थापनामध्ये होत असलेल्या 'एआय'च्या वापरासंदर्भातील विविध शाखा सुरू करण्यास उत्सुक आहेत. 'एआय' हा एक तांत्रिक प्रकार असून, उद्योग आणि आयटी क्षेत्रात सध्या त्याचा प्रभावी वापर सुरू आहे, तर आरोग्य, कृषी यांसह अन्य क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर त्याचा वापर करण्यात येत असून, भविष्यात विविध क्षेत्रात 'एआय'चा मोठ्या प्रमाणात वापर वाढणार आहे. त्यामुळे खासगी विद्यापीठांमध्ये देखील व्यवस्थापनात 'एआय'चा वापर करून नवनवीन स्पेशलायझेशन आणण्याचे प्रकार सुरू आहेत.

एआय आणि एमबीए स्पेशलायझेशनमध्ये सध्या 'एआय इन फायनान्स' ही शाखा जोर धरणार आहे. ज्यामध्ये आर्थिक धोरणे आणि जोखमीचे व्यवस्थापन 'एआय'च्या मदतीने प्रभावीपणे करण्यात येणार आहे. अल्गोरिदमिक ट्रेडिंग, क्रेडिट स्कोअरिंग आणि धोरणात्मक गुंतवणुकीत 'एआय'चा वापर वाढणार आहे. वित्तीय अंदाज, खर्च नियंत्रण आणि लाभ वाढवण्यासाठी मशीन लर्निंगचा वापर केला जाणार आहे. 'एआय इन मार्केटिंग'मध्ये ग्राहकांच्या वर्तनाचा अभ्यास करून वैयक्तिकृत विपणन रणनीती तयार करणे, सोशल मीडिया, जाहिरात मोहीम आणि ग्राहक प्रतिबद्धतेत सुधारणा करणे, उत्पादन शिफारसी, बाजारातील ट्रेंडचे विश्लेषण आणि विपणन धोरणांची अंमलबजावणी याचा अभ्यास संबंधित शाखेत करता येणार आहे.

एआय इन बिझनेस ॲनालिटिक्समध्ये मोठ्या प्रमाणावर डेटा विश्लेषण आणि डेटावर आधारित धोरणात्मक निर्णय घेणे तसेच बाजारातील ट्रेंड आणि ग्राहकांच्या वर्तनाचे अंदाज व विश्लेषण करण्यासाठी प्रेडिक्टिव्ह मॉडेल्स, विश्लेषणात्मक अहवाल तयार करण्यासाठी एआय वापराचा अभ्यास करता येणार आहे.

'एआय इन ऑपरेशन्स आणि सप्लाय चेन मॅनेजमेंट'मध्ये पुरवठा साखळीतील मागणी-पुरवठा विश्लेषण आणि व्यवस्थापन सुधारणा करण्यासाठी, उत्पादकता आणि कार्यक्षमतेसाठी स्वयंचलित प्रक्रिया वापरणे तसेच लॉजिस्टिक्स आणि वितरण प्रणालींचे अनुकूलन करण्यासाठी एआयचा वापर कसा करता येईल, हे अभ्यासता येणार आहे.

> 'एमबीएमध्ये डाटा ॲनालिटिक्स' ही एक शाखा आहे, ज्या शाखेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद आहे. ज्यामध्ये एआयचा वापर शिकवण्यात येत आहे. व्यवस्थापनात एआयचा वापर तशा अर्थाने नवीन संकल्पना आहे. सध्या एमबीएमध्ये थेट एआयला धरून कोणतेही स्पेशलायझेशन नाही. परंतु भविष्यात एमबीए आणि एआय मिळून नवीन विविध शाखा उदयास आलेल्या दिसून येतील.
>
> \- **डॉ. प्रफुल्ल पवार**, संचालक, स्कूल ऑफ बिझनेस, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> कृत्रिम बुद्धिमत्ता हे आजच्या व्यवसाय आणि व्यवस्थापन जगतात क्रांती घडवणारे तंत्रज्ञान ठरले आहे. उद्योगांमध्ये वेगाने बदल होत असल्यामुळे व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यात आल्या आहेत. परिणामी, नवीन एआय आधारित स्पेशलायझेशन तयार करण्यात आली आहेत. तसेच अभ्यासक्रमात सुधारणादेखील करण्यात आल्या आहेत.
>
> \- **प्रा. ऋषिकेश काकांडीकर**, सहयोगी प्राध्यापक, साईबालाजी इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सेस, पुणे

Pune Edition
Mar 24, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

पुणे, सोमवार, २४ मार्च २०२५

# अधिसभेत दुसऱ्या दिवशीही घमासान!

**अर्थसंकल्पात कुलगुरू निधीत तब्बल २५ लाख रुपयांची कपात ▪ कपात सूचनांवर साधक-बाधक चर्चा**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत शनिवारी झालेला गोंधळ, हमरीतुमरीनंतर रविवारीही घमासान चर्चा झाली. अधिसभा सदस्यांना बोलू न देणे, अर्थसंकल्पातील त्रुटींवरून विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. विद्यापीठाचा केंद्रबिंदू विद्यार्थी असूनही विद्यार्थी, शिक्षण, संशोधनाविषयी अधिसभेत चर्चाच होत नाही. अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पुरेसा निधी दिलेला नाही, याबाबत अधिसभा सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले.**

विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेत २०२५ - २६ या आर्थिक वर्षासाठी एकूण ५६६ कोटी रुपये जमा आणि ६४८ कोटी रुपये खर्च असलेला अर्थसंकल्प मांडण्यात आला. यंदा अर्थसंकल्पात ८२ कोटी रुपयांची तूट दाखवण्यात आली आहे. अधिसभा सदस्यांनी मांडलेल्या कपात सूचनांमध्ये डॉ. विनायक आंबेकर यांनी कुलगुरू निधीत सुचवलेली २५ लाख रुपयांची कपात विद्यापीठ प्रशासनाला मान्य करावी लागली. अनेक कपात सूचनांवर साधक-बाधक चर्चा झाल्यानंतर अखेर अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली.

अधिसभा सदस्य निवडून आलेले आहेत. अधिसभा हे समाजाचे प्रतिबिंब आहे. कुलगुरू, प्र. कुलगुरू, कुलसचिव यांनी विसंवाद दूर करण्यासाठी काम करावे, असे अधिसभा सदस्य बाळासाहेब सागडे यांनी सांगितले. आंदोलन करायचे असल्यास पूर्वकल्पना द्यायची, असे विद्यापीठाचे परिपत्रक आहे. शनिवारी झालेल्या आंदोलनाची पूर्वकल्पना होती का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

अशा प्रकारे सभागृहात येऊन आंदोलन केले जाणार असल्यास अधिसभेला अर्थ काय, कुलगुरूंनी कठोर भूमिका घ्यावी, अशी भूमिकाही मांडण्यात आली. याबाबत बोलताना कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, विद्यापीठ प्रशासन आणि अधिसभा सदस्य यांच्यात सुसंवाद राहण्यास प्राधान्य दिले जाईल. चुकीच्या बाबी समोर आणण्याचा सदस्यांना अधिकार आहे. कालचा झालेला प्रकार विसरून आपण सगळे मिळून विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घालण्यासाठी प्रयत्न करूया.

अधिसभेत विद्यार्थ्यांसाठी बोलले पाहिजे, परंतु त्यांच्याविषयी चर्चाच होत नाही. वैयक्तिक हेवेदावे विसरून विद्यार्थ्यांसाठीच चर्चा झाली पाहिजे, असे स्पष्ट मत अधिसभा सदस्य प्रसेनजित फडणवीस यांनी मांडले. विद्यार्थी, संशोधन, शिक्षण यावर चर्चा होत नाही. आरोप-प्रत्यारोप होत राहणे योग्य नाही, असे बाकेराव बस्ते यांनी नमूद केले. संशोधनाला चालना देण्यासाठी, गुणवत्ता उंचावण्यासाठी निधी देण्याची मागणी अधिसभा सदस्य अशोक सावंत यांनी केली.

शिष्यवृत्तीसाठीच्या निधीचा वापर होत नसल्याच्या मुद्द्यावर प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी स्पष्टीकरण दिले. 'विद्यार्थ्यांना एकापेक्षा जास्त शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही,' असा नियम होता. त्यामुळे विद्यापीठाच्या योजनांसाठी विद्यार्थी तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरत नव्हते. आता योजनेचे स्वरूप बदलण्यात आले आहे. त्यामुळे आता अधिकाधिक विद्यार्थी योजनेला पात्र ठरतील. त्यामुळे योजनेतील निधी वापरला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. विनायक आंबेकर म्हणाले, विद्यापीठ दरवर्षी अर्थसंकल्प सादर करताना मूळ गोष्टींकडे लक्ष देत नाही, असे तरतुदी पाहिल्यानंतर लक्षात येते. सदस्यांना किमान आठ दिवस अगोदर अर्थसंकल्प वाचण्यासाठी मिळायला हवा. ऐनवेळी अर्थसंकल्पाची प्रत मिळाल्यानंतर बदल सूचविता येत नाही.

अद्वैत बंबोली म्हणाले, अर्थसंकल्पातील काही मुद्दे पाहिल्यानंतर आश्चर्यकारक बदल दिसले. दरवेळी आम्ही प्रशासनाला चुका लक्षात आणून देतो. परंतु, प्रशासन दुरुस्ती करत नाही. मागच्याच अर्थसंकल्पातील काही तरतुदी आणल्या आहेत. सचिन गोरडे म्हणाले, ग्रामीण विद्यार्थ्यांवर विद्यापीठ केवळ ३ टक्के निधी खर्च करते, हे खेदजनक आहे. उपकेंद्रांना कमी निधी दिला जातो. त्यामुळे उपकेंद्रातील कामे वेळेत पूर्ण होत नाहीत. या अर्थसंकल्पात व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचा प्रभाव दिसत नाही.

### भरतीची कार्यवाही लवकरच...

विद्यापीठात रिक्त असलेल्या अधिष्ठाता, कुलसचिव, प्राध्यापक भरतीची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. तसेच पूर्णवेळ प्लेसमेंट ऑफिसर नियुक्त करण्यात येणार आहे, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सांगितले.

### पदोन्नतीसाठी पैसे मागितले जात असल्याचा आरोप...

प्राध्यापकांच्या कॅस संदर्भातील चर्चेदरम्यान सहसंचालक कार्यालयात पदोन्नतीसाठी पैसे मागितले जातात. प्राध्यापकांना पदोन्नती, पगारवाढीसाठीही पैसे खर्च करावे लागतात, असा आरोप अधिसभा सदस्य सचिन गोरडे पाटील यांनी केला.

### पुढील तीन महिन्यांत प्लेसमेंट सेल पूर्ण क्षमतेने सुरू करणार...

विद्यापीठाचा प्लेसमेंट सेल बंद अवस्थेत असल्याचे अधिसभा सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. प्लेसमेंट सेलमध्ये पुरेसे मनुष्यबळ नसल्याने त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होतो. या संदर्भात दोन वर्षांपासून पाठपुरावा सुरू असल्याचे सदस्यांनी प्रशासनाला सांगितले. याबाबत कुलगुरू व प्र-कुलगुरू यांनी पुढील तीन महिन्यांत पूर्ण क्षमतेने प्लेसमेंट सेल कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले. कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, 'प्लेसमेंट सेलचे यापूर्वीच्या संचालकांनी उत्कृष्ट काम केले. काही कारणास्तव या ठिकाणी पुरेसे मनुष्यबळ नाही. प्लेसमेंट सेलच्या समस्या तातडीने सोडविल्या जातील. पुढील तीन महिन्यांत प्लेसमेंट सेल पूर्ण क्षमतेने सुरू केला जाणार आहे.

Pune Edition
Mar 24, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# अधिसभेत पुन्हा चर्चेचे घमासान

## चर्चेच्या केंद्रस्थानी विद्यार्थी नसल्याबाबत नाराजी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत शनिवारी झालेल्या गोंधळ, हमरीतुमरीनंतर रविवारीही घमासान चर्चा झाली. शनिवारी मांडलेल्या अर्थसंकल्पाला दुरुस्त्यांसह मंजुरी देण्यात आली. अधिसभा सदस्यांना बोलू न देणे, अर्थसंकल्पातील त्रुटींवरून विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. तसेच, विद्यापीठाचा केंद्रबिंदू विद्यार्थी असूनही विद्यार्थी, शिक्षण, संशोधनाविषयी अधिसभेत चर्चाच होत नाही, अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पुरेसा निधी दिलेला नाही, याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण ५६६ कोटी रुपये जमा आणि ६४८ कोटी रुपये खर्च असलेला अर्थसंकल्प मांडण्यात आला. यंदा अर्थसंकल्पात ८२ कोटी रुपयांची तूट दाखवण्यात आली आहे. अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अधिसभा सदस्यांनी मांडलेल्या दुरुस्त्या विद्यापीठ प्रशासनाने मान्य केल्यावर अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

अधिसभा सदस्य निवडून आलेले आहेत. अधिसभा हे समाजाचे प्रतिबिंब आहे. कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव यांनी विसंवाद दूर करावा, असे अधिसभा सदस्य बाळासाहेब सागडे यांनी सांगितले. आंदोलनासाठी पूर्वपरवानगी घेण्याचे विद्यापीठाचे परिपत्रक असताना कर्मचाऱ्यांच्या शनिवारच्या आंदोलनाची पूर्वकल्पना दिली होती का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अशा प्रकारे सभागृहात येऊन आंदोलन केले जाणार असल्यास अधिसभेला अर्थ काय, कुलगुरूंनी कठोर भूमिका घ्यावी, अशी भूमिकाही सदस्यांनी मांडली.

‘अधिसभेत विद्यार्थ्यांसाठी बोलले पाहिजे. मात्र, त्यांच्याविषयी चर्चाच होत नाही. वैयक्तिक हेवेदावे विसरून विद्यार्थ्यांसाठीच चर्चा झाली पाहिजे,’ असे स्पष्ट मत अधिसभा सदस्य प्रसेनजित फडणवीस यांनी मांडले. विद्यार्थी, संशोधन, शिक्षण यावर चर्चा होत नाही. आरोप-प्रत्यारोप होत राहणे योग्य नाही, असे बाकेराव बस्ते यांनी नमूद केले. तर, ‘विद्यापीठात होणारे वाद विद्यार्थी विद्यापीठाकडे वळण्यापासून रोखत आहेत,’ असे व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या संशोधनाला चालना देण्यासाठी, विद्यार्थ्यांना गुणवत्ता उंचावण्यासाठी निधी देण्याची मागणी अधिसभा सदस्य अशोक सावंत यांनी केली.

शिष्यवृत्तींसाठीच्या निधीचा वापर होत नसल्याच्या मुद्द्यावर प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी स्पष्टीकरण दिले. ‘विद्यार्थ्यांना एकापेक्षा जास्त शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही, असा नियम होता. त्यामुळे विद्यापीठाच्या योजनांसाठी विद्यार्थी तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरत नव्हते. आता योजनेचे स्वरूप बदलण्यात आले आहे. त्यामुळे आता अधिकाधिक विद्यार्थी योजनेला पात्र ठरतील. त्यामुळे योजनेतील निधी वापरला जाईल,’ असे त्यांनी नमूद केले.

### भरती लवकरच

विद्यापीठात रिक्त असलेल्या अधिष्ठाता, कुलसचिव, प्राध्यापक भरतीची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. तसेच, पूर्णवेळ प्लेसमेंट ऑफिसर नियुक्त करण्यात येणार आहे, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सांगितले.

### पदोन्नतीसाठी पैसे मागितले जात असल्याचा आरोप

‘प्राध्यापकांच्या कॅस संदर्भातील चर्चेदरम्यान सहसंचालक कार्यालयात पदोन्नतीसाठी पैसे मागितले जातात. प्राध्यापकांना पदोन्नती, पगारवाढीसाठीही पैसे खर्च करावे लागतात,’ असा आरोप अधिसभा सदस्य सचिन गोरडे पाटील यांनी केला.

24/03/2025 | Pune | Page : 05
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# चर्चेनंतर अर्थसंकल्प मंजूर

## अर्थसंकल्पातील त्रुटींवरून सिनेटमध्ये विद्यापीठ प्रशासन धारेवर

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**




### विद्यार्थी प्रश्नांवर आणि समस्यांवर चर्चा व्हावी

सिनेटमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आणि समस्यांवर बोलले पाहिजे. मात्र, विद्यार्थीहीताची चर्चाच होत नाही. आपसांमधील वाद विसरून विद्यार्थ्यांसाठीच चर्चा झाली पाहिजे, अशी भूमिका सदस्य प्रसेनजित फडणवीस यांनी मांडली. 'सभागृहात विद्यार्थी, संशोधन, शिक्षण यावर चर्चा होत नाही. आरोप-प्रत्यारोप होत राहणे योग्य नाही,' असे बाकेराव बस्ते यांनी नमूद केले. पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलात होणारे वाद विद्यार्थी विद्यापीठाकडे वळण्यापासून रोखत आहेत, असे स्पष्टीकरण व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी दिले. विद्यार्थ्यांच्या संशोधनाला चालना देण्यासाठी, विद्यार्थ्यांना गुणवत्ता उंचावण्यासाठी निधी देण्याची मागणी सदस्य अशोक सावंत यांनी केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेटमध्ये रविवारीही विविध मुद्द्यांवर घमासान चर्चा झाली. सभागृहात सदस्यांना बोलू न देणे, प्रलंबित शैक्षणिक प्रश्न, अर्थसंकल्पातील त्रुटींवरून विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. दोन दिवसांच्या कामकाजत विद्यापीठाचा केंद्रबिंदू विद्यार्थी असूनही विद्यार्थी, शिक्षण, संशोधन, रोजगार संधी आदी महत्त्वाच्या विषयांवर सिनेटमध्ये चर्चाच होत नाही, अशी नाराजी काही सदस्यांनी व्यक्त करण्यात केली. या चर्चेतच विद्यापीठाच्या अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली.

पुणे विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेत २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी ५६६ कोटी रुपये जमा आणि ६४८ कोटी रुपये खर्च असलेला अर्थसंकल्प मांडण्यात आला. या अर्थसंकल्पात ८२ कोटी रुपयांची तूट दाखवण्यात आली आहे. अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. या चर्चेत विनायक आंबेकर, प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे, जयंत काकतकर, अद्वैत बंबोली, बाळासाहेब सागडे, दादाभाऊ शिनलकर, बाळासाहेब सागडे, प्रा. हर्ष गायकवाड आदींनी सहभाग घेतला. सदस्यांनी मांडलेल्या काही कपात सूचना विद्यापीठ प्रशासनाने मान्य केल्यावर अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली.

'सिनेट सदस्य निवडून आले असून, सिनेट समाजाचे प्रतिबिंब आहे. अशा वेळी कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव यांनी विसंवाद दूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा,' असे सागडे यांनी सांगितले. 'विद्यापीठाने परिपत्रक प्रसिद्ध करीत, आंदोलन करायचे असल्यास पूर्वकल्पना द्यायची, असे बजावले आहे. असे असताना शनिवारी झालेल्या आंदोलनाची पूर्वकल्पना होती का,' असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अशा प्रकारे सभागृहात येऊन आंदोलन केले जाणार असल्यास सिनेटला अर्थ काय? अशा प्रकरणांत कुलगुरूंनी कठोर भूमिका घ्यावी, अशी भूमिकाही सदस्यांनी मांडली. यापूर्वी, विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तींचा लाभ घेता येणार नाही, असा नियम होता. या अटीमुळे विद्यापीठाच्या योजनांसाठी विद्यार्थी पात्र ठरत नव्हते. मात्र, आता योजनेचे स्वरूप बदलण्यात आले आहे. त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थी योजनेला पात्र ठरतील आणि योजनेतील निधी वापरला जाईल, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी दिली. दरम्यान, अधिसभा सदस्य सचिन गोरडे पाटील यांनी महिलांबाबत अपशब्द वापरलेले नाहीत. त्यांनी बोली भाषेतील म्हण वापरली होती. चुकीचे आरोप करून अधिसभा सदस्याला धारेवर धरले जात असल्याच्या प्रकाराचा निषेध करण्यात आला. 'प्राध्यापकाच्या पदोन्नतीसाठी कॅस प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत उच्चशिक्षण विभागाच्या सहसंचालक कार्यालयातून पैसे मागितले जातात. प्राध्यापकांना पैसे खर्च करावे लागतात. त्याशिवाय वेतनवाढ आणि पदोन्नती होत नाही,' असे गोरडे पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

Maharashtra Times 24.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

लोकमत

# पुरस्कारांच्या संख्येमध्ये कपात करावी, निकषानुसार पुरस्कार देताना मत घ्या !

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत प्रस्ताव, योग्य त्याच व्यक्तीस पुरस्कार देणे आवश्यक असल्याचे व्यक्त केले मत, प्रतिष्ठा जपूनच प्रत्येक निर्णय घेण्याची झाली मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून वर्धापनदिनी दरवर्षी विविध क्षेत्रांतील दहा मान्यवर व्यक्तींना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. अधिसभा सदस्य विनायक आंबेकर यांनी जीवनगौरव पुरस्काराऐवजी डी.लिट पदवी द्यावी, पुरस्कारांच्या संख्येत कपात करावी आणि निकषानुसार पुरस्कार देताना अधिसभा सदस्यांचे मत विचारात घेण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाच्या चर्चेत अशोक सावंत, अपूर्व हिरे, शंतनू लामधाडे, प्रसेनजित फडणवीस, सचिन गोरडे यांनी सहभाग घेतला.

विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवी वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांसाठी प्रशासनाची झालेली पळापळ आणि जीवनगौरव पुरस्कारांच्या खैरातीवर अधिसभा सदस्यांनी शनिवारी झालेल्या अधिसभेत तीव्र आक्षेप नोंदवला. अधिसभा सदस्यांना विचारात न घेता तसेच व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांच्या मर्जीतल्या व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड केली जात असून, यामुळे विद्यापीठाची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप सदस्यांनी केला. यानंतर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी यापुढचा वर्धापनदिन कार्यक्रम दर्जेदार होईल, असे सभागृहाला आश्वासित केले.

विद्यापीठाचा प्रतिष्ठित पुरस्कार एखाद्या व्यक्तीने नाकारला तर विद्यापीठाची अब्रू जाईल. त्यामुळे सर्वांशी चर्चा करून पुरस्कार द्यावेत. शंतनू लामधाडे म्हणाले, विद्यापीठाच्या विविध समित्यांवर ठराविक व्यक्तींचीच निवड होत असून या व्यक्तींना पाकीट स्वरूपात आर्थिक रसद पुरविली जाते. या पाकीट संस्कृतीला चाप बसावा आणि समित्यांवर लाडका भाऊ नेमण्याची योजना बंद करावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली. तसेच अधिसभेत काय प्रश्न विचारायचे हेदेखील आता विद्यापीठातील काही व्यक्ती ठरवत आहे. छान-छान, सोयीचे प्रश्न विचारा असे आम्हाला सांगितले जात असून सिनेट मॅनेज केली जात असल्याचा गंभीर आरोप शंतनू लामधाडे यांनी केला. उत्तर देताना कुलगुरू म्हणाले, विद्यापीठाकडून दरवर्षी चर्चा करूनच पुरस्कारार्थींची नावे अंतिम केली जातात. यापुढे मी स्वत: काळजी घेईन. यापूर्वी डी. लिट पदवी दिली जात होती.

#### काही त्रुटी राहिल्यात...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नवे शैक्षणिक धोरण लागू झाले तरी काही त्रुटी राहिल्याचे अधिसभा सदस्य नीता मोहिते यांनी सभागृहापुढे मांडले.

#### इतर विद्यापीठांच्या तुलनेत आपण अग्रेसर

इतर विद्यापीठांच्या तुलनेत पुणे विद्यापीठ एनईपी लागू करण्यात अग्रेसर आहे. सुकाणू समितीच्या सूचनेनुसार विद्यापीठाने अनेक बदल केलेले आहेत, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले.

Hello Pune
Page No. 2 Mar 24, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

मस्ट READ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ६४८ कोटी रुपये खर्चाचा अर्थसंकल्प सादर; संशोधन प्रकल्पावर देणार भर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी अर्थसंकल्प सादर केला. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण ५६६ कोटी रुपये जमेचा, तर ६४८ कोटी रुपये खर्चाचा हा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पात एकूण ८२ कोटी रुपयांची तूट दर्शविण्यात आली आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत १७ कोटी रुपयांनी तूट कमी झाली आहे. दरम्यान, यंदा नव्याने विकासकामे हाती न घेता आधीची पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच चार शिष्यवृत्ती योजनांसाठी वाढीव तरतूद करण्यात आली आहे. क्रांतिवीर बिरसा मुंदडा आदिवासी अध्यासन स्थापनेसाठी पाच लाख रुपये, नाशिक आणि अहिल्यानगर उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी प्रत्येकी पाच कोटी रुपये, प्राणीगृह बांधणीसाठी तीन कोटी रुपये, विद्यार्थी विकास मंडळाच्या देखभाल आणि विकासासाठी १२.९६ कोटी रुपये, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेंतर्गत ७.५० कोटी रुपये अशी तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थीविषयक सेवा व सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रम, उपकेंद्रांचे बांधकाम यावर विशेष खर्च करण्यात आला आहे. संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी १४ मजली संशोधन विद्यार्थी वसतिगृह 'अ' आणि 'ब' अशा दोन स्वतंत्र इमारती बांधण्यात येत असून, प्रत्येक वसतिगृहात ५१३ विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी नव्याने वसतिगृह बांधणे, क्षमता वाढविणे आणि देखभाल व विकासापोटी २९.५६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय यंदा चार शिष्यवृत्ती योजनांमधील तरतुदीत वाढ करण्यात आली असून, संशोधन आणि गुणवत्ता, विद्यार्थी विकास, विद्यार्थी वसतिगृहासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

संशोधन प्रकल्प प्रसिद्धी, नावीन्यता जागरूकता योजना, बौद्धिक संपदा हक्क, यावरही विशेष तरतूद करण्यात आली आहे.



#### शिष्यवृत्तीसाठी अशी असेल तरतूद

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अर्थसाहाय्य योजना - १.२५ कोटी

**महात्मा जोतिराव फुले अर्थसाहाय्य योजना - २.३० कोटी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसाहाय्य योजना - २.३० कोटी

**स्वामी विवेकानंद अर्थसाहाय्य योजना - २.२५ कोटी**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाहाय्य योजना - १ कोटी

**छत्रपती शिवाजी महाराज अर्थसाहाय्य योजना - १** कोटी

Pune Main
Page No. 2 Mar 24, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# अर्थसंकल्पातील कमतरतेवर ताशेरे

## विद्यार्थिकेंद्री, गुणवत्ता सुधारणेवरील चर्चेला अधिसभेत दुय्यम स्थान

**पुणे, ता. २३ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अधिष्ठाता, कुलसचिव यांच्यासह प्राध्यापकांच्या पदाची भरती, विद्यापीठ विभागांचे आणि संलग्न महाविद्यालयांचे रखडलेले शैक्षणिक मूल्यमापन (ॲकॅडमिक ऑडिट), कंत्राटी आणि व्हिजिटिंग प्राध्यापकांवर होणारा खर्च, अशा विषयांवर अधिसभेत सदस्यांकडून जोरदार ताशेरे ओढण्यात आले.**

विद्यापीठाच्या २०२५ - २६च्या अर्थसंकल्पात विद्यार्थिकेंद्रीत योजना आणि सुविधांवर केलेल्या तरतुदींवर अधिसभा सदस्यांकडून चर्चा अपेक्षित असताना, केवळ अर्थसंकल्पातील तांत्रिक बाबींसह प्रशासकीय त्रुटी आणि कमतरतेवर सदस्यांकडून बोट ठेवण्यात आले. परिणामी विद्यार्थीविषयक सुविधा, वसतिगृहांवरील खर्च, दर्जेदार खानावळ, गुणवत्ता सुधार कार्यक्रम, संशोधन अशा विद्यापीठाचा दर्जा उंचविणाऱ्या विषयांना तुलनेने अधिसभेत कमी महत्त्व दिल्याचे दिसून आले.

विद्यापीठाच्या कामकाजात अधिसभेकडे समाजाचे प्रतिबिंब आणि प्रतिनिधित्व करणारी म्हणून पाहिले जाते, असा उल्लेख खुद्द काही सदस्यांनी सभेच्या दुसऱ्या दिवशी केला. सभेत विद्यापीठाचा अर्थसंकल्प आणि अधिसभेतील विद्यार्थिकेंद्रीत प्रश्नोत्तरांवर चर्चा अपेक्षित होती. अधिसभा सदस्यांचा हक्क डावलला जाणे, थेट सभागृहात घुसून कामगार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केलेला निषेध, विविध समित्यांवर होणाऱ्या नेमणुका, अशा विषयांनी सभेच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात झाली. अधिसभेच्या दुसऱ्या दिवशी सादर केलेला अर्थसंकल्प दुरुस्ती सूचनांसह सदस्यांनी मंजूर केला.

एकीकडे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी असणारे वसतिगृह ओस पडत असताना अर्थसंकल्पात त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त आर्थिक तरतूद करण्यात आली आहे तर, दुसरीकडे स्थानिक विद्यार्थ्यांना वसतिगृहे मिळत नाही, किंवा असणाऱ्या वसतिगृहात चांगल्या सुविधा मिळत नाही. त्याकडे अर्थसंकल्पात दुर्लक्ष केल्याचे मत अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस यांनी व्यक्त केले. अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर केवळ तीन टक्के आर्थिक तरतूद करण्यात आल्याने सचिन गोरडे यांनी नाराजी व्यक्त केली.

### रिक्त पदांची भरती लवकरच

भरतीबाबत अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, "विद्यापीठातील अधिष्ठाता, कुलसचिव आणि प्राध्यापक पदभरतीबाबत लवकरच कार्यवाही केली जाईल. प्राध्यापक भरतीबाबत राज्यपाल कार्यालयाकडून आलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करून लवकरच भरती प्रक्रिया सुरू केली जाईल."

'कॅस'अंतर्गत प्राध्यापकांच्या भरतीवरून सुरू असलेल्या चर्चेदरम्यान, बोलताना सदस्य सचिन गोरडे म्हणाले, "प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयालाही पैसे द्यावे लागतात."

### शैक्षणिक मूल्यमापन होणार

■ अधिसभा सदस्य डॉ. चिंतामणी निगळे यांनी विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये आणि परिसंस्थांच्या शैक्षणिक मूल्यमापनाबाबत प्रश्न विचारला. त्यावर बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, "राज्य सरकारने विद्यापीठांतर्गत विभागांना मानांकन मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यापूर्वी २०२२ मध्ये शैक्षणिक मूल्यमापन झाले होते. आता एप्रिल २०२५ पासून विभाग आणि संलग्न महाविद्यालयांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे."

### 'प्लेसमेंट सेल'मधील नियुक्त्यांवर प्रश्नचिन्ह

■ गेल्या दोन वर्षांपासून प्लेसमेंट सेलमधील रखडलेल्या नियुक्त्यांबाबत अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस यांच्यासह अन्य सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यावर डॉ. काळकर म्हणाले, "प्लेसमेंट सेलमध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्याचे वास्तव आहे. परंतु पुढील तीन महिन्यांत या नियुक्त्या पूर्ण होतील."

Sakal 24.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# 'ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी'च्या प्रवेशाला विद्यापीठात सुरुवात

**पुणे, ता. २३ :** जगभरात माहिती सुरक्षेसाठी (डेटा सिक्युरिटी) वाढत असलेली ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची मागणी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या हेतूने या ब्लॉकचेन टेक्नॉलॉजीमध्ये पदवी अभ्यासक्रम राबविण्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. त्यानुसार आता विद्यापीठात बी.एस्सी ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

या अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता, यावर्षी वेळेपूर्वीच प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३० एप्रिलपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर म्हणाले, "ब्लॉकचेन तंत्रज्ञान हे सध्या डिजिटल युगातील एक क्रांतिकारी तंत्रज्ञान आहे. हे तंत्रज्ञान विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात स्वीकारले जात आहे. विशेषतः वित्तीय सेवा, पुरवठा साखळी व्यवस्थापन, आरोग्यसेवा, सायबर सुरक्षा आणि सरकारी नोंदी व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांमध्ये ब्लॉकचेनचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे."

" सुरक्षितता, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीने ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची गरज अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळेच, ब्लॉकचेन तंत्रज्ञान काळाची गरज बनले आहे. याच्या संभाव्य फायद्यांमुळे त्याची स्वीकारार्हता सतत वाढत आहे.

\- **डॉ. सुरेश गोसावी,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

" पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांपेक्षा तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन अभ्यासक्रमांना विद्यार्थी आणि पालकांचा कल वाढत आहे. ही समाधानकारक बाब आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अशा अभ्यासक्रमांना चालना देऊन रोजगाराभिमुख कौशल्य विद्यार्थ्यांना देण्यासाठी कटिबद्ध आहे.

\- **डॉ. पराग काळकर,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Sakal 24.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

City 24 Mar 2025_005
24 Mar 2025

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# महाविद्यालयांच्या तपासणी समितीत पाकीट संस्कृती

- सदस्यांच्या आरोपाने अधिसभा थक्क
- समितीमध्ये ठराविक व्यक्तींनाच संधी
- पाकीट नाकारल्यास पुन्हा नाही संधी



> विद्यापीठाकडून विविध समित्या महाविद्यालयात जातात. या समितीवर सदस्यांची नियुक्ती ऑनलाइन पद्धतीने केली जाते. आता मात्र अधिसभा सदस्यांच्या तक्रारींचा विचार करता एका सदस्याची दोन-तीन ठिकाणी नियुक्ती झाल्यानंतर त्यांना पुन्हा संधी मिळणार नाही, अशी व्यवस्था संगणक प्रणालीत केली जाईल.
>
> **– डॉ. सुरेश गोसावी,** कुलगुरू

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध समितीतील काही सदस्य संस्थांकडून पाकीट घेतात. त्यानंतरच अहवाल दिला जातो, असा धक्कादायक आरोप अधिसभेच्या काही सदस्यांनी सभागृहात केला. महाविद्यालयात समिती सदस्य म्हणून गेले असता, मलाही पाकीट संस्कृतीचा अनुभव आल्याचे एका महिला अधिसभा सदस्याने सांगितले. एवढेच नव्हे, तर मी पाकीट घेण्यास नकार दिल्यानंतर मला पुढे कोणत्याही समितीवर घेण्यात आले नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले, तसेच पाकीट संस्कृतीसाठी ठराविक सदस्यांची समितीवर निवड केली जाते, असा आरोपही काही सदस्यांनी केला.

यासंदर्भात अधिसभा सदस्य अशोक सावंत यांनी स्थगन प्रस्ताव मांडला. अन्य सदस्य असतानाही त्याच त्याच सदस्यांना समितीवर का घेतले जाते, असा प्रश्न सावंत यांनी उपस्थित केला.

अधिसभा सदस्यांनी समितीच्या कार्यपद्धतीवरच आक्षेप नोंदवले. मी अधिसभा सदस्य असून, गेल्या अडीच वर्षात मला एकाही समितीवर घेण्यात आले नाही, असा अनुभवही काही सदस्यांनी बोलून दाखविला. दरम्यान, आतापर्यंत किती सदस्य कोणकोणत्या समितीवर कार्यरत आहेत, याचा तपशील जाहीर करण्याची मागणी सदस्यांनी या वेळी केली.

या पाकीट संस्कृतीला चाप बसावा आणि समित्यांवर लाडका भाऊ नेमण्याची योजना बंद करावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली, तसेच सिनेट मॅनेज केली जात असल्याचा गंभीर आरोप शंतनु लामधाडे यांनी केला.

City 24 Mar 2025_005
24 Mar 2025

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# त्रुटींवरून सदस्यांनी प्रशासनाला धरले धारेवर

## विद्यापीठाच्या अर्थसंकल्पावरील अधिसभेत विद्यार्थी हिताच्या बाबी नसल्याने तीव्र नाराजीचा सूर

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सादर केलेल्या अर्थसंकल्पातील त्रुटींवरून विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरण्यात आले, तसेच विद्यापीठाचा केंद्रबिंदू विद्यार्थी असूनही विद्यार्थी, शिक्षण, संशोधनाविषयी अधिसभेत चर्चाच होत नाही. अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पुरेसा निधी दिलेला नाही, याबाबत अधिसभा सदस्यांनी रविवारी अधिसभेत तीव्र नाराजी व्यक्त केली.

विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण ५६६ कोटी रुपये जमा आणि ६४८ कोटी रुपये खर्च असलेला अर्थसंकल्प मांडण्यात आला. यंदा अर्थसंकल्पात ८२ कोटी रुपयांची तूट दाखवण्यात आली आहे. अर्थसंकल्पावर अधिसभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. अधिसभा सदस्यांनी मांडलेल्या काही कपात सूचना विद्यापीठ प्रशासनाने मान्य केल्यावर अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात केलेली तरतूद अत्यंत तुटपुंज्या स्वरूपाची आहे. विद्यार्थी हिताच्या गोष्टी करताना त्यांना हव्या त्या सुविधा पुरविण्यासाठी पुरेसा निधी दिला जात नाही. नको त्या बाबींवर जास्त खर्च करण्याचे विद्यापीठ प्रशासनाने टाळावे, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली. विद्यापीठाच्या अर्थसंकल्पाला मान्यता देण्यापूर्वी झालेल्या चर्चेत सदस्य विनायक आंबेकर, प्रसेनजित फडणवीस, अद्वैत बंबोली यांनी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

> अर्थसंकल्पात विद्यार्थ्यांच्या मूलभूत सोयीसुविधांकडे लक्ष देणे गरजेचे होते. जिथे जास्त तरतूद हवी, तेथेच निधी कमी देण्यात आला. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृह मिळत नाही, तर दुसरीकडे परदेशी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील खोल्या रिकाम्या राहतात. त्यामुळे प्रशासनाने याकडे बारकाईने लक्ष घालावे.
>
> **– प्रसेनजित फडणवीस,** अधिसभा सदस्य

सदस्यांच्या प्रश्नांना विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी चारूशीला गायके यांनी उत्तरे दिली.

दरम्यान, विद्यापीठाचा प्लेसमेंट सेल बंद अवस्थेत असल्याचे अधिसभा सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. प्लेसमेंट सेलमध्ये पुरेसे मनुष्यबळ नसल्याने त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होतो. याबाबत कुलगुरू व प्र-कुलगुरूंनी पुढील तीन महिन्यांत पूर्ण क्षमतेने प्लेसमेंट सेल कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले.

> विद्यार्थ्यांना एकापेक्षा जास्त शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही, असा नियम होता. त्यामुळे विद्यापीठाच्या योजनांसाठी विद्यार्थी तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरत नव्हते. आता योजनेचे स्वरूप बदलण्यात आले आहे. त्यामुळे आता अधिकाधिक विद्यार्थी योजनेला पात्र ठरतील. त्यामुळे योजनेतील निधी वापरला जाईल.
>
> **– डॉ. पराग काळकर,** प्र- कुलगुरू

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 24 Mar 2025_013
24 Mar 2025

# अधिसभेतील गोंधळाचे दुसऱ्या दिवशीही पडसाद

## सुरक्षेच्या कारणावरून सर्व सदस्य आक्रमक; कुलगुरूंना दिले पत्र

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत शनिवारी (दि. २२) झालेल्या गोंधळाचे जोरदार पडसाद दुसऱ्या दिवशीच्या (रविवारी) कामकाजातही उमटले. विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी थेट सभागृहात येऊन केलेल्या घोषणाबाजीला अधिसभा सदस्यांनी आक्षेप घेतला. अधिसभा सुरक्षित वातावरणात होत नाही, याला सर्वस्वी विद्यापीठ प्रशासन जबाबदार आहे. गोंधळाच्या परिस्थितीत विद्यापीठाची सुरक्षाव्यवस्था काय करतेय? संघटनेचे कर्मचारी आत कसे आले? अशा प्रश्नांची सरबत्ती करत अधिसभा सदस्यांना पोलिस संरक्षण द्यावे, अशी मागणी सदस्यांनी केली.

> विद्यापीठ प्रशासन आणि अधिसभा सदस्य यांच्यात सुसंवाद राहण्यास प्राधान्य दिले जाईल. चुकीच्या बाबी समोर आणण्याचा सदस्यांना अधिकार आहे. अधिसभेत झालेला प्रकार विसरून आपण सगळे मिळून विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घालण्यासाठी प्रयत्न करूया.
>
> **– डॉ. सुरेश गोसावी,** कुलगुरू

अधिसभेच्या दुसऱ्या दिवशीच्या कामकाजाला सुरूवात होण्यापूर्वी सदस्यांनी कुलगुरूंना पत्र सादर केले. या पत्राद्वारे सदस्यांनी पोलिस संरक्षणाची मागणी केली. विद्यापीठाची स्वत:ची सुरक्षाव्यवस्था असताना कर्मचारी आत येऊन घोषणा देतात. अधिसभा सदस्य आणि व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमध्ये विसंवाद दिसतो. आम्ही भांडण करायला नव्हे तर विद्यापीठ आणि विद्यार्थी हिताचे प्रश्न मांडतो, असे सदस्यांचे म्हणणे आहे. शनिवारी एका सदस्याचे नाव घेऊन कर्मचारी निषेध करत होते. त्यामुळे यापुढे हा सदस्य स्वत:चा खासगी सुरक्षारक्षक घेऊन सभागृहात आल्यास त्यास परवानगी दिली जावी, अशी मागणी सदस्यांनी केली.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# Discussion on admin issues, fights eclipse student affairs at SPPU Senate meet

**SOHAM SHAH**
PUNE, MARCH 23

DISCUSSIONS ON administrative issues and a fight between two members remained the highlights of the two-day senate meeting of the Savitribai Phule Pune University. The biannual meeting was held this weekend to approve the University budget and take up other proposals. The Rs 648.03 crore budget presented on the first day was approved on the second day with a small reduction.

Till Sunday evening, minimal time was spent in discussing student welfare, research, the condition of the mess and hostels, and other student issues. The first half of the first day was spent in discussing adjournment motions. Mainly two issues, mismanagement of the anniversary function the university held last month, and irregularities in appointment of members to committees consumed most of the time. After this, a confrontation between two members almost turned into a physical brawl, leading the house to be adjourned.

Advocate Vithoba Baste, a member of the Senate, questioned on the floor of the meeting whether the adjournment motions being stated before the house were appropriate. He said, "Only topics that are extremely urgent can be taken up for discussions as adjournment motions. None of the topics discussed yet meet the criteria." However, his remark was not supported by other members of the Senate.

On the second day, the list of

**A confrontation between two members almost turned into a physical brawl, leading the house to be adjourned**

written questions asked by members to the University officials were discussed at length till evening. These included improvement in National Assessment and Accreditation Council (NAAC) ratings, appointment of contractual teachers, academic audits, etc.

Notably, a proposal by senate member Vinayak Ambekar to reduce the budget of the Vice Chancellor's fund in the budget by Rs 25 lakh was accepted, marking a rare occasion when the budget was amended and a fund was reduced in the Senate house. Another proposal by Professor of Political Science Harsh Jagzap demanding the installation of a statue of Mahatma Gandhi on the University campus was accepted by the house.

However, some student issues, like vacancies at the placement cell of the University, were also brought up by members. Pro Vice Chancellor Parag Kalkar informed the house that the placement cell was functioning with just one employee, and promised that the vacancies would be filled in the next three months. Members expressed a lack of confidence and pointed out that a similar promise was made at previous Senate meetings as well, but the posts have remained vacant.

The Indian Express 24.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# Universities can now recruit staff as new, improved guidelines in place

**SwatiShindeGole**
@timesofindia.com

**Pune:** The recruitment of teaching and non-teaching staff in public universities in Maharashtra is set to resume after it was suspended by the governor in Nov 2024.

The governor, also the chancellor of universities, suggested improvements in the recruitment system to make the process fair and transparent, based on which public varsities can carry out the recruitment process.

The candidates would be evaluated based on their academic certificates as well as interview. The final selection would be based on 80% weightage for academic, research and teaching criteria and 20% weightage for interview. Combining these criteria will create a merit list of 100 points.

On March 12, the undersecretary (in-charge) to the governor, Vikas Kulkarni, issued a letter to all public universities in Maharashtra stating: "After perusing the detailed proposal of improvement in the selection process of the university teachers by state govt, the chancellor has given assent to the proposal of state govt and has given permission to continue the recruitment process of teaching staff of state public universities on the following condition to ensure transparency and fairness in the recruitment process."

Kulkarni said the selection process would be highly objective and would minimise subjective discretion. The university would assess the ability for teaching and/or research aptitude through a seminar or lecture in a classroom or discussion on the capacity to use the latest technology in teaching and research at the interview stage, wherever possible.

The chancellor also instructed state govt to issue necessary directions for implementing the improved selection procedure. The meetings of the selection committee shall be audio-video recorded. The audio-video recording shall be immediately sealed after the interview process under the signatures of all the members of the selection committee present for the meeting.

A registrar of a university in Pune, on condition of anonymity, said, "The recruitment is always a start-stop process with no consistency in govt directives. The universities have been facing difficulties due to a shortage of staff, hampering the quality of education. Govt should not stop the recruitment process for any reason now."

### PROCESS TO FILL VACANCIES

- **The selection process shall be conducted as per the criteria under UGC regulations 2018**
- An integrated approach of combining academic credentials and interview performance
- Final selection shall be based on 80% weightage to academic, research and teaching criteria, and 20% weightage for interview performance
- The university shall assess the ability for teaching and/ or research aptitude through a seminar or lecture in a classroom
- The interview score shall be based on average scores
- Results shall be declared on the same day or the next day of the interview

The Times of India 24.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

### बोगस विद्यापीठांबाबत 'यूजीसी'चे आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यार्थी, पालकांना बोगस विद्यापीठांतील प्रवेशांबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. काही संस्था यूजीसीच्या कायद्याचे उल्लंघन करून अवैधरीत्या पदव्या देत असल्याचे निदर्शनास आले असून, मान्यता नसलेल्या संस्थांकडून दिलेल्या कोणत्याही पदव्या उच्च शिक्षण किंवा नोकरीसाठी वैध राहणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी त्यांची माहिती यूजीसीच्या संकेतस्थळाद्वारे तपासावी. तसेच कोणतेही विद्यापीठ, उच्च शिक्षण संस्था यूजीसीच्या नियमाचे उल्लंघन करून अभ्यासक्रम राबवत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत ugcampc@gmail.com या ई-मेलद्वारे यूजीसीच्या निदर्शनास आणून देण्याबाबतही नोटिशीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

Loksatta 25.3.2025

### बारावी परीक्षेत वापरता येणार कॅलक्युलेटर!

**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईने २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात होणाऱ्या बारावीच्या बोर्ड परीक्षेत 'अकाउंटन्सी'च्या पेपरसाठी बेसिक कॅलक्युलेटर वापरण्यास मान्यता दिली आहे. येत्या बारावीच्या बोर्ड अकाउंटन्सी परीक्षेत विद्यार्थ्यांना कॅलक्युलेटर वापरता येईल. सीबीएसईच्या प्रस्तावानुसार विद्यार्थ्यांना बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार आणि टक्केवारी गणना, यांसारख्या मर्यादित कार्यांसह नॉन-प्रोग्रामेबल कॅलक्युलेटर वापरण्याची परवानगी असेल. एकरूपता सुनिश्चित करण्यासाठी आणि प्रगत किंवा प्रोग्राम करण्यायोग्य उपकरणांचा वापर रोखण्यासाठी बोर्ड स्वीकार्य कॅलक्युलेटर मॉडेल्सवर विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध करेल. विद्यार्थ्यांच्या विचारकौशल्यांच्या विकासावर भर देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरण' २०२० च्या उद्दिष्टांच्या समर्थनार्थ 'सीबीएसई'ने हा निर्णय घेतला आहे. कॅलक्युलेटरला परवानगी देऊन बोर्ड विद्यार्थ्यांवरील भार कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे त्यांना मॅन्युअल गणनेऐवजी विश्लेषणात्मक आणि संकल्पनात्मक प्रतिसादांवर अधिक लक्ष केंद्रित करता येईल.

Pudhari 25.3.2025

लोकमत

### सीबीएसई अभ्यासक्रम अधिक संधी देणारा, स्पर्धा परीक्षांसाठीही उपयोगी

#### शिक्षणमंत्र्यांकडून नव्या अभ्यासक्रमाचे समर्थन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्य शिक्षण मंडळात सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याच्या निर्णयावर होणाऱ्या टीकेला शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेत सोमवारी एका निवेदनाद्वारे उत्तर दिले. सीबीएसईचा अभ्यासक्रम हा राज्य शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून देईल. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना जेईई, नीट, यूपीएससीसारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसाठी अधिक चांगली तयारी करता येईल, असे भुसे यांनी विधानसभेत सांगितले.

नवीन अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना मूलभूत संकल्पना स्पष्ट होणार असून, त्यांना जीवनोपयोगी शिक्षण मिळणार आहे. संकल्पनांच्या समजुतीवर अधिक लक्ष दिले जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळते. प्रकल्प, उपक्रम आणि इतर मूल्यांकन तंत्रांचा समावेश आहे. अभ्यासक्रम लागू करण्याच्या निर्णयावर अनेक स्तरातून टीका होऊ लागल्यानंतर याबाबत शिक्षण विभागाची भूमिका मांडण्यासाठी दादा भुसे यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेत याबाबत सविस्तर निवेदन केले.



#### सीबीएसई अभ्यासक्रम कधीपासून अमलात येणार?

**२०२५**
इयत्ता १ली

**२०२६**
२री, ३री, ४थी, ६वी

**२०२७**
५वी, ७वी, ९वी, ११वी

**२०२८**
८वी, १०वी, १२वी

#### विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने अभ्यासक्रमात काय ?

१ सीबीएसई अभ्यासक्रमात आपली संस्कृती व परंपरांना प्राधान्य देण्यात आले आहे. महाराष्ट्रातील संत, समाजसुधारक आणि ऐतिहासिक व्यक्तींना नवीन अभ्यासक्रमात अधिक महत्त्व दिले जाईल.

२ अभ्यासक्रमात घोकंपट्टीवर आधारित परीक्षा पद्धतीऐवजी सतत आणि सर्वंकष मूल्यमापन पद्धत लागू केली जाईल. शिक्षकांसाठी नवीन प्रशिक्षण प्रणाली लागू केली जाईल, ज्यामध्ये तंत्रज्ञानाचा अधिक समावेश असेल, असेही भुसे यांनी सांगितले.

३ महाराष्ट्र राज्य मंडळाच्या (एसएससी) अभ्यासक्रमात बदल करून त्याला अधिक व्यावहारिक आणि समजण्यास सोपे करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. बालभारतीने तयार केलेली नवीन पाठ्यपुस्तके राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी)च्या शिफारशींवर आधारित असतील.

४ सॉफ्ट स्किल्स आणि समुपदेशनावर भर, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासावर लक्ष दिले जाते. संवाद कौशल्ये, नेतृत्वगुण, तणाव व्यवस्थापन शिकवले जाते. विद्यार्थ्यांच्या सततच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे, आदी बाबींवर भर दिला आहे.

Pune Main
Page No. 4 Mar 25, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

City 25 March 2025_017
25 Mar 2025

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# कुलगुरू साहेब, आता छडी उगाराच!

### अधिसभेतील गोंधळाने शिक्षण क्षेत्रात नाराजीचा सूर / विद्यार्थ्यांच्या प्रश्नांऐवजी कुरघोड्यांमध्येच गेला वेळ

**व्यंकटेश भोळा**

**पुणे, दि. २४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पहिल्यादांच अधिसभा सदस्य व व्यवस्थापन परिषद यांच्यातील वादावादीने विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला मोठा धक्का बसला आहे. खुद्द कुलगुरूंवर अधिसभेचे कामकाज काही काळासाठी तहकूब करण्याची नामुष्की ओढवली. यावरून कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना आता आपल्या अधिकाराचा वापर करून निर्णय घ्यावे लागणार आहेत. अधिसभेतील अभूतपूर्व गोंधळानंतर कुलगुरू साहेब, आता छडी उगारण्याची वेळ आली आहे, अशा शब्दांत काही सदस्यांनी अधिसभेच्या सभागृहात भावना व्यक्त केली. त्यामुळे कुलगरू खरेच कठोर निर्णय घेणार का, याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.

अधिसभेच्या पहिल्याच दिवशी सकाळच्यासत्रातविद्यापीठसमित्यांबाबतच्या स्थगन प्रस्तावावरून जोरदार खडाजंगी झाली. समितीवर ठराविक व्यक्तींची निवड केली जाते. त्यामुळे सातत्याने समित्यांवर जाणाऱ्या सदस्यांची नावे जाहीर करावी. प्रत्यक्ष महाविद्यालयाला भेट न देता केवळ ओटीपी सबमिट करून अहवाल देणाऱ्या समितीच्या अध्यक्षाचे नाव जाहीर करावे, अशीही मागणी या वेळी करण्यात आली.



या मुद्द्यावर वादळी चर्चा झाली. यात समितीमधील काही सदस्य पाकीट घेऊनच अहवाल देतात, असे आरोप करून काही अधिसभा सदस्यांनी काही परिषदेच्या सदस्यांच्या कर्तृत्वावर निशाणा साधला.

**पुरस्कारांवरून आरोप-प्रत्यारोप**

विद्यापीठाचा वर्धापनदिनाचा कार्यक्रम व जीवनसाधना पुरस्काराच्या आयोजनावरून अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनास धारेवर धरले. कुलगुरूंवर दबाव टाकून व्यवस्थापन परिषदेच्या काही सदस्यांनी जीवनसाधना पुरस्कारांसाठी निवडी करून आपल्या रिटारमेंटची सोय केली, असा घणाघाती आरोपही झाला. यावरून विद्यापीठ कुलगुरू चालवितात, की परिषद, असा आरोपही झाला आहे.

**नावलौकिक अबाधित ठेवण्याचे आव्हान**

अधिसभेत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर चर्चा होण्याऐवजी वादावादी, आरोप-प्रत्यारोप, असंसदीय शब्दांचा वापर यावरून ती गाजली. सदस्यांनी काही व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पिंजऱ्यात उभे केले, तर परिषदेच्या सदस्यांनी सर्व निर्णयाचे अधिकार कुलगरूंना असल्याचे सांगत हात झटकले. यावरून सर्व रोख कुलगुरू डॉ. गोसावी यांच्यानिर्णयापर्यंत येऊन पोहोचतात. त्यांनी योग्य वेळी छडी उगारली असती, तर असा प्रसंग आला नसता. आता तरी धाडसी निर्णय घेऊन विद्यापीठाचा नावलौकिक कायम ठेवण्याचे आव्हान कुलगुरूंपुढे आहे.

---

लोकमत

# सीबीएसई अभ्यासक्रम अधिक संधी देणारा, स्पर्धा परीक्षांसाठीही उपयोगी

### शिक्षणमंत्र्यांकडून नव्या अभ्यासक्रमाचे समर्थन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्य शिक्षण मंडळात सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याच्या निर्णयावर होणाऱ्या टीकेला शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेत सोमवारी एका निवेदनाद्वारे उत्तर दिले. सीबीएसईचा अभ्यासक्रम हा राज्य शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून देईल. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना जेईई, नीट, यूपीएससीसारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसाठी अधिक चांगली तयारी करता येईल, असे भुसे यांनी विधानसभेत सांगितले.

नवीन अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना मूलभूत संकल्पना स्पष्ट होणार असून, त्यांना जीवनोपयोगी शिक्षण मिळणार आहे. संकल्पनांच्या समजुतीवर अधिक लक्ष दिले जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळते. प्रकल्प, उपक्रम आणि इतर मूल्यांकन तंत्रांचा समावेश आहे. अभ्यासक्रम लागू करण्याच्या निर्णयावर अनेक स्तरातून टीका होऊ लागल्यानंतर याबाबत शिक्षण विभागाची भूमिका मांडण्यासाठी दादा भुसे यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेत याबाबत सविस्तर निवेदन केले.



### सीबीएसई अभ्यासक्रम कधीपासून अमलात येणार?

**२०२५**
इयत्ता १ली

**२०२६**
२री, ३री, ४थी, ६वी

**२०२७**
५वी, ७वी, ९वी, ११वी

**२०२८**
८वी, १०वी, १२वी

### विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने अभ्यासक्रमात काय ?

१. सीबीएसई अभ्यासक्रमात आपली संस्कृती व परंपरांना प्राधान्य देण्यात आले आहे. महाराष्ट्रातील संत, समाजसुधारक आणि ऐतिहासिक व्यक्तींना नवीन अभ्यासक्रमात अधिक महत्त्व दिले जाईल.

२. अभ्यासक्रमात घोकंपट्टीवर आधारित परीक्षा पद्धतीऐवजी सतत आणि सर्वंकष मूल्यमापन पद्धत लागू केली जाईल. शिक्षकांसाठी नवीन प्रशिक्षण प्रणाली लागू केली जाईल, ज्यामध्ये तंत्रज्ञानाचा अधिक समावेश असेल, असेही भुसे यांनी सांगितले.

३. महाराष्ट्र राज्य मंडळाच्या (एसएससी) अभ्यासक्रमात बदल करून त्याला अधिक व्यावहारिक आणि समजण्यास सोपे करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. बालभारतीने तयार केलेली नवीन पाठ्यपुस्तके राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी)च्या शिफारशींवर आधारित असतील.

४. सॉफ्ट स्किल्स आणि समुपदेशनावर भर, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासावर लक्ष दिले जाते. संवाद कौशल्ये, नेतृत्वगुण, तणाव व्यवस्थापन शिकवले जाते. विद्यार्थ्यांच्या सततच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे, आदी बाबींवर भर दिला आहे.

Pune Main
Page No. 4 Mar 25, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यापीठाकडून बी.सी.ए, बी.बी.ए.चे शुल्क जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनी बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन अर्थात बी.सी.ए. आणि बॅचलर ऑफ बीझनेस ॲडमिनिस्ट्रेशन अर्थात बी.बी.ए. या अभ्यासक्रमांना नेमके किती शुल्क घ्यावे, हे जाहीर केले आहे. त्यानुसार बी.सी.ए. साठी शिक्षण शुल्क १६ हजार ५०० आणि प्रयोगशाळा शुल्क ११ हजार तर बी.बी.ए. साठी शिक्षण शुल्क १८ हजार ६०० आणि प्रयोगशाळा शुल्क तीन हजार घेण्याचे निर्देश विद्यापीठ प्रशासनाने दिले आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अर्थात एआयसीटीईने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये बीबीए, बीबीएम,

- **बी.सी.ए.साठी शिक्षण शुल्क १६ हजार ५०० आणि प्रयोगशाळा शुल्क ११ हजार**
- **बी.बी.ए.साठी शिक्षण शुल्क १८ हजार ६०० आणि प्रयोगशाळा शुल्क तीन हजार**

बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थांना आहे त्या स्थितीत परिषदेच्या अधिपत्याखाली अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संस्थांनी आकारणी करायचे शुल्क व त्याअनुषंगाने डीबीटी पोर्टलवर करायच्या कार्यवाहीबद्दल विद्यापीठ प्रशासनाने निर्देश दिले आहेत.

Pune Edition
Mar 26, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# महाविद्यालयांचे होणार 'ट्रॅकिंग'

## शैक्षणिक मूल्यमापनासाठी 'स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली' कार्यान्वित

■ **मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा**

**पुणे, ता. २६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत संलग्न महाविद्यालये आणि परिसंस्थांचे शैक्षणिक, प्रशासकीय मूल्यमापन करण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली कार्यान्वित केली असून, यात महाविद्यालये आणि संस्थांना स्वयं मूल्यमापन करावे लागणार आहे. याद्वारे विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेत्तर गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न होतील, तसेच संलग्न महाविद्यालये आणि परिसंस्थांचे 'ट्रॅकिंग'ही होणार आहे.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विद्यापीठ विभाग, संलग्नित महाविद्यालये, पदव्युत्तर संस्था, स्वायत्त महाविद्यालयांचे शैक्षणिक मूल्यमापन (ॲकॅडमिक ऑडिट) करण्याचा अधिकार विद्यापीठाला आहे. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २०२२ मध्ये शैक्षणिक मूल्यमापन केले होते. आता विद्यापीठांतर्गत विभागाचे मूल्यमापन करण्याचे नियोजन आहे. यासाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित केली आहे. यात माहिती भरण्याची सूचना दिली आहे. महाविद्यालयांना स्वयं मूल्यमापनाची संधी मिळणार आहे. त्यानंतर विद्यापीठाच्या समित्या ऐच्छिकपणे महाविद्यालयांना भेटी देतील आणि ऑनलाइन प्रणालीत दिलेल्या माहितीची पडताळणी करतील, अशी माहिती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी 'सकाळ'शी बोलताना दिली.



### मूल्यमापनातील ठळक मुद्दे

1. महाविद्यालयांची सद्यःस्थिती पाहिली जाणार
2. ऑनलाइन प्रणालीद्वारे दिलेल्या माहितीची पडताळणी होणार
3. महाविद्यालयांतील कमतरता, त्रुटींचे निराकरण करणार
4. महाविद्यालयांनाही सूचना नोंदविता येणार




- विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी संख्या
- विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा
- विभागाची संख्या, प्लेसमेंट सेल, ग्रंथालय,
- प्राध्यापक आणि प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसनुसार संख्या
- पायाभूत सुविधा, महाविद्यालयाचा विकास आराखडा
- मान्यताप्राप्त शिक्षकांची संख्या आणि रिक्त जागा
- राबविण्यात येणार अभ्यासक्रम

### असे असतील टप्पे...

- संलग्न महाविद्यालये, परिसंस्था विद्यापीठाच्या स्वतंत्र ऑनलाइन प्रणालीत आवश्यक माहिती भरतील.
- महाविद्यालयांनी दिलेल्या माहितीची पडताळणी करण्यासाठी विद्यापीठातर्फे ऐच्छिकपणे समित्यांना पाठविले जाईल.
- पडताळणीत आढळणाऱ्या त्रुटी, कमतरता दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

"मूल्यमापनासाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली कार्यान्वित केली आहे. महाविद्यालयांना स्वयं मूल्यमापनाची संधी दिली आहे. त्यानंतर विद्यापीठाच्या समितीमार्फत पडताळणी होणार आहे. त्यानंतर गुण दिले जातील. या पद्धतीने विद्यापीठाने केलेल्या मूल्यमापनाचे प्रमाणपत्र महाविद्यालयांना देण्याचा विचार आहे.

**- डॉ. पराग काळकर,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये, संस्थांचे शैक्षणिक मूल्यमापन करण्याचा अधिकार विद्यापीठाचा आहे. परंतु, आतापर्यंत विद्यापीठाने हे मूल्यमापन केलेले नाही. त्यामुळे नुकत्याच झालेल्या अधिसभेतही याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. आता शैक्षणिक मूल्यमापन होणार असल्याने महाविद्यालयांची सद्यःस्थिती आणि वास्तव समोर येणार आहे.

**- डॉ. चिंतामण निगळे,** सदस्य, अधिसभा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Sakal 27.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रभात
City 27 Mar 2025_005
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
27 Mar 2025
www.dainikprabhat.com

### श्रेणी सुधार योजनेअंतर्गत आता ऑफलाइन अर्ज

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २६** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या श्रेणी सुधार योजनेअंतर्गत विविध पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका अभ्यासकमांच्या एप्रिल-मे २०२५ परीक्षेचे अर्ज ऑफलाइन पध्दतीने सादर करावे लागणार आहेत.

परीक्षांचे अर्ज प्रचलित पध्दतीनुसार विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील पी.डी. एफ. डाऊनलोड करून, योग्य शुल्कासह भरून परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालयात महाविद्यालयामार्फत जमा करावा लागणार आहे.

पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा ही एप्रिल- मे २०२५ उन्हाळी सत्रातील विद्यापीठाच्या नियमित परीक्षेबरोबर चालू असलेल्या अभ्यासक्रमाच्या पॅटर्ननुसार, समकक्षतेनुसार आयोजित करण्यात येत आहे. परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासहित भरण्यासाठी २७ मार्च पर्यंत आणि विलंब शुल्कासहित २८ ते २९ मार्च या कालावधीत भरता येणार आहे. महाविद्यालयाने १ एप्रिल पर्यंत परीक्षा अर्जशुल्कासह डिमांड ड्राफ्ट विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागात जमा करावेत, अशा सूचनाा डॉ. प्रभाकर देसाई यांनी दिल्या आहेत.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

# School quality assessment grabs educators' time in exam season

Swati Shinde Gole
@timesofindia.com

**Pune:** The School Quality Assessment and Assurance Framework (SQAAF) initiative, launched by the state education department just before exams, has become a bother for teachers.

This online system requires teachers to fill in 128 different standards which teachers have to focus instead of students' study, revision, and exam practice.

The deadline for completing these tasks was March 10, but extensions were thrice granted. The poor planning by the education department has caused unrest and teachers' unions have submitted letters to the education minister urging action.

Harish Sasankar, state general secretary of Maharashtra Progressive Primary Teachers Association, said the annual exam schedule has been altered with exams set for the end of April leaving insufficient time for comprehensive assessments, projects, grading, and assigning summer homework.

He added, " Due to the constant requirement to submit information, attend meetings, and undergo training, it has become impossible to give full attention to students during these crucial months. Hence, March and April should be declared free of information submissions, training, and meetings. Decisions should be made in the best interest of education."

The teachers' association also opposed the uniform exam timetable. "In Vidarbha, temperatures are high at the end of April for students to take exams and travel home in the heat. Annual exams must start from March 15. Forcing students to engage in online studies during the summer break is inappropriate," Rajesh Bansode, a member of Maharashtra School Teachers' Association, said.

### POOR RESOURCES TO FINISH TASK

- The principal and a fellow teacher are fully occupied in **complex online tasks**
- Many schools have only women teachers, and some have **only two teachers**
- Several schools **lack computers**, and some don't have **funds** to pay the **electricity bills**
- The association has requested the education minister **to commence activities after June 26** in the **new academic year**

"Poor internet facilities and funding in schools makes it impossible to upload evidence to Google Drive, increasing our frustration" — **Kranti Murudkar** | A STATE BOARD SCHOOL TEACHER

The Times of India 27.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

लोकमत

# डमी शाळांत प्रवेश घेणाऱ्या मुलांना बारावीची परीक्षा देता येणार नाही

## सीबीएसईचा इशारा : नियमित वर्गात उपस्थित न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना बसेल फटका, पुढील शैक्षणिक वर्षापासून लागू होऊ शकतो निर्णय; शाळांवरही कारवाईच्या हालचाली

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जे विद्यार्थी नियमित वर्गामध्ये जाणार नाहीत, त्यांना १२वी बोर्डाच्या परीक्षेत बसण्याची परवानगी मिळणार नाही, असा इशारा डमी शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सीबीएसईने दिला आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, डमी शाळांमध्ये प्रवेश घेतल्याच्या दुष्परिणामांची जबाबदारी स्वत: विद्यार्थी व त्यांच्या पालकांची असेल.

सीबीएसई डमी शाळांच्या विरोधात सुरू असलेल्या कारवाईच्या अंतर्गत अशा विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेला बसण्यापासून रोखण्यासाठी परीक्षा उपनियमांत बदल करण्यावर विचार करीत आहे. त्यांना एनआयओएसची परीक्षा द्यावी लागेल. बोर्डाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, एखादा परीक्षार्थी शाळेतून गायब असल्याचे आढळल्यास किंवा बोर्डाकडून करण्यात आलेल्या अचानक निरीक्षणात अनुपस्थित असल्यास अशा विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षा देण्याची परवानगी देण्यात येणार नाही. नियमितरीत्या वर्गात न जाण्याचे दुष्परिणाम भोगण्यास संबंधित विद्यार्थी व त्याचे पालक जबाबदार असतील.

अलीकडेच बोर्डाच्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित झाला व हा निर्णय २०२५-२६ च्या शैक्षणिक वर्षात लागू करावा, अशी शिफारस करण्यात आली होती.



### वर्गात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य

अधिकाऱ्याने सांगितले की, परीक्षा समितीमध्ये या मुद्द्यावर तपशीलवार चर्चा करण्यात आली व बोर्डाच्या परीक्षेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना किमान ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य करण्यात यावी, असा निष्कर्ष काढण्यात आला. अपेक्षित उपस्थिती पूर्ण न झाल्यास केवळ गैरउपस्थिती असणाऱ्या शाळांमध्ये नामांकन घेतल्यामुळे असा विद्यार्थी सीबीएसई परीक्षा देण्यासाठी पात्र ठरत नाही.

### २५ टक्के सूट कोणाला मिळणार?

सीबीएसईकडून परवानगी दिली न गेल्यास विद्यार्थी परीक्षेला बसण्यासाठी एनआयओएसशी संपर्क साधू शकतो. बोर्ड केवळ वैद्यकीय आपत्कालीन स्थिती, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय क्रीडा आयोजनांत सहभागी झाल्यास किंवा अन्य गंभीर कारणांसारख्या प्रकरणांतच २५ टक्के सूट दिली जाण्याबाबत चर्चा करण्यात आली.

### ...तर शाळांवर शिस्तभंगाची कारवाई

ज्या विद्यार्थ्यांची अपेक्षित उपस्थिती भरणार नाही, बोर्ड त्यांच्या पात्रतेवर कोणताही विचार करणार नाही. तसेच अशा विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी नोंदणीकृत करणाऱ्या शाळेच्या विरोधात शिस्तभंगाची कारवाईही केली जाऊ शकते का, यावर बोर्डाचा विचार सुरू आहे.

### असे का करतात?

१ अभियांत्रिकी, वैद्यकीय प्रवेश परीक्षांची तयारी करणारे अनेक विद्यार्थी डमी शाळांमध्ये प्रवेशास प्राधान्य देतात जेणेकरून ते केवळ त्या परीक्षांच्या तयारीवर लक्ष केंद्रित करू शकतील.

२ **वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी राज्य-विशिष्ट कोट्याचा फायदा घेण्यास इच्छुक विद्यार्थीदेखील डमी शाळांची निवड करतात. ते वर्गात जात नाहीत आणि थेट बोर्डाच्या परीक्षांना बसतात. त्यांना फटका बसेल.**

लोकमत एक्सपर्ट व्ह्यू

**डॉ. श्रीरंग देशपांडे,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

### अत्यंत योग्य निर्णय

विद्यार्थ्यांचा खाजगी क्लासकडे असलेला कल पाहता सीबीएसईने घेतलेला निर्णय अत्यंत योग्य आहे. विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक विद्यालयात जाऊनच शिकले पाहिजे. सीबीएसईचा अभ्यासक्रम तर जेईई, नीट परीक्षांसाठी पुरक असाच आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खाजगी क्लासेसपेक्षा वर्गातील शिक्षणाला महत्व दिले पाहिजे. त्याच धर्तीवर राज्य मंडळानेही राज्यात असाच निर्णय घेतला पाहिजे. राज्य मंडळाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातही जेईई, नीट परीक्षांच्या धर्तीवर अभ्यासक्रम बनविले पाहिजेत. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होईल आणि शिक्षक अपडेट होतील.

Pune Main
Page No. 3 Mar 28, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# डमी शाळांतील विद्यार्थी प्रवेशावर 'सीबीएसई'कडून आळा

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करणारे अनेक विद्यार्थी डमी शाळांमध्ये प्रवेश घेतात. आता या विद्यार्थ्यांना आणि डमी शाळांना आळा घालण्यासाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) पाऊल उचलले आहे. अशा डमी शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सीबीएसई बारावीच्या बोर्ड परिक्षेत बसू देणार नाही. यासंबंधीच्या नियमाची अंमलबजावणी नव्या शैक्षणिक वर्षापासून केली जाणार असल्याचे समजते. डमी शाळांवर देखील शिस्तभंगाची कारवाई केली जाऊ शकते. या नियमामुळे परिक्षेला मुकलेले विद्यार्थी राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था (एनआयओएस) द्वारे आयोजित परीक्षा देऊ शकतील.

- **बारावीच्या बोर्ड परीक्षेत बसू देणार नाही**
- **नव्या शैक्षणिक वर्षापासून नियमाची अंमलबजावणी होणार**

सीबीएसईच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, सीबीएसईच्या पथकाद्वारे संलग्नित शाळांची अचानक तपासणी केली जाते. या तपासणीवेळी विद्यार्थी गैरहजर असल्याचे आढळले. तसेच विद्यार्थांची ही गैरहजेरी सततची असेल. तर बारावीच्या बोर्ड परिक्षेला बसू दिले जाणार नाही. यासंबंधीच्या उपनियमांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून बदल केले जाण्याची तयारी सुरु आहे. परिक्षेला बसता आले नाही तर जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर आणि त्याच्या पालकांवर असेल. सीबीएसईच्या नुकत्याच झालेल्या गव्हर्निंग बोर्डाच्या बैठकीतही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या बैठकीत हा निर्णय शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासून लागू करण्याची शिफारस करण्यात आली असल्याचे समजते.सीबीएसईच्या अगोदरपासूनच्या नियमांनुसार, बोर्डाच्या परीक्षेला बसण्यासाठी विद्यार्थ्यांनी किमान ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. वैद्यकीय आणीबाणी, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग आणि इतर गंभीर कारणांसारख्या आपत्कालीन परिस्थितीतच उपस्थितीत बोर्ड २५ टक्के सूट देते.

Pune Edition
Mar 29, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# विद्यार्थ्यांना घरबसल्या मिळणार प्रमाणपत्रे

पुढारी विशेष

**गणेश खळदकर**
पुढारी प्रतिनिधी

- विद्यापीठाचे विद्यार्थी सुविधा केंद्र बंद
- अर्ज करण्यापासून ते प्रमाणपत्रे मिळण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया ऑनलाइन
- अहिल्यानगर, नाशिकसह राज्यातील विद्यार्थ्यांचे हेलपाटे वाचणार
- परदेशी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही आवश्यक प्रमाणपत्रे मिळणार ऑनलाइनच

**पुणे :** एकदा ऑनलाइन अर्ज करा... नंतर विद्यापीठात कागदपत्रे सादर करा... विद्यापीठात वारंवार हेलपाटे मारा आणि दोन-चार महिन्यांनी प्रमाणपत्रे मिळवा हा प्रकार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आता कायमचा बंद झाला आहे. अर्ज करण्यापासून ते प्रमाणपत्रे मिळवण्यासाठीची सर्व प्रक्रिया ऑनलाइन केली असून, विद्यार्थी सुविधा केंद्राला देखील टाळे लावले आहे.

विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दुबार प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र, मायग्रेशन सर्टिफिकेट, ट्रान्सस्क्रिप्ट सर्टिफिकेट यांसह अन्य प्रमाणपत्रे हवी असल्यास विद्यापीठाच्या पोर्टलव्दारे ऑनलाइन अर्ज करून विद्यार्थी सुविधा केंद्रात ऑफलाइन कागदपत्रे जमा करावी लागत होती. आता सर्व प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. त्यासाठी गेल्या तेरा ते चौदा वर्षांच्या विद्यार्थ्यांची सर्व माहिती डिजीटलाईज केली आहे. यातून अर्ज केल्यापासून तीन ते चार दिवसांमध्ये कोणतेही प्रमाणपत्र मिळण्याची सोय झाली आहे.

## एआय ॲटोइंटिग्रेशन टुलचा वापर

एखाद्या विद्यार्थ्याने अर्ज केल्यानंतर त्याची माहिती त्याच्या पीआरएन नंबरशी मिळणारी आहे का, याची पडताळणी करून संबंधित माहिती ॲटो व्हेरिफाईड तसेच ॲटो व्हॅलीडेट केली जाणार आहे. त्यासाठी एआय इंटिग्रेशन टूलचा वापर करण्यात आला आहे. पूर्वी ही प्रक्रिया कर्मचाऱ्यांना स्वत: करावी लागत होती. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना ट्रान्सस्क्रिप्ट प्रमाणपत्र दिल्यानंतर आणि त्यांनी परदेशी विद्यापीठे किंवा एमएनसी कंपन्यांना सादर केल्यानंतरही त्यांना विद्यापीठाकडून एक खात्रीचा ईमेल हवा असतो. हा मेल विद्यापीठाकडून त्यांना जाण्यात बराच कालावधी जात होता. यामध्ये देखील एआय ॲटोइंटिग्रेशन टूलचा वापर करण्यात येणार असून संबंधित कंपन्या किंवा विद्यापीठांना आता ॲटोमोडव्दारे एक ते दोन दिवसांमध्ये ईमेल केला जाणार आहे.



"विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारची सुविधा मिळण्यासाठी सर्टिफिकेटच्या सर्व व्यवस्थेचे संगणकीकरण केले असून विद्यार्थ्यांना आवश्यक सर्व प्रमाणपत्रे कमीत कमी कालावधीत उपलब्ध व्हावीत यासाठी विद्यापीठाने ऑनलाइन व्यवस्था निर्माण केली आहे.

- **डॉ. पराग काळकर,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

"विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रमाणपत्रे मिळावीत तसेच अहिल्यानगर आणि नाशिकसह अन्य विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी हेलपाटे वाचावेत यासाठी व्यवस्था तयार करण्यासाठी काम केले. यातून आता विद्यार्थ्यांना अर्ज करण्यापासून ते प्रमाणपत्रे मिळवण्यापर्यंतचा सर्व प्रवास ऑनलाइन झाला आहे, त्यामुळे घरबसल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे उपलब्ध होणार आहेत.

- **राहुल पाखरे,** अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

My Pune Edition
Mar 29, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

नवभारत
www.navbharatlive.com

### एक विद्यापीठ के दो नाम क्यों ? सीनेट सदस्य को सौंपा ज्ञापन

# पुणे विवि के उपकेंद्र को दिया नया नाम

■ **पुणे** (सं). हाल ही में पुणे विद्यापीठ के सीनेट की अधिसभा में सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के नासिक उपकेंद्र को स्वर्गीय भाऊसाहेब हिरे का नाम और अहिल्यानगर उपकेंद्र को पद्मश्री विखे पाटिल का नाम रखने के दो प्रस्ताव को पुणे विश्वविद्यालय अधिसभा ने मंजूरी दे दी है. लेकिन एक ही सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के उप-केंद्र को दूसरा या दो नाम क्यों ? सह सवाल उठाते हुए कहा गया है कि, सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के नासिक या अहिल्यानगर उप-केंद्र को कोई अन्य नाम देने की आवश्यकता नहीं है. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विवि के विभिन्न स्थानों पर विभागीय कार्यालय हैं, उन्हें भी अलग



नाम नहीं दिए गए हैं. यहां तक कि महाराष्ट्र और देश भर में संचालित विवि भी अपने उप-केंद्रों को अलग नाम नहीं देते हैं. इसलिए पुणे विश्वविद्यालय को नाम बदलने का ऐसा कदम नहीं उठाना चाहिए. इस संदर्भ में सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय नाशिक उपकेंद्र में सहायक सचिव श्रीपाद बुरकुले और सीनेट सदस्य. पुणे विश्वविद्यालय प्रबंधन समिति के सदस्य सागर वैद्य को एक ज्ञापन सौंपा गया है.

### किसी भी उप-केंद्र का नाम न बदला जाए

विश्वविद्यालय सीनेट को विद्यार्थियों की शैक्षणिक समस्याओं और गुणवत्ता में सुधार लाने की दिशा में काम करना चाहिए. सावित्रीबाई फुले शिक्षा के लिए प्रेरणा हैं. पुणे विश्वविद्यालय का नाम सावित्रीबाई फुले के नाम पर रखने के लिए एक बड़ा आंदोलन हुआ था, ताकि लोगों के पास सच्चा इतिहास जाये और यह सच्चा इतिहास है. सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय नासिक उप-केंद्र, शरणपुर रोड नासिक को 27 मार्च को एक ज्ञापन के माध्यम से अनुरोध किया गया था कि पुणे विश्वविद्यालय इस पर विचार करे और किसी भी उप-केंद्र का नाम न बदला जाए.

Pune plus Edition
Mar 29, 2025 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 30 Mar 2025_005
30 Mar 2025

# पुणे विद्यापीठातर्फे विशेष सुरक्षा हेल्पलाइन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - गेल्या काही महिन्यांपासून घडलेल्या गैरप्रकार, घटनांच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने १विशेष सुरक्षा हेल्पलाइन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. चोवीस तास सुरू राहणाऱ्या हेल्पलाइनद्वारे विद्यापीठ परिसरातील सुरक्षेसंबंधित तक्रारी आणि आपत्कालीन परिस्थितीवर तत्काळ उपाययोजना विद्यापीठाकडून केली जाणार आहे.

विद्यापीठामध्ये मुलांच्या वसतिगृहात अंमली पदार्थ सापडण्याच्या घटना उघडकीस आल्या. त्याचबरोबर मुलींच्या वसतिगृहात मद्याच्या बाटल्या, सिगारेटची पाकिटे सापडण्यासह त्रास दिल्याची तक्रार एका विद्यार्थिनीने केली होती. याशिवाय २५ मार्च रोजी विद्यापीठाच्या आवारात एका व्यक्तीने काही विद्यार्थिनींकडे पाहून अश्लील कृत्य केले होते. या प्रकारांनी विद्यापीठातील सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले असून, विद्यापीठ परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने चोवीस तास सुरू असणारी हेल्पलाइन सुरू केली आहे. त्याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. ०२०-४८५५३३८३ हा विद्यापीठाचा सुरक्षा हेल्पलाइन क्रमांक आहे. सुरक्षासंबंधी तक्रारी, आपत्कालीन परिस्थिती, कोणतीही घटना तत्काळ आणि विश्वासार्ह पद्धतीने नोंदवणे, समस्येचे तातडीने निराकरण करण्याचा या हेल्पलाइनचा उद्देश असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

संशयास्पद हालचाली नोंदवणे, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळवणे, सुरक्षिततेशी संबंधित तक्रारी, छळ किंवा त्रासदायक परिस्थितीत मदत मिळविण्यासाठी ही हेल्पलाइन वापरता येणार आहे. सुरक्षेसंदर्भातील समस्यांबाबत हेल्पलाइनवर संपर्क साधावा. प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी परिस्थितीनुसार आवश्यक ती कार्यवाही करतील. विद्यापीठाची सुरक्षा यंत्रणा आवश्यकतेनुसार स्थानिक कायदा व सुव्यवस्थेबाबत समन्वय साधेल, अत्यंत गुप्तता राखून आणि तातडीने प्रकरणे हाताळली जातील, असेही परिपत्रकात म्हटले आहे.

### देर आये दुरुस्त आये

विद्यापीठाच्या या निर्णयाचे विद्यार्थ्यांसह पालकांनीही स्वागत केले आहे. गेल्या काही दिवसांतील अनुचित घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याबाबत अपेक्षा व्यक्त होत होती. आता सुरक्षा हेल्पलाइन सुरू करण्याच्या निर्णयावरून उशिरा का होईना; पण प्रशासनाने योग्य निर्णय घेतला असून, देर आये दुरुस्त आये, अशा प्रतिक्रिया विद्यार्थी वर्गातून उमटत आहेत.

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

### कार्यशाळांसाठी विद्यापीठाकडून अर्थसाहाय्य

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये कार्यप्रशिक्षण आणि ऑन द जॉब ट्रेनिंगसंदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. त्यासाठी विद्यापीठाकडून महाविद्यालयांना अर्थसाहाय्य दिले जाणार असून, त्यासाठीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी ११ एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. विद्यापीठाने याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने, संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कार्यानुभव संधी, ऑन-द-जॉब-ट्रेनिंगसंदर्भात जागरूकता, संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यासाठी अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी ऑनलाइन पद्धतीने प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने सादर करायचा आहे, असे नमूद करण्यात आले आहे. उपक्रमाच्या अर्थसाहाय्यासाठी ऑनलाइन पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावांची छापील प्रत मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून १५ एप्रिलपर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करावी. ऑनलाइनव्यतिरिक्त इतर पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसाहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व शैक्षणिक विभागांना बंधनकारक राहतील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition
Mar 30, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com
पुढारी ANCHOR

# मुलींच्या मोफत शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करा

## आदेशाचे पालन न केल्यास कारवाई; विद्यापीठाचा महाविद्यालयांना इशारा

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये मुलींच्या मोफत शिक्षण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. या योजनेपासून एकही मुलगी वंचित राहणार नाही, याची सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी गांभिर्याने नोंद घ्यावी. या योजनेची जी महाविद्यालये अंमलबजावणी करणार नाहीत, त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट निर्देश विद्यापीठ प्रशासनाने संलग्न महाविद्यालयांना दिले आहेत.**

विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयांना दिलेल्या निर्देशानुसार, उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत दिलेल्या निर्देशानुसार शासन व संचालनालयाद्वारे, सहसंचालक कार्यालयाकडून परिपत्रकाद्वारे, ऑनलाइन मीटिंगद्वारे, व्हॉट्सअप ग्रुपवर सूचनांद्वारे स्पष्ट निर्देश दिले आहेत. तरी देखील काही महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था पात्र लाभार्थी विद्यार्थिनींकडून प्रवेशाच्या वेळी काही प्रमाणात आणि त्यानंतर देखील शिक्षण शुल्क घेत असल्याबाबतच्या तक्रारी शासन व संचालनालय स्तरावर प्राप्त झाल्या आहेत. संबंधित बाब ही अत्यंत गंभीर असून शासन निर्देशाचे उल्लंघन करणारी आहे.

शासन निर्देशाचे अनुपालन न करणाऱ्या महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची वेळ येऊ नये याबाबत सर्व प्राचार्य, संचालक, महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी, असे देखील विद्यापीठाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

सहसंचालक कार्यालयाकडून सर्व संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था यांना अचानक भेटी देऊन प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी शासन धोरण, निर्देशाप्रमाणे सुरू आहे का तसेच महाविद्यालयाच्या स्तरावर स्कॉलरशिप नोडल ऑफिसर नियुक्त केले असल्याची खात्री करण्यात येणार आहे. तसेच निर्देशांचे अनुपालन न करणाऱ्या महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थाविरुद्ध कारवाई करण्यात येईल, याची संबंधित संस्थांनी गांभियनि नोंद घ्यावी, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition
Mar 30, 2025 Page No. 06
Powered by: erelego.com

Pudhari 30.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# HC: UGC rules for hiring teachers don't apply to minority institutes

TIMES NEWS NETWORK

**Chennai:** Madras HC has held that UGC regulations on minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in universities and colleges will not apply to minority institutions. This includes measures for maintenance of standards in higher education and guidelines on selection procedures through constitution of a selection committee, Justice Anand Venkatesh has said.

"The right of minorities to establish and administer their educational institutions was not merely a legal formality. It was a promise made by framers of the Constitution to protect the cultural and educational identities of minority communities," the judge said. In instances where these rights are threatened, it is imperative that constitutional courts intervene decisively to reaffirm this commitment, ensuring that the foundational ideals of justice and equality are upheld, he added.

The court passed the order on a batch of pleas moved by Women's Christian College,

**AUTONOMY DEBATE**

Madras Christian College, Loyola College, Stella Maris College, and Sacred Heart Arts and Science College, Tindivanam. They challenged refusal of Madras University to grant approval for the appointment of 66 people as assistant professors and sought direction to Annamalai University to grant approval to Sacred Heart College for the appointment of a principal.

The refusal was on the grounds that selection to the posts was not made through a properly constituted selection committee as mandated under UGC Regulations, 2018, which were adopted by the state govt in 2021. Quashing the denial orders of universities, the court said, "The dawn of India's independence heralded a profound commitment to safeguarding the rights of minorities, instilling a sense of security amid apprehensions about their future in a newly sovereign nation."

The judiciary must recognise its pivotal role in restoring confidence among minorities, acting as a guardian of the rights that were pledged to them, the judge added.

The Times of India 30.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
पना ३९
www.pudhari.c

# विद्यापीठाने सुरू केली सुरक्षा हेल्पलाइन

- विद्यार्थ्यांना प्रशासनाकडे करता येणार तक्रार
- सुरक्षेसंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या वारंवार घडताहेत घटना

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वारंवार विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या घटना घडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा विचार करून विद्यापीठ प्रशासनाने एक सुरक्षा हेल्पलाइन सुरू केली आहे. या हेल्पलाइनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विद्यापीठ प्रशासनाकडे तक्रार करता येणार आहे.

विद्यापीठात विद्यार्थिनींसमोर अश्लील कृत्य केल्याची घटना नुकतीच घडली. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी अश्लील कृत्य करणाऱ्या अनिश वसंत गायकवाड या तरुणाला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांच्या न्यायालयाने पोलिस कोठडीदेखील सुनावली आहे. त्याच्याविरोधात विद्यापीठ प्रशासनाने दिलेल्या फिर्यादीनुसार चतु:शृंगी पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. काही महिन्यांपासून घडलेल्या घटनांची दखल घेत अखेर विद्यापीठाने विद्यार्थी प्राध्यापक, कर्मचारी आणि अभ्यागत यांच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षा हेल्पलाइन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे संबंधितांना आता या हेल्पलाइनद्वारे तक्रारी नोंदवता येणार आहेत. विद्यापीठ प्रशासनाने सुरू केलेल्या ०२०-४८५५३३८३ या हेल्पलाइनवर तक्रार नोंदवता येणार आहे.

Pune Edition
Mar 31, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# Bharat Itihas Sanshodhan Mandal's four new halls ready for researchers

Pics: Aditya Waikul

**Aditi.Shekar**@timesofindia.com

**Pune:** The VK Rajwade auditorium at Bharat Itihas Sanshodhak Mandal (BISM) opened its doors on Sunday after a four-year-long restoration project.

Noted scientists and author Anand Ranganathan addressed a gathering of around 150 people during the inauguration ceremony.

"If we do not understand the core fundamentals of what success means, then achieving Viksit Bharat by 2047 will be a long shot," said Ranganathan.

The auditorium's restoration project was done in collaboration with the Maaydesh Foundation.

Ranganathan, who gave the keynote address at the inauguration event, spoke on the subject of the success the country has accomplished, stating that the country has top-notch infrastructure and has improved in life expectancy, asset management, and so much more.

"Our hunger index, however, is at 111, while our GDP rank in the world is 136. Clearly, we have success, but it is a game of two halves. We have to realise what led to the failures as well. If we do not understand it, we will be at an inflection point again," he said.

Ranganathan emphasised the need for research organisations to ensure the country does not forget its past. "Somewhere along the way towards advancement, we have forgotten our past. Such structures are important so that we do not forget what made us great once," he said.

Bharat Itihas Sanshodhak Mandal was established by historians VK Rajwade and Sardar Khanderao Mehendale on July 7, 1910.

The Mandal contains multiple copper artefacts and weapons from the period of Maratha rule, 25 lakh rare documents in Modi, Parsi, Kannada and Sanskrit scripts, 45,000 books on Maratha history, 32,000 manuscripts, all rare letters of Shahaji, Chhatrapati Sambhaji Maharaj and Chhatrapati Shivaji Maharaj, and original paintings of rulers such as Chhatrapati Shivaji Maharaj and Mughal Emperor Akbar. The Mandal is also a hub for historians and researchers to conduct studies and publish their papers.

The newly renovated structure has four large halls for researchers with an interactive blackboard, a 100-seat auditorium, a museum displaying originals and replications of paintings and artefacts, and a library with all books for reference. It will now be open from 11am to 8pm for research scholars. The museum will be open to the general public requesting access.

"The inspiration of renowned researchers and founder historians VK Rajwade and Sardar Khanderao Mehendale, as well as GH Khare, SN Joshi and Padma Vibhushan Babasaheb Purandare, can be felt here. I believe that the future of history is preserved through these structures," said Arun Joshi, founder of Maaydesh Foundation.

The alcoves in the cupboards of the Rajwade Hall's walls have been transformed to display information about the organisation's various activities. Painted illustrations depict the armoury, manuscripts, coins, seals, valuables and original letters. Photographs of 50 researchers from the last hundred years have been exhibited in the hall.

The Mandal is now digitising the scripts so that researchers and scholars can access them from any part of the world.

## MANUSCRIPTS, COINS & SEALS ON DISPLAY

**The Mandal contains multiple copper artefacts and weapons from the period of Maratha rule, 25 lakh rare documents in Modi, Parsi, Kannada and Sanskrit scripts, 45,000 books on Maratha history, 32,000 manuscripts and many rare letters**



Scientist and author Anand Ranganathan pays tribute to Chhatrapati Shivaji Maharaj during the inauguration of VK Rajwade auditorium





> The inspiration of renowned researchers and founder historians VK Rajwade and Sardar Khanderao Mehendale, as well as GH Khare, SN Joshi and Padma Vibhushan Babasaheb Purandare can be felt here. The Maaydesh Foundation and I feel a sense of duty fulfilled. It brings us joy to have contributed in some small measure to this legacy. I believe that the future of history is preserved through these structures. This building stands proudly behind the researchers who showcase Maharashtra's historical heritage to the world — **Arun Joshi** | FOUNDER OF MAAYDESH FOUNDATION

The Times of India 31.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Education*

# SPPU launches 24x7 security helpline amid growing concerns over safety

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** In light of several disturbing incidents over the past few months, the Savitribai Phule Pune University (SPPU) has decided to launch a 24-hour security helpline to enable the university to promptly address security-related complaints and emergency situations within the campus.

Notable among the disconcerting occurrences of the past few months are the discovery of drugs at the boys' hostel and the presence of alcohol bottles and cigarette packets at the girls' hostel followed by a complaint from a female student about harassment. Additionally on March 25, a male student was reported to have engaged in obscene behaviour in front of female students at the university grounds.



**The university's security team will also coordinate with local law enforcement whenever necessary.** HT FILE PHOTO

These instances have put a question mark on the adequacy of existing security arrangements at the university.

"In light of these incidents, the university administration has taken a proactive step by launching a 24-hour security helpline.

An official circular regarding this initiative has been issued on Saturday," said SPPU pro-vice chancellor professor Parag Kalkar.

According to the SPPU administration, the helpline is intended to handle suspicious activities and complaints related to safety/harassment/distressing situations and provide emergency assistance.

Hindustan Times 31.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Miscellaneous*

लोकमत

# देशाचे सर्वाधिक सुपर हीरो महाराष्ट्रात

लोकमत विशेष

## सुपर कॉम्प्युटर्समध्ये मराठी पाऊल पडते पुढे

योगेश पांडे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** संपूर्ण एआयची चर्चा करीत असताना भारतातील सुपर कॉम्प्युटर्स चर्चेत आले आहेत. भारतीय आयटी तज्ज्ञांचा जगात दबदबा आहे. डॉ. विजय भटकरनिर्मित परम सुपरकॉम्प्युटरपासून सुरू झालेला प्रवास आता एआयसमृद्ध 'ऐरावत'पर्यंत पोहोचला आहे. विशेष म्हणजे या क्षेत्रात महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करीत असून देशभरातील ३४ सुपरकॉम्प्युटर्सपैकी सर्वाधिक अकरा महासंगणक महाराष्ट्रात आहेत.

केंद्र सरकारच्या 'इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी' मंत्रालयाच्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली आहे. या मंत्रालयाने २०१५ साली ४.५ हजार कोटींच्या निधीसह नॅशनल सुपर कॉम्प्युटिंग मिशन सुरू केले. यातून ३४ सुपरकॉम्प्युटर्स तयार झाले. ते शैक्षणिक, आयआयटी, आयआयएससी, सीडॅकसारख्या संस्था व प्रयोगशाळांमध्ये बसविण्यात आले. यापैकी सर्वाधिक ११ सुपरकॉम्प्युटर्स महाराष्ट्रात आहेत.



**संपूर्ण स्वदेशी सुपर कॉम्प्युटिंग क्षमता :** 'एनएसएम'चे उद्दिष्ट होते- सुपर कॉम्प्युटिंगमध्ये स्वावलंबन व जागतिक नेतृत्व. यासोबतच सुपरकॉम्प्युटरची रचना, विकास, उत्पादन यावरदेखील विविध प्रयोग सुरू आहेत. देशात आता पूर्णपणे स्वदेशी सुपर कॉम्प्युटिंग तंत्रज्ञानाची क्षमता निर्माण झाली आहे.

## राज्यातील सुपर कॉम्प्युटर्स

**सीडॅक-पुणे :** १. परम सिद्धी, २. बायोइन्फॉर्मेटिक्स ३. संगम ४. परम श्रेष्ठ ५. परम एम्ब्रियो ६. परम नील ७. परम विद्या ८. परम संपूर्ण.

**आयआयटी-मुंबई :** परम रुद्र, आयआयएसईआर-पुणे : परम ब्रह्म, एनसीआरए-पुणे : परम रुद्र.

## परम रुद्र तीन शहरांत

स्वदेशी तंत्रज्ञानाचा अंतर्भाव असलेले तीन परम रुद्र सुपरकॉम्प्युटर तयार करण्यात आले असून ते पुणे, दिल्ली व कोलकाता येथे इन्स्टॉल करण्यात आले.

Pune Main
Page No. 8 Mar 01, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Miscellaneous*

# संत तुकाराम महाराजांची गाथा ई-बुकमध्ये आणणार

## उदय सामंत : 'ओळख ज्ञानेश्वरीची, परिचय भागवत धर्माचा'चे आळंदीत प्रकाशन

**आळंदी, ता. २ :** मराठी संत साहित्य, तिर्थस्थळाचा विकास, कीर्तन महोत्सव याबाबत येत्या अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यात देवस्थान, वारकरी आणि मंत्रिमंडळाची बैठक घेतली जाईल. यासाठी सर्व मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. पुढील पाच वर्षांत संत तुकाराम महाराजांच्या गाथेचे साडेचार हजार अभंग ई-बुकमध्ये रूपांतरित केले जातील, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

'ओळख ज्ञानेश्वरीची' आणि 'परिचय भागवत धर्माचा' या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा रविवारी (ता. २) मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते आळंदीत पार पडला. यावेळी ते बोलत होते. आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, डॉ. भावार्थ देखणे, डॉ. अभय टिळक, डॉ. नारायण जाधव, ज्ञानेश्वर गेठे, वासुदेव शेवाळे, उमेश बागडे, प्रकाश काळे, भगवान पोखरकर, डी. डी. भोसले, सुरेश वडगावकर, अजित वडगावकर, संजय घुंडरे, चैतन्य कबीर, विलास वाघमारे, ज्ञानेश्वर वीर, श्रीधर सरनाईक आदी यावेळी उपस्थित होते.

मंत्री सामंत म्हणाले, "संतांनी लिहिलेली ग्रंथसंपदा ताकदीची होती. संतांचे साहित्य हीच खरी अभिजात भाषा आहे. माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून सांगितलेली भाषा जगातील सर्व भाषांना मागे टाकणारी आहे. यामुळे नविन पिढीला पुस्तक वाचायला आणि ऐकायला सांगितले पाहिजे. नविन पिढी पुस्तक वाचण्याऐवजी ऐकण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर सातत्याने करत असतात. यामुळे राज्य सरकार जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील साडेचार हजार अभंग ई-बुकमध्ये आणण्याचा प्रयत्न करत आहेत."

योगी निरंजनाथ म्हणाले, "ओळख ज्ञानेश्वरीची हा अभ्यासक्रम ७० शाळांमध्येचार वर्षांपासून सुरू आहे. दोन वर्षांपूर्वी देवस्थानने या उपक्रमाचे पालकत्व घेतले आणि खानदेशातील ११ शाळांमध्ये हा उपक्रम सुरू केला." नरहरी चौधरी यांनी सूत्रसंचालन केले.

### अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणार

■ महिला साहित्य संमेलन घेण्याचा निर्णय यावर्षी घेतला आहे. संत परंपरा आणि संतांचे साहित्य ही महाराष्ट्राची संस्कृती असून, जगासमोर विविध माध्यमांतून नेली जाईल. यासाठीची जबाबदारी सरकारबरोबर सर्वांनी घेतली पाहिजे. येत्या पाच वर्षांत राज्यात उद्योजकांच्या आर्थिक मदतीने दरवर्षी भव्य कीर्तन महोत्सव भरवले जातील. शिक्षणासोबत संस्कार महत्त्वाचा आहे. शालेय विद्यार्थ्यांपर्यंत संस्कार पोहोचविण्यासाठी आळंदी संस्थानचा 'ओळख ज्ञानेश्वरीची' हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवू. याबाबत शिक्षणमंत्र्यांशी चर्चा केली जाईल.



**आळंदी (ता. खेड) :** 'ओळख ज्ञानेश्वरीची' आणि 'परिचय भागवत धर्माचा' या दोन पुस्तकांचे प्रकाशन करताना मंत्री उदय सामंत यांच्यासह इतर.

Sakal 3.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Miscellaneous*

# मराठी रुजवणे आपलीच जबाबदारी

**मराठीचा प्रसार करणे ही आपली जबाबदारी आहे, ती दुसऱ्यावर ढकलून देऊन चालणार नाही. आपले मराठीपण दुसऱ्याला स्वीकारायला लावणे, त्याला तसे करणे भाग पडेल अशी व्यवस्था उभारणे हे आपले आपल्या मायबोलीबद्दलचे कर्तव्य आहे, याचा विसर पडता कामा नये. बहुभाषिक शहरे झाली, याचा अर्थ मराठीचा संकोच करायचा, असा होत नाही. मराठीचा प्रसार आणि ती समाजात रुजवणे ही मराठी माणसाचीच जबाबदारी आहे.**

**■ विक्रम अवसरीकर**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे मराठीच्या प्राचीनत्वाविषयी सरकारी शिक्कामोर्तब झाले असल्याने परत मराठी किती प्राचीन आहे, सातवाहन काळाच्या आधीपासून कशी अस्तित्वात आहे ह्याविषयी चर्चा नको.

ज्या भाषेमुळे आपले अस्तित्व आहे त्या भाषेच्या महतीवर स्वतः विश्वास न ठेवता इतरांनी सांगितल्यावर हायसे वाटणे ह्यात एकंदरीतच मराठी समाजातील न्यूनगंड दिसून येतो. लोकसंख्येने १३ - १४ कोटी आकडा गाठला असतानासुद्धा ही अनास्था बाळगणे अत्यंत चुकीचे आहे. युरोपातील काही देशांची लोकसंख्या ह्यापेक्षा कमी असते आणि ते आपल्या परंपरा कोणताही धांगडधिंगा डीजे न लावता अभिजातपणे मिरवत असतात ह्याची नोंद घेतलीच पाहिजे. मराठी माणसाच्या ह्या अनास्थेविषयी विचार करता असे म्हणावेसे




चित्र : दीपक संकपाळ

वाटते की हिंदी राष्ट्रभाषा आहे असे मानल्याने हा प्रसंग ओढवलेला आहे. हिंदीला विरोध म्हणजे जणू काही भारताच्या विरोधी कारवाई आपण करतो आहोत अशीच भावना जनमानसात रुजलेली आहे. हिंदी वर्चस्वाला विरोध करणारे तामीळ, मल्याळम, तेलगू भाषक राज्ये भारत विरोधी आहेत असे आपण म्हणू शकतो काय? त्रिवार नाही.

## व्यवहारातील मराठी

मराठी माणूस गरीब बिचारा, सगळे त्याच्यावर अन्याय करतात, आम्हीच मराठी हिताचे कैवारी वगैरे कथानक रूढ झालेले आढळते. कोणत्याही राजकीय पक्षाने, संघटनेने मराठीसाठी प्रयत्न करावेत म्हणजे मराठीला चांगले दिवस येतील ही भावनाच स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलणारी आहे. प्रत्येक मराठी माणसाने समजून घेतले पाहिजे की स्वतः पासून ही जबाबदारी चालू होते. इथला प्रत्येक माणूस मराठी भाषेचा राजप्रतिनिधी आहे. आपली सही, बँकेचे ॲप, एटीएम वापरताना मराठी भाषा निवडणे इथून ती जबाबदारी चालू होते. मराठी माणूस बिचारा मागे पडतो, आपल्या चित्रपटातील नायक सुद्धा भाबडे, वेंधळे हास्यास्पद गोष्टी करणारे दाखवण्यात येतात. ह्याची काही गरजच नाही. ज्या मराठी उद्योजकांनी आपला ठसा उमटवला आहे त्यांची उदाहरणे सातत्याने माध्यमांनी देखील समोर आणली पाहिजेत.

अजून एक कथानक रूढ होताना दिसत आहे की आता आपले शहर कॉस्मो झाले आहे. कॉस्मो झाले म्हणजे इतर भाषिक लोकांची संख्या वाढली म्हणून केवळ हिंदी आणि इंग्लिश मधून बोलले पाहिजे असे थोडेच आहे? बिगर हिंदी, बिगर इंग्लिश 'कॉस्मो' शहरे काय अस्तित्वातच नाहीत कॉस्मो म्हणजे केवळ हिंदी, इंग्लिश आले असे थोडेच आहे ?पॅरिस, माद्रिद,रिओ, टोकियो, सेऊल, बर्लिन, ही शहरे काय कॉस्मो नाहीत? बाहेरील लोकांनी इथल्या भाषेचे, संस्कृतीचे ज्ञान घेतले नाही तर ते आपण स्वतः त्यांना दिले पाहिजे. नाटके बघायला, अस्सल कोल्हापुरी खायला, मराठी न्याहारी करायला ह्या लोकांना आपण स्वतः शिकवले पाहिजे. आपण आपली जबाबदारी झटकू शकत नाही. अजून एक गोष्ट म्हणजे इतर लोकांनी इथे येऊन काही करू नये, आम्ही बाहेर जाऊन काही करणार नाही. ही संकुचितपणाची भावना. जगात कोणतीही गोष्ट आकुंचन पावल्याने वाढत नाही हा साधा निसर्गनियम आपण विसरलो आहोत. आपण जे इथे येतात त्यांचे स्वागत केलेच पाहिजे, अर्थव्यवस्थेची ती मागणी आहे. परंतु ह्या लोकांना वर सांगितल्याप्रमाणे एक अस्सल मराठी सांस्कृतिक अनुभव पदोपदी यावेत अशी व्यवस्थाच आपण केली पाहिजे. परत एकदा ही जबाबदारी आपल्या प्रत्येकावर आहे. स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर टाकण्यास कोणताही अर्थ नाही. साधे एक उदाहरण घ्या, इंग्लिश चित्रपट मराठीत डब करून दाखवायला लागले तरी मराठीला जास्त स्क्रीन टाइम मिळेल. परदेशी नट निळू फुलेंच्या आवाजात बोलताना कोणाला आवडणार नाही? प्रत्येक ओ

टी टी वर मराठी भाषेतून कार्यक्रम बघायचा पर्याय असतो तो जरी निवडला तरी मराठीला मागणी आहे हे कंपन्यांना कळेल आणि मराठीसाठी अनेक नवीन संधी उपलब्ध होतील. मोडी लिपीचा वापर करून शासकीय गोष्टींवर नावे लिहिली गेली तर अस्सल मऱ्हाटी ठसा दिसू लागेल. हा प्रश्न आता केवळ भाषिक उरलेला नाही तर राजकीय देखील झाला आहे. संघराज्य पद्धतीमध्ये महाराष्ट्र मराठीचा दबदबा वाढवण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी जे मराठी लोक राहतात त्यांचे संघटन गरजेचे झाले आहे. ह्या मराठी माणसांनी आपली ओळख त्यांच्या त्याच्या ठिकाणी तयार केली आहे. महाराष्ट्र जणू काही ह्या बाहेरील मराठी बेटांना विसरलोच आहे. हे सांस्कृतिक बंध परत नव्याने मजबूत करावे लागतील. आधुनिक जगात मार्केटमध्ये आपली दखल घ्यावी असे वाटत असेल तर अशा 'सॉफ्ट' दबाव गटांचाच जास्त उपयोग होतो. पुढेमागे लोकसंख्येच्या बळावर आपल्याला दाबायचा प्रयत्न झाला तर ते त्यावेळी उपयोगाला येतील.

सारांश काय तर आपली स्वतःची किंमत आपण स्वतःच ठरवत असतो. गरीब बिचारी कोणी ही हाका असे जर स्वतःला ठेवले तर आपल्यावर सांस्कृतिक आक्रमणे होणारच. आपले अस्तित्व म्हणजे आपली भाषा आहे. आपल्या भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यात कसली आलीय लाचारी. भारताच्या सांस्कृतिक वनात फुललेली मराठी अजून वाढली फुलली तर तोही भारतीय संस्कृतीचाच एक आविष्कार असेल. मराठीचा प्रसार करणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे, कोणत्याही पक्षाची किंवा संघटनेची नाही. बँकेत मराठी अर्ज उपलब्ध नसतील तर कोणाचीही वाट न बघता स्वतः कृती करावी, जिथे विनाकारण मराठीचा दुस्वास केला जात आहे असे दिसले स्वतः कार्य करावे. गरीब बिचारे आम्ही हे तात्काळ सोडून देऊन जागच्या नजरेतून स्वतःकडे बघणे सोडून जगाला आपल्या तऱ्हेने आकार द्यावा. जास्त प्रगती त्यानेच होते.

Sakal 3.3.2025

# *News Paper Clippings During March 2025*

## *Section: Miscellaneous*

# 'दर्पण'कारांचे त्रिखंडात्मक चरित्र प्रकाशनाच्या वाटेवर

## रवींद्र बेडकीहाळ लिखित चरित्र साहित्य व संस्कृती मंडळ करणार प्रकाशित

**पुणे, ता. २१ :** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे समग्र चरित्र लवकरच वाचकांना व अभ्यासकांना उपलब्ध होणार आहे. ज्येष्ठ पत्रकार व अभ्यासक रवींद्र बेडकीहाळ लिखित 'दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर कर्तृत्वाचा एक शोध' हे चरित्र तीन खंडांचे असून, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून प्रकाशित केले जात आहे.

बाळशास्त्री जांभेकर यांनी सहा जानेवारी १८३२ ला मुंबईत पहिले मराठी साप्ताहिक वृत्तपत्र 'दर्पण', तसेच एक मे १८४० ला मराठीतील पहिले मासिक 'दिग्दर्शन' मुंबईतून सुरू केले. केवळ आद्य मराठी पत्रकारच


**बाळशास्त्री जांभेकर**


**रवींद्र बेडकीहाळ**

नव्हे; तर पहिले भारतीय प्राध्यापक, पहिले भारतीय पुरातत्त्व संशोधन लेखक, कुलाबा वेधशाळेचे प्रभारी संचालक, पहिले मराठी ग्रंथ समीक्षक, ग्रंथ पुरस्कारकर्ते, हिंदू धर्म चिकित्सक, सुधारणावादी असे अनेक पैलू जांभेकरांच्या व्यक्तिमत्त्वाला होते.

राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती झाल्यानंतर बेडकीहाळ यांनी मंडळाच्या ग्रंथ प्रकाशनांची माहिती घेतली. त्यात जांभेकर यांचे समग्र चरित्र असणे आवश्यक आहे, या कल्पनेतून त्यांनी चरित्रखंडाची संकल्पना मंडळासमोर मांडली. मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे आणि मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील यांनी तत्काळ होकार दिल्यामुळे प्रकल्पाला सुरुवात झाली. त्यानुसार गेल्या तीन वर्षांपासून चरित्राचे काम सुरू आहे.

बेडकीहाळ यांनी विविध ग्रंथालय, मान्यवर, एशियाटिक सोसायटी मुंबई, शासकीय पुरातत्त्व अभिलेख, विविध विद्यापीठे येथून आवश्यक संदर्भ गोळा करून चरित्र सिद्ध केले आहे. पहिल्या खंडात जांभेकरांचा जीवनप्रवास आणि त्यांच्या 'दर्पण' वृत्तपत्र व 'दिग्दर्शन' मासिकातील कार्याचा वेध घेतला आहे.

दुसऱ्या खंडात त्यांचे समग्र वाङ्मय व मीमांसा आहे. जांभेकर यांनी 'ज्ञानेश्वरी'ची पहिली मुद्रित प्रत प्रकाशित केली होती. या प्रकाशनामागील प्रक्रिया आणि त्या 'ज्ञानेश्वरी'चा समावेश तिसऱ्या खंडात आहे. या ग्रंथाच्या सर्व खंडांना ज्येष्ठ विचारवंत व समीक्षक डॉ. अशोक चौसाळकर यांची प्रदीर्घ प्रस्तावना असून, मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचे अध्यक्षीय निवेदन आहे. एप्रिलमध्ये समग्र चरित्र प्रकाशित होणार आहे.

Sakal 22.3.2025

## *News Paper Clippings During March 2025*

### *Section: Miscellaneous*

# पुणे आर्किटेक्चरल हिस्टरी आर्काइव्हचे लोकार्पण

## आधुनिक इतिहासाचा संग्रह; शहराच्या बांधणीचा इतिहास खुला

**पुणे, ता. २३ :** पुण्याच्या आधुनिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण करणाऱ्या 'पुणे आर्किटेक्चरल हिस्टरी आर्काइव्ह' (पहा)चे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेतील कार्यक्रमात लोकार्पण करण्यात आले.

आयसर संस्थेतील सहयोगी प्राध्यापक आणि 'पहा'चे संस्थापक सदस्य पुष्कर सोहोनी, पुणे महापालिकेच्या वारसा व्यवस्थापन विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील मोहिते, 'पहा'च्या संस्थापक सदस्या आणि फ्लेम विद्यापीठातील संशोधक फेलो डॉ. सारा मेल्सेन्स यावेळी उपस्थित होते.

### इतिहासप्रेमींना खजिना

**■ 'पहा'च्या संग्रहात सात हजारहून अधिक वास्तुशिल्पीय रेखाचित्रे, ५०० हून अधिक छायाचित्रे, १०५ जुने दस्तऐवज आणि इतर अनेक ऐतिहासिक साधनांचे डिजिटलायझेशन केले आहे. त्यामुळे इतिहासप्रेमींना मोठाच खजिना मिळाला आहे.**

सोहोनी यांनी सांगितले की, 'स्थापत्य हे शहराच्या इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. कोणताही परिसर तेथील मुख्य इमारतींमुळे ओळखला जातो. गेल्या काही वर्षांमध्ये पुणे वेगाने बदलले आहे. स्थानिक इमारती आणि वास्तुशैलीतही हे बदल दिसून येत आहेत. त्यामुळे पुण्याच्या एकेकाळची ऐतिहासिक स्मृती आणि विसाव्या शतकातील वास्तुशैलीची ओळख जपण्यासाठी या बदलांचे दस्तावेजीकरण करणे अत्यावश्यक आहे. हा संग्रह आधुनिक पुणे कसे बांधले गेले हे समजून घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी खुला आहे.''

या वेळी सुनील मोहिते यांच्या हस्ते 'पहा'च्या www.paha.site या संकेतस्थळाचे लोकार्पण करण्यात आले. 'पहा'हे पुण्याच्या स्थापत्य इतिहासाचे दस्तावेजीकरण करणारे पहिले डिजिटल संग्रहण आहे.

डॉ. मेल्सेन्स म्हणाल्या, ''पहाच्या संग्रहातील बहुतेक ऐतिहासिक स्रोत पूर्वी उघड झाले नव्हते. लिखित साधनांच्या सोबतच आम्ही मौखिक साधने जसे व्यक्तिगत स्मृती देखील गोळा केल्या आहेत ज्या इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. स्मृतीच्या माध्यमातून आपल्याला या काळासंदर्भातील आपली जाणीव समृद्ध करतात.''

Sakal 24.3.2025

# *Upcoming Events*

## *April 2025*

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 ***Mahatma Jyotiba Phule Jayanti***<br> | 12 | 13 |
| 14 ***Dr. Babasaheb Ambedkar Jayanti***<br> | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 ***Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti and Mahatma Basweshwar Jayanti***<br>  | | | | |




***Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com***